नागपूर महानगरपालिकेची स्थगित सर्वसाधारण सभा **मंगळवार दिनांक २२/०६/२०२१ रोजी सकाळी ११.५०** वाजता महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातुन मागील विचाराधिन तथा नवीन विषयावर विषयावर विचार करण्याकरिता **महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचे पत्र क्र. कोरोना/२०२०/प्र.क्र.७६/नवि(१४) दि. ०३-०७-२०२० तसेच सचिवालय विभाग, मनपा कार्यालयाचे दि. ०३-०७-२०२० सूचना/परिपत्रक अन्वये Video Conferencing व्दारे आयोजित केलेल्या सभेचे कार्यवृत्त.**

**उपस्थित सदस्य**

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद |
|---|---|---|---|---|
| १. | **१९** | **ड** | **दयाशंकर चंद्रशेखर तिवारी** | **महापौर** |
| २. | **२३** | **ब** | **मनिषा आशिष धावडे** | **उपमहापौर** |
| ३. | १ | अ | महेन्द्रप्रसाद रमेश धनविजय | सदस्य |
| ४. | १ | क | प्रमिला प्रितम मथरानी | सदस्या |
| ५. | २ | ड | मनोज दशरथ सांगोळे | सदस्य |
| ६. | ३ | ब | गोपीचंद कृष्णराव कुमरे | सदस्य |
| ७. | ३ | ड | खान नसीम बानो मो. इब्राहिम | सदस्या |
| ८. | ४ | ब | शेषराव शंकरराव गोतमारे | सदस्य |
| ९. | ४ | क | मनिषा चक्रधर अतकरे | सदस्या |
| १०. | ४ | ड | राजकुमार पुनाराम साहु | सदस्य |
| ११. | ५ | क | अभिरुची अनिल राजगिरे | सदस्या |
| १२. | ६ | अ | जितेन्द्र भास्कर घोडेस्वार | सदस्य |
| १३. | ६ | ब | वंदना राजू चांदेकर | सदस्या |
| १४. | ६ | क | वैशाली अविनाश नारनवरे | सदस्या |
| १५. | ६ | ड | मो. इब्राहिम तॉफीक अहमद | सदस्य |
| १६. | ७ | क | मंगला योगीराज लांजेवार | सदस्या |
| १७. | ९ | अ | स्नेहा विवेक निकोसे | सदस्या |
| १८. | ९ | ब | संजय श्यामराव बुर्रेवार | सदस्य |
| १९. | १० | अ | साक्षी विपीन राऊत | सदस्या |
| २०. | ११ | अ | संदीप चंद्रभान जाधव | सदस्य |
| २१. | ११ | ब | संगिता दिपक गिऱ्हे | सदस्या |
| २२. | १२ | ब | माया चिंतामन इवनाते | सदस्या |
| २३. | १३ | अ | अमर हरीश बागडे | सदस्य |
| २४. | १३ | क | परिणिता परिणय फुके | सदस्या |
| २५. | १३ | ड | वर्षा जयंत ठाकरे | सदस्या |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २६. | १४ | अ | शिल्पा इशांत धोटे | सदस्या |
| २७. | १७ | ब | लता सुनिल काडगाये | सदस्या |
| २८. | १९ | क | सरला कमलेश नायक | सदस्या |
| २९. | २० | क | रमेश गणपती पुणेकर | सदस्य |
| ३०. | २० | ड | दिपराज भैय्याजी पार्डीकर | सदस्य |
| ३१. | २१ | क | आभा विजयकुमार पांडे | सदस्या |
| ३२. | २१ | ड | महेश केशवराव महाजन | सदस्य |
| ३३. | २३ | अ | कांता राधेश्याम रारोकर | सदस्या |
| ३४. | २४ | क | चेतना राजू टांक | सदस्या |
| ३५. | २४ | ड | प्रदीप वसंतराव पोहाणे | सदस्य |
| ३६. | २५ | अ | जयश्री योगेश्वर रारोकर | सदस्य |
| ३७. | २६ | अ | धर्मपाल नत्थुजी मेश्राम | सदस्य |
| ३८. | २७ | अ | तानाजी सुकलाजी वनवे | सदस्य |
| ३९. | २७ | ब | दिव्या दिपक धुरडे | सदस्या |
| ४०. | २८ | ड | विजय शंकरराव झलके | सदस्य |
| ४१. | २९ | अ | लिला अजय हाथीबेड | सदस्य |
| ४२. | २९ | क | भगवान भाऊराव मेंढे | सदस्य |
| ४३. | २९ | ड | स्वाती चंद्रकांत आखतकर | सदस्या |
| ४४. | ३२ | ब | कल्पना राम कुंभलकर | सदस्या |
| ४५. | ३४ | अ | नागेश महादेव मानकर | सदस्य |
| ४६. | ३४ | ब | राजेन्द्र विठ्ठलराव सोनकुसरे | सदस्य |
| ४७. | ३४ | क | माधुरी प्रवीण ठाकरे | सदस्या |
| ४८. | ३५ | अ | संदीप रमेश गवई | सदस्य |
| ४९. | ३५ | ब | जयश्री मोहन वाडीभस्मे | सदस्या |
| ५०. | ३५ | ड | अविनाश निलकंठ ठाकरे | सदस्य |
| ५१. | ३६ | ब | पल्लवी अशोक श्यामकुळे | सदस्या |
| ५२. | ३७ | क | नंदा शरद जिचकार | सदस्या |
| ५३. | ३८ | ब | प्रफुल्ल विनोंदराव गुडधे | सदस्य |
| ५४. | ना.स. | | पोकुलवार गणेश उर्फ (मुन्ना) रामन्ना | सदस्य |
| ५५. | ना.स. | | जिचकार किशोर दामोदर | सदस्य |

## **अनुपस्थित सदस्य**

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद |
|---|---|---|---|---|

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद |
|---|---|---|---|---|
| १. | १ | ब | सुषमा संजय चौधरी | सदस्या |
| २. | १ | ड | विरेन्द्र उर्फ विक्की धनश्यामदास कुकरेजा | सदस्य |
| ३. | २ | अ | भावना संतोष लोणारे | सदस्या |
| ४. | २ | ब | दिनेश बसंतलाल यादव | सदस्य |
| ५. | २ | क | नेहा राकेश निकोसे | सदस्या |
| ६. | ३ | अ | परसराम काशीनाथ मानवटकर | सदस्य |
| ७. | ३ | क | भाग्यश्री गणेश कानतोडे | सदस्या |
| ८. | ४ | अ | निरंजना महेश पाटील | सदस्या |
| ९. | ५ | अ | रिक्त | |
| १०. | ५ | ब | प्रवीण विलासराव भिसीकर | सदस्य |
| ११. | ५ | ड | संजय अरुणराव चावरे | सदस्य |
| १२. | ७ | अ | विरंका मुरलीधर भिवगडे | सदस्या |
| १३. | ७ | ब | शेख मोहम्मद जमाल मोहम्मद इब्राहिम | सदस्य |
| १४. | ७ | ड | संदीप प्रल्हाद सहारे | सदस्य |
| १५. | ८ | अ | आशा नेहरु उईके (आयेशा) | सदस्या |
| १६. | ८ | ब | रिक्त | |
| १७. | ८ | क | जिशानमुमताज मो. इरफान अंसारी | सदस्या |
| १८. | ८ | ड | भुट्टो जुल्फेकार अहमद | सदस्य |
| १९. | ९ | क | ममता महेश सहारे | सदस्या |
| २०. | ९ | ड | नरेंद्र नत्थुजी वालदे | सदस्य् |
| २१. | १० | ब | रश्मि निलमनी धुर्वे | सदस्या |
| २२. | १० | क | नितिश गंगाप्रसादर ग्वालबंशी | सदस्य |
| २३. | १० | ड | गार्गी प्रशांत चोपरा | सदस्या |
| २४. | ११ | क | अर्चना विवेक पाठक | सदस्या |
| २५. | ११ | ड | भूषण कृष्णराव शिंगणे | सदस्य |
| २६. | १२ | अ | दर्शनी स्वानंद धवड | सदस्या |
| २७. | १२ | क | हरीश मोहन ग्वालबंशी | सदस्य |
| २८. | १२ | ड | विक्रम जगदीश ग्वालबंशी | सदस्य |
| २९. | १३ | ब | रुतिका योगेश मसराम | सदस्या |
| ३०. | १४ | ब | प्रमोद ताराचंद कौरती | सदस्य |
| ३१. | १४ | क | कमलेश दिलीप चौधरी | सदस्य |
| ३२. | १४ | ड | प्रगती अजय पाटील | सदस्या |
| ३३. | १५ | अ | सुनिल दुलीचंद हिरणवार | सदस्य |
| ३४. | १५ | ब | उज्वला प्रकाश शर्मा | सदस्या |

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद |
|---|---|---|---|---|
| ३५. | १५ | क | रुपा शेखर राय | सदस्या |
| ३६. | १५ | ड | संजय अनंत बंगाले | सदस्य |
| ३७. | १६ | अ | लखन सुमेरा येरवार | सदस्य |
| ३८. | १६ | ब | वनिता सुनिल दांडेकर | सदस्या |
| ३९. | १६ | क | तारा (लक्ष्मी) ओमप्रकाश यादव | सदस्या |
| ४०. | १६ | ड | संदीप दिवाकर जोशी | सदस्य |
| ४१. | १७ | अ | विजय गोपालराव चुटेले | सदस्य |
| ४२. | १७ | क | हर्षला मनोज उर्फ मोरेश्वर साबळे | सदस्या |
| ४३. | १७ | ड | प्रमोद छत्रपाल चिखले | सदस्य |
| ४४. | १८ | अ | प्रवीण प्रभाकर दटके | सदस्य |
| ४५. | १८ | ब | सुमेधा श्रीकांत देशपांडे | सदस्या |
| ४६. | १८ | क | नेहा नरेन्द्र वाघमारे | सदस्या |
| ४७. | १८ | ड | ऋषिकेश (बंटी) नारायण शेळके | सदस्य |
| ४८. | १९ | अ | संजयकुमार कृष्णराव बालपांडे | सदस्य |
| ४९. | १९ | ब | विद्या राजेश कन्हेरे | सदस्या |
| ५०. | २० | अ | शंकुतला वामन पारवे | सदस्या |
| ५१. | २० | ब | यशश्री देवराम नंदनवार | सदस्या |
| ५२. | २१ | अ | ज्योती श्रीधर भिसीकर | सदस्या |
| ५३. | २१ | ब | नितीन रामभाऊ साठवणे | सदस्य |
| ५४. | २२ | अ | राजेश श्रावणजी घोडपागे | सदस्य |
| ५५. | २२ | ब | वंदना वसंतराव यंगटवार | सदस्या |
| ५६. | २२ | क | श्रध्दा विजय पाठक | सदस्या |
| ५७. | २२ | ड | मनोज केशवराव चापले | सदस्य |
| ५८. | २३ | क | नरेंद्र (बाल्या) गोविंद बोरकर | सदस्य |
| ५९. | २३ | ड | दुनेश्वर सूर्यभान पेठे | सदस्य |
| ६०. | २४ | अ | अनिल शौकीलाल गेंडरे | सदस्य |
| ६१. | २४ | ब | सरिता ईश्वर कावरे | सदस्या |
| ६२. | २५ | ब | पुरुषोत्तम नागोराव हजारे | सदस्य |
| ६३. | २५ | क | वैशाली देवचंद रोहणकर | सदस्या |
| ६४. | २५ | ड | दिपक मोतीरामजी वाडीभस्मे | सदस्य |
| ६५. | २६ | ब | समिता राजेन्द्र चकोले | सदस्या |
| ६६. | २६ | क | मनिषा सुनिल कोठे | सदस्या |
| ६७. | २६ | ड | जितेंद्र धनराज कुकडे | सदस्या |
| ६८. | २७ | क | वंदना राजेश भुरे | सदस्या |

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद |
|---|---|---|---|---|
| ६९. | २७ | ड | हरीश सिताराम दिकोंडवार | सदस्य |
| ७०. | २८ | अ | किशोर रतनलाल कुमेरिया | सदस्य |
| ७१. | २८ | ब | मंगलाबाई प्रशांत गवरे | सदस्या |
| ७२. | २८ | क | रेखा राजू साकोरे | सदस्या |
| ७३. | २९ | ब | विद्या योगेश मडावी | सदस्या |
| ७४. | ३० | अ | नागेश गोविंदराव सहारे | सदस्या |
| ७५. | ३० | ब | रिता अशोक मुळे | सदस्या |
| ७६. | ३० | क | स्नेहल सतीश बिहारे | सदस्या |
| ७७. | ३० | ड | संजय मधुकर महाकाळकर | सदस्य |
| ७८. | ३१ | अ | उषा टॉबी पॅलट | सदस्या |
| ७९. | ३१ | ब | सतीश विठ्ठलराव होले | सदस्य |
| ८०. | ३१ | क | शीतल प्रशांत कामडे | सदस्या |
| ८१. | ३१ | ड | रविंद्र प्रभाकर भोयर | सदस्य |
| ८२. | ३२ | अ | अभय प्रल्हाद गोटेकर | सदस्य |
| ८३. | ३२ | क | रुपाली प्रशांतसिंह ठाकूर | सदस्या |
| ८४. | ३२ | ड | दिपक मारोतराव चौधरी | सदस्य |
| ८५. | ३३ | अ | वंदना भानुदास भगत | सदस्या |
| ८६. | ३३ | ब | भारती विकास बुंडे | सदस्या |
| ८७. | ३३ | क | विशाखा शरद बान्ते | सदस्या |
| ८८. | ३३ | ड | मनोजकुमार धोंडुजी गावंडे | सदस्य |
| ८९. | ३४ | ड | मंगला शशांक खेकरे | सदस्या |
| ९०. | ३५ | क | विशाखा प्रकाश मोहोड | सदस्या |
| ९१. | ३६ | अ | मिनाक्षी नितीन तेलगोटे | सदस्या |
| ९२. | ३६ | क | लहुकुमार दत्तुजी बेहते | सदस्य |
| ९३. | ३६ | ड | प्रकाश सिताराम भोयर | सदस्य |
| ९४. | ३७ | अ | प्रमोद हरिभाऊ तभाने | सदस्य |
| ९५. | ३७ | ब | सोनाली शालीक कडू | सदस्या |
| ९६. | ३७ | ड | दिलीप वामनराव दिवे | सदस्य |
| ९७. | ३८ | अ | उज्ज्वला वसंतराव बनकर | सदस्या |
| ९८. | ३८ | क | प्रणिता चंद्रप्रकाश शहाणे | सदस्या |
| ९९. | ना.स. | | अग्रवाल सुनिल जिवराज | सदस्य |
| १००. | ना.स. | | वानखेडे किशोर रामकृष्ण | सदस्य |
| १०१. | ना.स. | | गांधी निशांत गिरीश | सदस्य |

**उपस्थित अधिकारी**

**श्री.राधाकृष्णन बी.　　निगम आयुक्त**

**डॉ.रंजना लाडे　　निगम सचिव**

**वंदेमातरम होवून सभेच्या कार्यवाहीस सुरुवात करण्यात आली.**

**(मा.महापौरजी यांनी दिलेल्या निर्देशानुसार निगम सचिव यांनी भारतीय संविधान प्रस्तावनाचे सभागृहात वाचन केले)**

**ठराव क्र.९२** :- मा. महापौरजी यांनी दिलेल्या निर्देशान्वये निगम सचिव यांनी खालील अभिनंदन प्रस्ताव सभागृहात वाचून दाखविले आणि सभागृहाने त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**अभिनंदन प्रस्ताव**

**भदंत ससाई**

दीक्षाभूमी स्मारक समितीचे अध्यक्ष, धम्मसेना नायक भदंत आर्य नागार्जुन सुरेई ससाई यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर असोसिएशन ऑफ नॉर्थ अमेरिका या संस्थेतर्फे डॉ.आंबेडकर इंटरनॅशनल अचिव्हमेंट अवार्डने सन्मानित करण्यात आल्याबद्दल मनपाची ही सभा त्यांचे विशेष रुपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

**दुनेश्वर पेठे**

प्रभाग क्र.२३(ड) चे नगरसेवक दुनेश्वर पेठे यांची राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या शहराध्यक्ष पदी नियुक्ती झाल्याबद्दल मनपाची ही सभा त्यांचे विशेष रुपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

**आभा पांडे**

म.न.पा.प्रभाग क्र. २१ (क) च्या नगरसेविका व महापालिका स्थायी समितीच्या माजी अध्यक्षा आभा बिज्जू पांडे यांची राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या महाराष्ट्र महासचिव पदी नियुक्ती झाल्याबद्दल मनपाची ही सभा त्यांचे विशेष रुपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

**प्राची गोडबोले**

अत्यंत हलाखीच्या व प्रतिकूल परिस्थितीत राहणा-या नागपूरच्या प्राची गोडबोले या प्रतिभावंत धावपटूने जिद्द, चिकाटी आणि समर्पण वृत्तीने नवी दिल्ली येथे तीन महिन्यापूर्वी पार पडलेल्या दिल्ली मॅरेथॉनमध्ये रौप्यपदक जिंकले असून जिल्हा, राज्य व राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये अनेक पदके जिंकली आहे. सद्यस्थितीत भारतातील पहिल्या तीन मॅरेथॉनपटूंमध्ये प्राचीचा समावेश असून या नेत्रदीपक कामगिरीबद्दल मनपाची ही सभा तिचे विशेष रुपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

**डॉ.संजय देवतळे**

इंडीयन मेडीकल असोशिएशनच्या नागपूर शाखेच्या अध्यक्षपदी डॉ.संजय देवतळे आणि सचिव पदी डॉ. सचिन गाठे यांची निवड झाल्याबद्दल मनपाची ही सभा त्यांचे विशेष रुपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे

महापौर :- एक महिन्यापुर्वी सभागृहात निर्देश देण्यात आले होते आपण ज्या लोकांना शोकसंवेदना व्यक्त करतो व ज्या लोकांचे अभिनंदन प्रस्ताव या सभागृहात घेण्यात येते त्या सर्व लोकांच्या घरापर्यंत महानगरपालिकेने घेतलेल्या ठरावाची कॉपी पोहचली पाहिजे परंतु ते होतांना दिसत नाही. प्रशासनातर्फे ज्यांचे आपण अभिनंदन करतो त्यांच्या घरापर्यंत अभिनंदनाचे पत्र पोहचले पाहिजे आणि ज्यांना आपण शोक संवेदना व्यक्त केली त्या सर्वाच्या घरापर्यंत शोकसंवेदनाचे पत्र सुध्दा गेले पाहिजे या दृष्टीने प्रशासनाने कार्यवाही करावी. सभागृहातील कामकाजाला सुरुवात करीत आहोत. प्रश्नोत्तराचा तासाला सुरुवात करण्यात येत आहे.

**प्रश्न क्र २५२ :-** नागपूर मनपा सिमेअंतर्गत मनपाव्दारे संचालित करण्यात येणा-या वाचनालयाची/ गंथालय यांची सद्यस्थिती काय आहे या संदर्भातील प्रश्नावर

निगम आयुक्त :- वितरीत केल्याप्रमाणे

सौ.वैशाली नारनवरे :- मा.महापौरजी, राज्य शासनाच्या आदेशानूसार वाचनालय, ग्रंथालय व अध्ययन कक्ष आता रात्री ०८.०० वाजेपर्यंत सोशल डिस्टन्स, मास्क आणि सॅनिटायझरचा वापर करुन सुरु करण्यात येणार आहे. तत्पुर्वी आपले १९ ग्रंथालयमध्ये मनपा कर्मचारी कार्यरत आहेत. तसेच अध्ययन कक्षाला महिला बचत गटाव्दारे संचालन करण्याचे काम दिलेले आहे. ग्रंथालय व अध्ययन कक्षातील सुस्थिती व दुरुस्तीचे काम क्षेत्रीय कार्यालयातर्फे करण्यात येतात परंतु प्रशासनाने उत्तर दयावे की याकडे त्यांचे लक्ष आहे काय ? कोरोनाचा काळ वगळून ग्रंथालय, वाचनालय, व अध्ययन कक्षांचे सुस्थिती व दुरुस्तीकडे प्रशासनाचे अजिबात लक्ष नाही हे तुमच्या निर्देशनास यावे व सभागृहातील सदस्यांना माहिती व्हावी म्हणुन हा प्रश्न सभागृहात मांडला आहे. गरिब व गरजु अभ्यासु मुल, मुलींया गरजा प्रशासन का पुर्ण करु शकत

नाही ही दुर्भाग्यवश गोष्ट आहे. आज जी ग्रंथालयाची व्यवस्था आहे. प्रत्येक प्रभागामध्ये ग्रंथालय, वाचनालय तसेच अध्ययन कक्ष आहेत. मा.महापौरजी, माझ्या प्रभागामध्ये मनपा शाळा राणी दुर्गावती ही जी शाळा आहे ती लिलाबाई बहुहिताय स्त्री सहाय्य या संस्थेला दिलेली आहे. परंतु त्या संस्थेच्या कर्मचारी या ठिकाणी उपस्थित राहत नासुन परिसर स्वच्छ ठेवत नाही. तेथे पिण्याच्या पाण्याची व्यवस्था सुध्दा बरोबर नाही. शौचालयाची व्यवस्था नाही. विद्यार्थी त्या ठिकाणी येऊ शकत नाही. तेथील सुरक्षा भिंतीला गेट सुध्दा नाही. इलेक्ट्रीक फिटींग इतकी जुनी आहे  की बटन सुरु करायला गेले किंवा मोबाईल चार्जिंगला लावला तर संबंधितांना करंट लागु शकतो अशी अवस्था त्या ठिकाणी आहे. त्याचप्रमाणे टेबल खुर्चांची कमतरता आहे. वर्तमानपत्र व मासिकची सुध्दा पुर्तता होत नाही. माझ्या प्रभागामध्ये आणखी एक अध्ययन कक्ष आहे. बाबाबुध्द बिनाकी हे अध्ययन कक्ष आहे याकडे सुध्दा प्रशासनाचे बिलकुल लक्ष नाही. हे डॉ.बाबासाहेब आंबेडकर बहुउद्येशीय संस्था यांच्याकडे सुपुर्द केलेले आहे. या संस्थेची काम करण्याची शैले खुप वेगळी आहे. हे अध्ययन कक्ष बेवारस आणि अनाथ झालेले आहे. खंडर सारखी त्या अध्ययन कक्षाची अवस्था झालेली आहे. नियमीतपणे तेथील अध्ययन कक्ष उघडल्या जात नव्हते.  या अध्ययन कक्षामध्ये जो  लॉक लावलेला असतो  व तो उघडला जात नाही. या लॉकची चाबी घेण्यासाठी संस्थेच्या पदाधिका-यांकडे जावे लागते. तेथे त्यांना बसण्यासाठी टेबल खुर्ची नाही मग तेथील संस्थेचे काय काम आहे याकडे प्रशासनाचे लक्ष आहे की नाही. २४ तास सुरु असणारे राम मनोहर लोहिया वाचनालयाचे नाव ऐवढे लौकीक आहे की या ठिकाणी अभ्यासाकरीता आलेले विद्यार्थी आपले नाव लौकिक करीत असते. माझे देखील भविष्य तेथुनच घडले असे म्हणायला काही हरकत नाही. येथील अवस्था अशी झालेली आहे की ती अवस्था सांगायला सुध्दा मला दु:ख वाटते. या ठिकाणी वर मुलांची लायब्ररी आहे व खाली मुलींची लायब्ररी आहे. तेथे पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही. त्या लायब्ररीमध्ये दोन बोअरवेल आहे एका बोअरवेलला साखळी नाही आहे. व दुसरे बोअरवेल हे बंद आहे. मी नेहमी त्या ठिकाणी टॅकरव्दारे पाणी पुरवित असते आणि आपण टॅकरमुक्त शहर करु असे नेहमी म्हणत असतो तेव्हा प्रशासनाचे लक्ष कुठे असते. हे वाचनालय जेव्हा २४ तास सुरु असते तर या वाचनालयाची जी सुरक्षा भिंत पुर्णपणे खचलेली आहे. या ठिकाणी बाहेरचे मुले येतात व त्या ठिकाणी गांजा व चरस पितात व गुंडेगिरी करतात. तेथील सुरक्षा भिंत पुर्णपणे खचलेले आहे तर या ठिकाणी प्रशासनाचे कोणते काम असायला पाहिजे,  तेथील विद्यार्थ्यांना कोणत्याही सुख सुविधा मिळत नाही तसेच सुरक्षा भिंत नाही, शौचालय नाही, मुलांना या सर्व गोष्टीचा त्रास होतो. सिध्दार्थ नगर टेका येथे सुध्दा अशीच व्यवस्था आहे. तेथेसुध्दा पाणी नाही, शौचालय चोकेज झालेले आहेत तेथुन पाणी पास होत नाही. आता सर्वीकडे करोना नंतर लायब्ररी, वाचनालय आणि अध्ययन कक्ष सुरु होणार आहे. मला असे वाटते की तुमच्या कारकीर्दीमध्ये आणि तुमच्या वाणीमध्ये सरस्वतीचा वास आहे आणि सरस्वती ही विद्येची देवता आहे ज्या ठिकाणी विद्यार्थी अभ्यास करतात त्या ग्रंथालयामध्ये विद्यार्थ्यांना सुख सुविधा उपलब्ध व्हायला पाहिजे.  मा.महापौरजी आपण नागपूर शहराच्या संपुर्ण लायब्ररीचा दौरा करावा व त्या संदर्भात आपण योग्य तो निर्णय घ्यावा, ही आपणांस विनंती करतो आ णि मी विचारलेल्या प्रश्नाचे प्रशासनाकडून उत्तर सुध्दा दयावेत.

महापौर :- प्रशासनाने उत्तर दयावे.

ग्रंथालय अधिक्षक (सौ.गावंडे) :- मा.महापौरजी, सन्माननिय सदस्या सौ.वैशाली नारनवरे यांनी जे मुद्ये या ठिकाणी उपस्थित केले की सिध्दार्थ नगर अध्ययन कक्षामध्ये अशा अशा व्यवस्था आहे त्या बद्यल आम्ही वारंवार पत्रव्यवहार केलेला आहे असुन त्याबाबत फाईल सुध्दा बनलेली आहे परंतु अजुनपर्यत त्यावर कारवाई झालेली नाही. तसेच मा.सदस्यांनी म्हटल्याप्रमाणे राममनोहर लोहीया वाचनालयामध्ये

गांजा पितात तर तसा प्रकार आढळुन आलेला नाही.

सौ.वैशाली नारनवरे :- मा.महापौरजी, राममनोहर लोहिया वाचनालयाच्या मागे रात्री ११ ते १२ नंतर गांजा पिण्याचा जो गैरप्रकार घडतात त्या संदर्भात मी ऐकले सुध्दा आहे तसेच तेथील विद्यार्थ्यांनी मला तक्रार सुध्दा केलेली आहे. त्यामुळे तेथे जाऊन संबंधित अधिका-यांनी स्वत: चौकशी करावी आणि मी जे तेथील वाचनालयाची दुरावस्था सांगितली आहे त्यावर सुध्दा लक्ष देऊन त्याबाबत त्वरीत कारवाई करावी.

ग्रंथालय अधिक्षक (सौ.गावंडे) :- मा.महापौरजी, राममनोहर लोहिया वाचनालयामध्ये २४ तास गार्ड असते तरी सुध्दा तेथे होत असलेल्या गैरप्रकारासंदर्भात चौकशी करण्यात येईल. सिध्दार्थ नगर अध्ययन कक्षामध्ये दुरावस्था झालेली आहे. तसेच राममनोहर लोहीया ग्रंथालयामध्ये सिपेजचा प्रॉब्लेम होता त्याबाबत झोनशी पत्रव्यवहार झालेला आहे आणि त्यावर कारवाई करण्यात येईल असे झोनतर्फे सांगण्यात आलेले आहे.

श्री.इब्राहीम तौफीक अहमद :- मा.महापौरजी, मा.सदस्या सौ.वैशाली नारनवरेजी ने जो विषय रखा है वह बहोत महत्वपुर्ण विषय है। एज्युकेशन के दृष्टीसे हम सभीने इसपर ध्यान देना चाहिये और सिध्दार्थ नगर लायब्ररीमे पानी की समस्या है, और शौचालय की समस्या है इसके अलावा मेरे प्रभाग मे एक और लायब्ररी है चंद्रशेखर आझाद वहापर भी समस्या बहोत जादा है वहापर पेपर बराबर नाही आते वहापर जो पढने वाले बच्चे है वह जा नही पाते वहापर कोईल भी व्यवस्था नही है मै चाहता हु की जादा से जादा बच्चे लायब्ररी मे पढने के लिये आये व जादा जे जादा सुविधाये वहापर उपलब्ध कराने का काम प्रशासन व्दारा किया जायें।

सौ.आभा पांडे :- मा.महापौरजी, इस विषय मे आपका ध्यान आकर्षीत करना चाहती हु प्रभाग क्र २१ खैरीपूरा मे जो सुभाषचंद्र बोस वाचनालय है वहापर युवा बच्चे आकर वहापर अध्ययन करते है और कई बच्चो ने एम.पी.एस.सी. की परिक्षाये पास की है, कई बच्चे पोलीस मे लगे है और जादा से जादा बच्चो ने कॉम्पेटेटीव्ह एक्झाम पास की है। सुभाषचंद्र बोस वाचनालय के आसपास स्लम बस्तीया है और वहा के बच्चो के लिये वहापर वाचनालय बनाया है। कल मुझे रात मे फोन आया की सुभाषचंद्र बोस वाचनालय की उपर की छत गिर गयी है। आज मैने सुबह वहाके झोन के सहा.आयुक्त है आदरणिय पंधरेजी के साथ मे मुआयना किया मा.महापौरजी आपणे सबसे जादा शिक्षा और स्वास्थपर ध्यान दिया है। दयाभैय्या याने स्वयंम एक युनिर्व्हसिटी है इसलिये हमे कुछ बताने के जरुरत नही है की नागपूर शहर मे जो ग्रंथालय है और वाचनालय है उनकी स्थिती क्या है। नारनवरेताई ने अपने प्रभाग के वाचनालय की वस्तुस्थिती जाहीर की उसी तरह हमारे प्रभाग की वाचनालय की स्थिती है। वहापर आनेवाले जो वर्तमान पत्र है वहापर रोज नियमित रुपसे वर्तमानपत्र आते नही। जिन बचत गट को वाचनालय संचालन की जिम्मेदारी दी गयी है वह बचत गट की महिलाये वहापर उनका प्रभाव नही है इसलिये मा.महापौरजी, सभी बचत गट को जो काम दिया है उनको निरस्त करके तुरंत आवेदन प्रक्रीया निकाली जाये, अच्छे बचत गटों का चयन करके या और संस्थाओं का चयन करके उनको जबाबदारी दे के जिसने हमारे शहर के वाचनालयोकी स्थिती अच्छी होंगी। मा.महापौरजी, आपसे निवेदन करती हु सुभाषचंद्र बोस वाचनालय की स्थिती जरजर हो गयी है आज उसकी छत भी निचे गिर गयी है तो मा.महापौरजी, उसे भी आप निधी देकर जल्द से जल्द वहापर बनवायेंगे तो जो अध्ययन करते है उनको लाभ मिलेगा।

महापौर :- मा.सदस्य सौ.वैशाली नारनवरे, मा.सदस्य श्री.इब्राहीम तौफीक अहमद, मा.सदस्या सौ.आभा पांडे इन्होने अपने अपने प्रभाग की लायब्ररी के विषय को हमारे समक्ष रखा, बहुत दुख के साथ

कहना पडता है की यह जो लायब्ररी है इन सारी लायब्ररी के लिये नागपूर महानगरपालिका के बजट के माध्यम से झोन मे इसके लिये निधी रखी जाती है । उस निधी से लायब्ररी का मेटेनन्स का निजी काम होना चाहिये यह अपेक्षित भी है और वह नियमीत काम मेंटेनन्स का नगरसेवक की सूचना के आधार पर प्रशासन ने करना चाहिये ऐंसे भी निर्देश है । प्रशासन के निवेदन मे केवल सिद्धार्थ वाचनालय की सूचना संबंधित अधिकारी को दी गयी है, नेताजी सुभाषचंद्र बोस वाचनालय का जो विषय है उसके बारे मे मुझे भी एक व्यक्तीगत फोन आया था । उन्होने मुझे बताया की वहापर छत गिर गयी है वहापर कारवाई करना आवश्यक है बडे प्रमाण मे बच्चे वहा पढने के लिये आते है, मै प्रशासन को निर्देश देता हु सभी हमारे झोन के जो सहा.आयुक्त है इन्होने अपने क्षेत्र के सभी वाचनालय का एक बार निरीक्षण करना चाहिये, महानगरपालिका के झोनल बजट मे शासकीय इमारती के दुरुस्ती के लिये पैसे रखे गये है, वाचनालय के लिये पैसे रखे गये है उस निधी का उपयोग करके जो वाचनालय की देखरेख हो सकती है वह करना चाहिये, अगर ॲडीशनल निधी की आवश्यकता लगती है तो उस दृष्टीसे केंद्रीयकृत व्यवस्था के माध्यम से एक अलग से प्रस्ताव सादर करे, वाचनालय अच्छे से चलने चाहिये, वाचनालयोका जिन महापुरुषों के नाम हमने दिये है उसके अनुरुप उसका कार्यक्रलाप भी होना चाहिये, इसपर प्रशासन विशेष रुप से ध्यान दे, कही अगर निधी की आवश्यकता पडती है प्रस्ताव बनाकर के आयुक्त महोदय के पास रखे प्रशासन के माध्यम से इसमे निधी उपलब्ध कराने का पुर्ण रुप से विश्वास हम दिलाते है,

**प्रश्न क्र २५३** :- प्र.क्र. ३७ रविंद्रनगर येथील उद्याना संदर्भात प्रश्न

निगम आयुक्त :- वितरीत केल्याप्रमाणे

**प्रश्न क्र २५४** :- रमाई घरकुल योजनेअंतर्गत मनपा खाता क्र २१९/४७६०१३६१३०२ मधील शिल्लक व व्याज अशी एकुण किती रक्कम शिल्लक आहे या संदर्भातील प्रश्नावर

निगम आयुक्त :- वितरीत केल्याप्रमाणे

श्री.जितेंद्र घोडेस्वार :- मा.महापौरजी, रमाई घरकुल योजनेअंतर्गत मनपा खाता क्र २१९/४७६०१३६१३०२ मधील शिल्लक व व्याज अशी एकुण किती रक्कम शिल्लक आहे व किती लोकांचे अर्ज शिल्लक आहे याबाबत मला प्रशासनाकडून उत्तर मिळाले आहे त्यामध्ये सांगण्यात आले आहे की शिल्लक - १.३६ कोटी, व्याज – ७.४० कोटी, एकुण शिल्लक रक्कम ८.७६ कोटी, तसेच झोन क्र ०१ ते १० मधील एकुण ४०४७३ अर्ज मंजुरीकरीता शिल्लक आहेत. रमाई घरकुल योजना ही राज्यशासनाची योजना आहे त्यानंतर ती महानगरपालिकेला टेकओव्हर करण्यात आली . नागपूर शहराच्या हद्दीमध्ये जवळपास ३० लक्ष लोकसंख्या आहेत त्यामध्ये मागासवर्गीय लोक ५ ते ६ लक्ष लोकसंख्या राहतात त्यांच्याकडुन महानगरपालिकेला कराच्या रुपात पैसे मिळतात परंतु जे अल्प भुधारक आहे त्यांना आर.एल. लेटर मिळाले नाही. आर.एल. लेटर मिळण्याची कार्यवाही महानगरपालिकेतर्फे अनेक वर्षापासून सुरु आहे. त्यांच्याकडे सर्व डॉक्युमेंट तसेच टॅक्स भरल्याचा पुरावा असल्यानंतर सुध्दा महानगरपालिका त्यांचे पुनर्वसन करीत नाही. ज्या लोकांना संस्थेमार्फत दिले आहे त्या संस्थेचे कर्मचारी सर्वेक्षण करीत नाही आणि टाळाटाळ करण्याचा प्रयत्न करीत आहे. व्याजाच्या संदर्भात पहिला हप्ता २०१८ -२०१९ ला दिला आहे. अनुसुचित जातीमध्ये किती प्रवर्ग येतात त्यासंदर्भात माहिती देण्यात यावी. पहिला हप्ता दिल्यानंतर दुसरा हप्ता मिळाला नाही त्यामुळे लाभार्थ्यांनी जी घरे बांधली होती ती पडुन गेली आहे. तो व्यक्ती जर किरायाच्या घरात राहत असेल आणि वर्षाकाठी जर त्यांचे ३० ते ४० हजार रुपये जात आहे त्यांचे नुकसाण

होत आहे. असेल तर महानगरपालिकेला अनुदान रुपामध्ये ४० करोड रुपये दिले त्याचे नियोजन करीत असतांना ज्यांचे घरे पडले आहे त्यांना सर्वप्रथम लाभ दयायला पाहिजे होते.

महापौर :- प्रशासनाने उत्तर दयावे.

कार्यकारी अभियंता (श्रीमती सोनाली चव्हाण) :- मा.महापौरजी, आपल्याकडे रमाई घरकुल योजनेमध्ये ४१ करोड रुपये आले होते त्यापैकी शिल्लक आजच्या तारखेला १ कोटीच्या जवळपास आहे. त्याला खर्चाची परवानगी शासनाला मागितली आहे. तेव्हा पैशाचे वाटप करता येईल.

महापौर :- शेवटचा पाठपुरावा कोणत्या तारखेचा आहे

कार्यकारी अभियंता (श्रीमती सोनाली चव्हाण) :- मा.महापौरजी, आठ दिवसापुर्वी मुख्य अभियंता यांच्या स्वाक्षरीने पत्र शासनाला पाठविले आहे.

महापौर :- खर्चाच्या रकमेची विल्हेवाट करण्यासाठी शासनाचे निकष काय आहे. या संदर्भात शासनाचे काय निर्देश आहे.

कार्यकारी अभियंता (श्रीमती सोनाली चव्हाण) :- मा.महापौरजी, वाटप करण्यासाठी शासनाचे निकष नाही कंस्ट्रक्शन स्टेजप्रमाणे प्लींथ लेव्हल पर्यत १ लाख रुपये, स्लॅप लेव्हलपर्यत २ लाख रुपये आणि ते क्लीअर झाल्यानंतर ५० हजार रुपये आपण त्यांना वाटप करतो.

महापौर :- व्याजाची जी ६० कोटी ४० लक्ष रुपये आपल्याकडे जमा आहे या करीता शासनाचे निकष काय आहे. बाकी महानगरपालिकेला शासनाने पैसे दिले असेल तर त्याची विल्हेवाट करण्यासाठी शासनाचे काय निकष आहे. याकरीता शासनाने कोणते निर्देश दिले आहे.

कार्यकारी अभियंता (श्रीमती सोनाली चव्हाण) :- मा.महापौरजी, व्याजाचे पैसे जे असतात ते शासनला परत करावे लागतात परंतु आपण ४० करोड रुपये ऑलरेडी मागितले आहे आपल्याकडे जे अर्ज मंजूर झाले आहे आदयाप ते मिळाले नाही म्हणुन व्याजाची रक्कम खर्च करण्याची परवानगी शासनाला मागितली आहे.

श्री.धर्मपाल मेश्राम :- मा.महापौरजी,अशा पध्दतीचे शासनाचे कोणतेही निकष नाही. व्याजाचे पैसे १ कोटी ४० लक्ष रुपये आपल्याकडे जमा आहे ते खर्च करण्यासाठी शासनाकडे परवानगी मागण्याचे निकष आहे काय ? असेल तर कोणते आहे. अशा पध्दतीचे काही दिशानिर्देश आहे किंवा काही परिपत्रक आहे काय पैसे खर्च करण्यासाठी त्या संदर्भात माहिती देण्यात यावी.

कार्यकारी अभियंता (श्रीमती सोनाली चव्हाण) :- मा.महापौरजी, कार्यकारी अभियंता (श्रीमती सोनाली चव्हाण) :- मा.महापौरजी, महाराष्ट्र शासनाकडुन पैसे आपल्याला प्राप्त होतात म्हणुन पत्र पाठवुन त्यांची परवानगी मागितली आहे.

श्री.धर्मपाल मेश्राम :- मा.महापौरजी, महाराष्ट्र शासनाला परवानगी मागण्याची गरज काय आहे. आपली यंत्रणा सक्षम नाही आहे काय ? जर तुमच्याकडे मंजूर प्रकरणे प्रलंबित आहे तर महाराष्ट्र शासनाकडे पनवानगी मागण्याची गरज काय आहे.

अधिक्षक अभियंता (श्री.अजय पोहेकर) :- मा.महापौरजी, शासनाकडुन जे प्रस्ताव येतात किंवा शासनाकडुन जे प्रलंबित केसेसचे वाटप शिल्लक असेल तर ती बाब शासनास परत करावे अशी प्रथा आहे.

श्री.धर्मपाल मेश्राम :- मा.महापौरजी, महानगरपालिका नोडल एजन्सी आहे की नाही. हा सर्व विषय प्रथेवर चालणार आहे काय ?

श्री.जितेंद्र घोडेस्वार :- मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन, व्याजाच्या रकमेची विल्हेवाट

करण्याच्या संदर्भात पत्र टाकले आहे. महानगरपालिकेला घरकुल योजना २०१४ पासुन सुरु झाली. ४५०० लोकांचे अर्ज प्रलंबित आहे. सर्वेक्षण सुध्दा बरोबर केल्या गेले नाही आणि अशा स्थितीमध्ये व्याजाची रक्कमेचे काय करावे या संदर्भात शासनाशी पाठपुरवा केलेला आहे. यामध्ये प्रशासन किती दिरंगाई करीत आहे. नागपूर शहरामध्ये घरकुलाची आवश्यकता आहे.

महापौर :- मा.सदस्य श्री.जितेंद्र घोडेस्वार तुमचा पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन काय आहे ते सांगण्यात यावे, भाषण करु नये.

श्री.जितेंद्र घोडेस्वार :- मा.महापौरजी, लाभार्थ्यांना लाभ मिळण्यासाठी प्रशासनाने किती वेळा शासनाशी पाठपुरवा केला आहे किती वेळा पत्र देण्यात आले आहे.

महापौर :- प्रशासनाने माहिती दयावी.

कार्यकारी अभियंता (श्रीमती सोनाली चव्हाण) :- मा.महापौरजी, आपण आतापर्यंत समाजकल्याण विभागाला ५ ते ६ पत्र निधी मिळण्यासंदर्भात दिले आहे. पालकमंत्री महोदयाकडे सुध्दा याकरीता मागणी करण्यात आली आहे की रमाई घरकुल योजनेकरीता आम्हाला निधीची आवश्यकता आहे त्याकरीता आपल्यामार्फत पाठपुरावा करावा त्याकरीता पालकमंत्री महोदयांना सुध्दा पत्र दिलेले आहे.

महापौर :- शासनाकडुन आपल्याला शेवटची निधी केव्हा आली.

कार्यकारी अभियंता (श्रीमती सोनाली चव्हाण) :- मा.महापौरजी, सन २०२०-२०२१ मध्ये दीड कोटी रुपये मिळाले आहे.

श्री.अनिल गेंडरे :- मा.महापौरजी, घरकुल योजना के तहत निधी न मिलने से बहोत सारे लाभार्थीयोको घर के बाहर किराये से रहना पड रहा है इस संदर्भ मा.महापौरजी आप निर्देश देकर के लाभार्थ्यांयोंको जल्द से जल्द निधी उपलब्ध कराने की कोशीष किजीये।

महापौर :- विषय अत्यंत गंभीर असल्यामुळे प्रशासनाने या विषयाची दखल घ्यावी, या विषयासंदर्भात सखोल अहवाल पत्रासहीत पालकमंत्री महोदयांना सुध्दा देण्यात यावे, सोबतच संबंधित विभागाला हालाखीची स्थिती सांगण्यात यावी की, दोन-दोन वर्षापासून पहिली किस्त दिल्यानंतर लोकांना पैसे दिलेले नाही त्यामुळे लोकांना घराबाहेर लागत आहे ही परिस्थिती बघता लवकरात लवकर निधी महानगरपालिकेला दयावी, अशा स्वरुपाचे पत्र देऊन ताबडतोब शासनासोबत पाठपुरावा करावा, आवश्यकता पडली तर स्वत: निगम आयुक्तांनी याकडे लक्ष दयावे आणि ही निधी उपलब्ध करुन घेण्यासाठी जे काही सर्वकक्ष प्रयत्न करण्याचे निर्देश हे सभागृह देत आहे.

महापौर :- प्रशासनाने लक्षवेधीचे वाचन करावे.

निगम सचिव :- मा.महापौरजी, मा.सदन, मा. माजी स्थायी समिती सभापती श्री.विजय झलके यांची लक्षवेधी आपल्याकडे प्राप्त झालेली आहे. सभा कामकाज नियम १ एक्स अंतर्गत महोदय, नागपूर महानगरपालिका अंतर्गत नगररचना विभागाच्या माध्यमातून अनेक वेळा अनेक जागेंचा बदल करण्याच्या संदर्भात प्रस्ताव असतात अशा प्रस्तावास मा.सभागृहाने मान्यता दिली असुन शासन स्तरावर प्रस्ताव दिले आहे. असे एकुण किती प्रस्ताव अनेक वर्षापासून प्रलंबित आहे. तसेच नगररचना विभागाची जबाबदारी काय आहे याबाबत लक्षवेधी स्वीकारुन प्रशासनाची भुमिका काय आहे. माझी लक्षवेधी उपरोक्त नियमांच्या १ एक्स नुसार स्वीकृत करावी, धन्यवाद.

श्री.विजय झलके :- मा.महापौरजी, नागपूर महानगरपालिका नियम १ एक्स अन्वये नगररचना विभागाच्या एकंदरीत कामकाजाबाबत लक्षवेधी दिलेली आहे. नगररचना विभागाच्या माध्यमातून अनेक वेळा अनेक जागेच्या बदलाच्या संदर्भात प्रस्ताव आहे ते आपण सभागृहाच्या मान्यतेने कलम ३७ च्या

माध्यमातून राज्य शासनाकडे पाठवित असतो. अनेक वेळा लक्षात आलेले आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, पॉइंट ऑफ ऑर्डर, प्रत्येक सदस्याला लक्षवेधी सुचना देण्याचा अधिकार आहे कलम १ एक्स अनुषंगाने ही सुचना दिलेली आहे मा.महापौरजी, माझी विनंती आहे की अशा निवेदनावर कुठलीही चर्चा करु नये प्रशासनाने एकदा निवेदन करावे. कामकाज नियमावलीमध्ये भाषण करता येत नाही. प्रशासनाला निर्देश दयावे की मा.सदस्यांच्या लक्षवेधीवर प्रशासनाने निवेदन करावे. प्रशासनाकडे जर उत्तर नसेल तर प्रशासनाने पुढच्या सभेमध्ये लक्षवेधीवर विस्तृत निवेदन केले पाहिजे असा नियम आहे. जो सदस्य अशा नोटीसव्दारे लक्षवेधी सुचना देतो त्याला अशा प्रस्तावावर भाषण करण्याचा अधिकार नाही सभा कामकाज नियमावलीप्रमाणे.

महापौर :- प्रशासनाने उत्तर दयावे.

सहा.संचालक (श्री.गेडाम) :- मा.महापौर महोदय, सन्माननिय सदस्य श्री.विजय झलके यांनी सादर केलेल्या लक्षवेधी प्रमाणे २००१ प्रमाणे मंजूर विकास आराखडा हा १० वर्षाकरीता प्रस्तावित करण्यात येतो तो मंजूर करुन महाराष्ट्र प्रादेशिक नियम व नगररचना अधिनियमातील कलम ३अन्वये विकास घडवुन शासनाकडून मंजूर किंवा ना मंजूर करण्यात येते. विकास योजनेच्या कुठल्याही भागात फेरबदल करण्याकरीता महाराष्ट्र प्रादेशिक नियम व नगररचना अधिनियमातील कलम ३७ अन्वये फेरबदलाचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात येते. गेल्या ५ वर्षामध्ये एकुण २४ फेरबदलाचे प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविण्यात आलेले आहेत. त्यापैकी एकाही प्रस्तावाची राजपत्रातील अधिसूचना झालेली नाही. एखादया फेरबदलाच्या प्रस्तावास मंजूर करणे किंवा नामंजूर करण्याचा अधिकार हा राज्य शासनाचा आहे. महाराष्ट्र प्रादेशिक नियम व नगररचना अधिनियम १९६६ अन्वये फेरबदलाचे प्रस्ताव विहीत वेळेत निकाली काढले पाहिजे असे नमुद नाही. एखादया खाजगी प्रकरणाचा पाठपुरावा घ्यायचा असेल किंवा तसे पत्र प्राप्त झाल्यास तशा प्रकारे शासनाला कळविता येईल, फेरबदल हा खाजगी व सार्वजनिक प्रयोजनार्थ राहु शकतो. गेल्या ५ वर्षात जी प्रकरणे राज्य शासनाला सादर केलेली आहे ती सार्वजनिक प्रयोजनार्थ व खाजगी प्रयोजनार्थ आहे. खाजगी प्रयोजनार्थ पाठपुरावा करण्याची आवश्यकता नाही. सार्वजनिक प्रयोजनासाठी फेरबदल प्रस्तावासंदर्भात दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने पाठपूरावा करता येईल. एखादा प्रस्ताव राज्य शासनाने निकाली काढला नाही त्याचा पाठपुरावा करण्यात येईल किंवा नव्याने ठराव घेऊन पुन्हा राज्य शासनास प्रस्ताव सादर करण्यात येईल

महापौर :- किती सार्वजनिक प्रस्ताव राज्य शासनाकडे प्रलंबित आहेत.

सहा.संचालक (श्री.गेडाम) :- मा.महापौर महोदय, एकुण २० सार्वजनिक प्रस्ताव राज्य शासनाकडे प्रलंबित आहेत व एकुण ४ खाजगी प्रयोजनाचे फेरबदलाचे प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहेत.

महापौर :- काय स्थिती आहे सार्वजनिक प्रस्तावाची.

सहा.संचालक (श्री.गेडाम) :- मा.महापौर महोदय, प्रस्ताव राज्य शासनाकडे प्रलंबित आहेत.

श्री.विजय झलके :- मा.महापौरजी, गेल्या ५ वर्षापासून २४ पैकी २० प्रकरण जर सार्वजनिक आहे व ४ प्रकरण खाजगी आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- पॉइंट ऑफ ऑर्डर मा.महापौरजी, पिंटु झलके साहेबांना जर या संदर्भात विस्तृत चर्चा करायची असेल तर कामकाज नियमावलीतील अन्य नियमांचा आधार घेऊन प्रश्न उपस्थित करायला पाहिजे. यावर प्रशासनाचे निवेदन संपल्यानंतर चर्चा अपेक्षित नाही नियमावलीमध्ये तसा उल्लेख आहे त्यामुळे मा.महापौरजी आपण अशा चर्चेला परवानगी देऊ नये अशी मी आपणांस विनंती करतो.

श्री.अविनाश ठाकरे :- मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन, मा.पिंटु झलके यांनी लक्षवेधी उपस्थित

केली त्यावर प्रशासनाने निवेदन केले या निवेदनातील काही गोष्टी सुटल्या आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- पॉइंट ऑफ ऑर्डर मा.महापौरजी, सभा कामकाज नियमावलीतील कलम १ एक्स मध्ये आयुक्तांस संक्षिप्त निवेदन करता येईल त्यानंतर अशा निवेदनावर कोणतीही चर्चा करता येणार नाही असे नियमावलीमध्ये आहे त्यामुळे नियमावलीच्या बाहेर जाऊन जर आपल्याला कामकाज करायचे असेल तर माझी काही हरकत नाही.

श्री.अविनाश ठाकरे :- मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन, चर्चा या शब्दाची व्याप्ती खुप मोठी व वेगवेगळी आहे. या ठिकाणी मा.सदस्य श्री.विजय झलके यांनी जो मुद्या मांडला आहे त्यामध्ये प्रशासनानी उत्तर दिल्यानंतर त्यांना त्या उत्तरामध्ये काही कमी आढळुन आली आहे. श्री.विजय झलके आणि प्रशासन यांच्यामधील संवाद होता परंतु त्यामध्ये आता प्रफुल्लजी गुडधे चर्चा करीत आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, मी कामकाज नियमावलीचा हवाला दिलेला आहे. आपण सत्तापक्ष नेत्यांचे निवेदन ऐकुण घेतले आहे. मा.महापौरजी आपण यथायोग्य निर्णय दयावा. जी ही प्रथा पुढे सुध्दा आपल्याला अशी चालविता येईल. माझ्या ज्ञानाप्रमाणे जे काही सभा कामकाज नियमावलीमध्ये आहे ते असे आहे. ठाकरे साहेबांनी सुध्दा या ठिकाणी निवेदन केले आहे. मा.महापौरजी आपण या संदर्भात आपला निर्णय दयावा.

श्री.अविनाश ठाकरे :- मा.महापौरजी श्री.प्रफुल्ल गुडधे अतिशय बुध्दीवान आहे त्याबद्यल आमच्या मनात तिळमात्र शंका नाही आणि सिनीअर नगरसेवक आहे परंतु चर्चा या शब्दाची व्याप्ती जी आहे ती वेगळी आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, आपण निर्णय दयावा.

महापौर :- प्रशासनानी लेखी स्वरुपात सूचना मा.सदस्य, श्री.विजय झलके यांच्यापर्यंत पोहचविण्याची व्यवस्था करावी, त्या उत्तरांशी मा.सदस्य श्री.विजय झलके सहमत नसेल तर त्यांनी पुन्हा नियमाच्या दुस-या पध्दतीचा वापर करुन या सभागृहापुढे पुन्हा प्रश्न आणावे, मला प्रश्न वाचल्यानंतर असे वाटते कि, नगररचना विभागाचे जे काम आहे ते डी.पी.मध्ये असलेले जे रिझर्व्हेक्षण कायम करुन घेण्याचे त्यांचे नियमित काम असावयास पाहिजे. आणि डी.पी. मधले जे डी.पी. रोड असो, क्रिडांगण असो, गार्डन असो, डी.पी. रिझर्व्हेक्षणचे वर्क एक्झीक्युट करण्यासाठी जो पाठपुरावा शासनाकडे व्हावयास पाहिजे तो पाठपुरावा होतांना दिसत नाही, मागील ५ ते १० वर्षात या विभागाच्या माध्यमातुन एक तरी प्रस्ताव डी.पी. रोडसाठी शासनाने पैसे द्यावे असा गेलेला नाही. नगररचना विभागाचे निर्माण यासाठी झालेले आहे कि या विभागाच्या माध्यमातुन डी.पी. मध्ये असलेले रिझर्व्हेक्षण कायम करायचे त्या प्रकारचे काम नगररचना विभाग करीत नसेल तर आयुक्तांना असे निर्देश देण्यांत येते कि, या सर्व कामाकरीता एका अधिकारी किंवा कर्मचा-यांची चुकी नाही, सर्व विभागाने मिळुन हे काम करावयास पाहिजे. आणि असे लक्षात येत आहे कि, सद्यस्थितीत सहा.संचालकांनी निर्देश दिल्यानंतर सुध्दा त्या विभागाचे कर्मचारी ऐकत नाही व काम करीत नाही, या प्रश्नाच्या अनुषंगाने आयुक्तांना निवेदन करतो कि, त्यांनी या विषयावर सहा.संचालक, नगररचना विभाग यांच्यासोबत चर्चा करावी, आणि जे कर्मचारी कामचुकारपणा करीत आहे, अश्या कर्मचा-यांवर कार्यवाही करण्याचे निर्देश आजच्या प्रश्नाच्या माध्यमातुन प्रशासनाला देण्यांत येत आहे.

महापौर :- स्थगण प्रस्तावाचे प्रशासनाने वाचन करावे.

निगम सचिव :- मा.महापौरजी, मा.सदस्या सौ.आभा पांडे यांचा स्थगण प्रस्ताव प्राप्त झालेला आहे. कोव्हीड महामारी अंतर्गत मनपा प्रशासनाव्दारे केलेली कार्यवाही तसेच घेतलेले निर्णय व शासनाकडुन

प्राप्त निधीतून खरेदी केलेल्या वस्तु, तसेच महानगरपालिकेतील या संदर्भातील माहिती प्रशासनाव्दारे मनपाच्या पटलावर न ठेवल्यामुळे आरोग्य विषयक भावना लक्षात घेता या विषयावर चर्चा करुन ठोस निर्णय घेण्याकरीता २२-०६-२०२१ च्या सभेत स्थगण प्रस्ताव सादर करीत आहेत त्याकरीता माझा स्थगण प्रस्ताव वरील नियमाच्या १ ट नुसार घेऊन सभागृहात चर्चा घडवुन आणावी ही विनंती. दुस-या नंबरचा स्थगण प्रस्ताव प्राप्त झाला आहे श्री.जितेंद्र घोडेस्वार यांचा आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर जन्मशताब्दी स्मारक व संशोधन केंद्र यशवंत स्टेडीयम, धंतोली येथील स्मारकाच्या बांधकामाबाबत २९ वर्षातील प्रलंबित प्रश्नाबाबत निर्णय घेण्यास्तव स्थगण प्रस्ताव सादर करीत आहेत. कृपया माझा स्थगण प्रस्ताव वरील नियमांच्या १ ट नुसार स्वीकृत करुन सभागृहात चर्चा घडवुन आणावी ही विनंती. तिसरा नंबरचा स्थगण प्रस्ताव मा.माजी स्थायी समिती सभापती श्री.विजय झलके यांचा स्थगण प्रस्ताव प्राप्त झाला आहे. नागपूर महानगरपालिका नगररचना विभागाच्या संदर्भात नागरिकांच्या वारंवार तक्रारी मला प्राप्त होत असुन सदर विभागामधून मनपा च्या आर्थिक उत्पन्नात मोठया प्रमाणात घट झाल्याचे आढळुन येत आहे. या विभागाच्या कामकाजाबाबत तसेच प्राप्त तक्रारी व अडचणीवर सखोल चर्चा होऊन निर्णय घेण्यास्तव स्थगण प्रस्ताव सादर करीत आहे कृपया हा स्थगण प्रस्ताव वरील नियमांच्या १ ट नुसार स्वीकृत करुन सभागृहात चर्चा घडवून आणावी ही नम्र विनंती. मा.विरोधी पक्ष नेता श्री.तानाजी वनवे यांचा स्थगण प्रस्ताव प्राप्त झालेला आहे. नागपूर शहरातील अंबाझरी उद्यानाजवळ असलेले डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन हे कोणाच्या परवानगीने पाडण्यात आलेले आहे. ही अत्यंत गंभीर बाब आहे. अंबाझरी येथे दिक्षाधम्म भवन बनविण्यात आले होते ते कोणाच्या परवानगीने तोडण्यात आले आहे त्या संबधाने दिनांक २२-०६-२०२१ च्या सभेत चर्चा करण्याकरीता स्थगण प्रस्ताव देण्यात येत आहे.

महापौर :- उपरोक्त स्थगण प्रस्तावामध्ये सर्वात पहिला स्थगण प्रस्ताव कोणाचा आलेला आहे.

निगम सचिव :- मा.महापौरजी, मा.सदस्या सौ.आभा पांडे याचा सर्वात प्रथम स्थगण प्रस्ताव आलेला आहे.

महापौर :- मा.सदस्या सौ.आभा पांडे यांचा स्थगण प्रस्ताव स्वीकृत करण्यात येत आहे. सौ.आभाताई पांडे यांनी चर्चेची सुरुवात करावी.

निगम सचिव :- मा.महापौरजी, एक निवेदन देऊ इच्छिते मा.सत्तापक्ष नेते श्री.अविनाशजी ठाकरे यांनी कलम ३१९ (२) अन्वये कोव्हीड महामारीमध्ये प्रतिबंधीत क्षेत्राकरीता प्रशासनाकडुन जे आदेश निर्गमीत करण्यात आले होते तसेच वित्तीय खर्च करण्यात आले होते त्या संदर्भात प्रशासनाने सभागृहा च्या पटलावर अहवाल ठेवलेला आहे. त्या संदर्भातील हा विषय होता.

श्री.अविनाश ठाकरे :- मा.महापौरजी, आता सचिवांनी सांगितले की, कोव्हीडच्या संदर्भात कलम ३१९ (२) अन्वये प्रशासनाने जी काही प्रतिबंधात्मक कारवाई कोव्हीडच्या वेळी केलेली आहे ती माहिती महानगरपालिकेच्या सभागृहाच्या पटलावर ठेवलेली आहे. मा.सदस्या सौ.आभा पांडे यांचा सुध्दा स्थगण प्रस्ताव याच विषयावर आहे त्याला सुध्दा मान्यता प्रदान केलेली आहे. मला असे वाटते मा.महापौरजी प्रशासनाच्या वतीने जो अहवाल सभागृहाच्या पटलावर आलेला आहे आणि सर्व नगरसेवकांची या विषयावर चर्चा करण्याची इच्छा आहे. परंतु तो अहवाल आज पटलावर आल्यामुळे सर्व नगरसेवकांपर्यंत पोहचला नाही त्यामुळे सर्व सभागृहाला माझी विनंती आहे. हा विषय अत्यंत महत्वाचा असुन या विषयावर सर्व नगरसेवकांचा सहभाग घेण्याची इच्छा आहे त्यामुळे या अहवालाची कॉपी सर्व नगरसेवकांकडे पाठवावी, हा स्थगण प्रस्ताव कायम ठेऊन या स्थगण प्रस्तावावर एक वेगळी चर्चा आपण ८ दिवसामध्ये घ्यावी अशी माझी आपणांस विनंती आहे.

सौ.आभा पांडे :- मा.महापौरजी, मा.सत्तापक्ष नेता काय म्हणत आहे हे मला नाही माहिती परंतु मी आज स्थगण प्रस्ताव लावलेला आहे व नियमाप्रमाणे पहिला स्थगण प्रस्ताव हा माझा आल्यामुळे आपण तो स्थगण प्रस्ताव स्वीकृत केला आहे म्हणुन या स्थगण प्रस्तावाला मंजूरी देऊन जी स्वीकृती प्रदान केली आहे त्या प्रमाणे यावर चर्चा होणे अतिआवश्यक आहे असे माझे आपणांस निवेदन आहे. मा.सत्तापक्ष नेते जे म्हणत आहे ते सभागृह बोलत आहे काय ?

श्री.अविनाश ठाकरे :- मा.महपौरजी, सभागृह नियमाप्रमाणे चालेल सौ.आभाताई पांडे यांचा प्रस्ताव सर्वात पहिला आल्यामुळे त्यांच्या स्थगण प्रस्तावाला स्वीकृती प्रदान केली आहे परंतु मा.सदस्या सौ.आभाताई पांडे यांचे कंन्फुजन दिसत आहे. मी असे म्हटलेले नाही की आभाताईंनी यावर चर्चा करु नये, मी असे म्हटले आहे की या स्थगण प्रस्तावावर चर्चा करावयाची असल्यास प्रशासनाने दिलेला अहवाल सभागृहाच्या पटलावर आहे मा.सदस्य त्याचा अभ्यास करतील आज आभाताई त्यांचे भाषण देतील व त्यांनी त्या अहवालाचे वाचन केले आहे त्या आधारावर ते बोलु शकतील परंतु सर्व नगरसेवकांना त्या अहवालाची माहिती नाही त्यामुळे चर्चेमध्ये नगरसेवक सहभागी होऊ शकणार नाही. त्यामुळे माझी आपणांस विनंती आहे की या प्रस्तावासंदर्भात एक विशेष सभा घेण्यात यावी.

सौ.आभा पांडे :- पॉइंट ऑफ ऑर्डर मा.महापौरजी, दुस-या सदस्यांना या विषयावर अभ्यास करायचा असेल किंवा बोलायचे असेल तर त्यांनी वेगळा प्रश्न लावावा, वेगळी लक्षवेधी लावावी किंवा वेगळा स्थगण प्रस्ताव लावावा.

श्री.जितेंद्र घोडेस्वार :- मा.महापौरजी नियमानुसार कामकाज चालत आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर जन्मशताब्दी स्मारकाच्या प्रस्तावाच्या संदर्भात नियम सांगितल्या जाते त्यावर चर्चा करीत नाही. २९ वर्षापासून हा मुद्या प्रलंबित आहे.

(बेल)

महापौर :- मा.सदस्यांनी चार स्थगण प्रस्ताव दिले. नियमाप्रमाणे कोणता स्थगण प्रस्ताव स्वीकारायचा व कोणता स्थगण प्रस्ताव नाही स्वीकारायचा हा अधिकार महापौरांचा असतो आणि दिलेल्या नियम व निकषानुसार प्रथम आलेला स्थगण प्रस्ताव स्वीकृत केला आहे आणि तो स्थगण प्रस्ताव विषयाला अनुसरुन असल्यामुळे सध्याची जी कोरोनाची साथ आहे त्याला अनुसरुन असल्यामुळे त्याला प्राथमिकता देऊन स्वीकृती प्रदान केली आहे. जेव्हा मा.सदस्या,सौ.आभा पांडे स्थगन प्रस्ताव आला तेव्हा प्रशासनाकडुन सभागृहाच्या पटलावर याची संपुर्ण माहिती ठेवण्यांत येत आहे, हया बाबीची माहिती कोणत्याही मा.सदस्यांना नव्हती, आणि सभागृहामध्ये जी माहिती ठेवण्यात आलेली आहे त्या माहितीचे संबंधित पत्र सत्तापक्ष नेत्यांनी आभाताईंच्या पत्राच्या पूर्वी दिलेले आहे, म्हणुन ती सुध्दा प्रासंगिकता यामध्ये आहे. हा विषय अत्यंत महत्वाचा असल्यामुळे या विषयावर सर्व मा.सदस्यांना चर्चा करायची आहे अशी सत्तापक्षाची मागणी आहे. आपण या विषयाला अनुसरुन फक्त हया विषयासाठी एक सभागृह बोलावु, यामध्ये मा.सदस्या सौ.आभाताईचा स्थगन प्रस्ताव कायम राहिल, जे प्राथमिक भाषण होईल तो सौ.आभा पांडे यांचेच होईल, चर्चेची सुरुवात आभाताईच करतील, नंतर त्या स्थगन प्रस्तावावर बाकी सर्व मा.सदस्य आपली बाजु मांडु शकतील, यादृष्टीने हा जो अहवाल प्रशासनाने दिलेला आहे त्या अहवालची प्रत प्रत्येक मा.सदस्यांपर्यंत पहोचली पाहिजे, यादृष्टीने प्रशासनानी येत्या दोन दिवसात कार्यवाही करावी, असे निर्देश देण्यांत येते, मा.सदस्या सौ.आभा पांडे यांनी सादर केलेल्या स्थगन प्रस्तावावर बुधवार दिनांक ३०/०६/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता चर्चा घेण्यात येईल या अनुषंगाने विभागाने परिपुर्ण माहितीसह सभेत उपस्थित राहावे.

श्रीमती आभा पांडे :- मा.महापौरजी, धन्यवाद मा.महापौरजी, परंतु माझी एक सूचना आहे. कोव्हीड संबंधी जेवढे अनुदान केंद्र शासनाचे व राज्य शासनाचे आले होते त्या मधुन जी वस्तु खरेदी केली होती त्या वस्तु खरेदीची सर्व नस्ती आपल्या जवळ ठेवाव्यात किंवा मा.आयुक्तांनी आपल्या जवळ ठेवाव्यात. मा.महापौरजी, स्थगण प्रस्ताव लावायची वेळ आली नसती परंतु मा.आयुक्त हे माझ्या आरोपावर कधीही गंभीर दिसले नाही. सर्व नस्त्या, वर्कऑर्डरची नोंदवही ती सिलबंद करुन आपल्या कडे किंवा आयुक्तांकडे ठेवली पाहिजे हे माझे निवेदन आहे.

महापौर :- मा.सदस्या सौ.आभाताई पांडे यांनी जे निवेदन केले आहे .

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, सभागृहापुढे जे चार स्थगण प्रस्ताव आलेले आहे. त्यापैकी एक स्थगण प्रस्ताव आपण स्वीकारला आहे. स्थगण प्रस्ताव कशा पध्दतीने स्वीकारायचा त्याची नियमावली या ठिकाणी निश्‍चित केलेली आहे. मा.महापौरांना विशेषाधिकार आहे आणि अत्यंत निकडीच्या व सार्वजनिक हिताच्या गोष्टीवर मा.महापौरजी निर्णय घेतात या निर्णयाच्या अनुषंगाने कुठलाही एक स्थगण प्रस्ताव स्वीकारता येतो. त्यामुळे सर्व सदस्यांना पुढच्या सभेपासून हा भ्रम निर्माण होईल फर्स्ट कम फर्स्ट म्हणजे पहिल्यांदा जो स्थगण प्रस्ताव देईल त्याचा स्थगण प्रस्ताव स्वीकारला जाईल अशी काही प्रथा व परंपरा नाही. सार्वजनिक निकड  ही मा.महापौरजी यांनी निश्‍चित करायची आहे हा मा.महापौरांचा विशेषाधिकार आहे. त्या विशेषाधिकाराचा वापर करत ती सार्वजनिक व महत्वाची बाब आपण निश्‍चित केली आहे हे मान्य आहे. परंतु दुसरे असे आहे की स्थगण प्रस्तावावर सभा स्थगित करुन पुढच्या सभेमध्ये चर्चा करता येते काय ? तर मा.महापौरजी, या नियमावलीमध्ये असे होत नाही. स्थगण प्रस्तावावर सभा स्थगित करुन दुस-या सभेत चर्चा करता येते असे या नियमावलीमध्ये नाही त्यामुळे स्थगण प्रस्तावावर मा.आभाताई पांडे यांना चर्चा करायची असेल तर मा.महापौरजी माझी विनंती आहे की स्थगण प्रस्तावावर मा.आभाताई पांडे यांनी चर्चा करावी, मा.सत्तापक्ष नेता यांनी कलम  ३१९ (२) अन्वये जी माहिती मागितली ते त्यांनी वयक्तीक मागितली सभागृहाला या संदर्भात काहीही माहिती नव्हती. त्या संदर्भात आलेल्या अहवालावर जर आपल्याला चर्चा करायची असेल तर हे सभागृह निश्‍चितपणाने नव्याने चर्चा करण्यासाठी सक्षम आहे. त्यामुळे मा.आभाताई पांडे यांचा स्थगण प्रस्ताव स्वीकृत केलेला आहे त्यामुळे आभाताई पांडे यांना चर्चा करण्याची परवानगी दयावी.

महापौर :- निगम सचिवांनी सत्तापक्ष नेत्यांच्या पत्राचे  वाचन करावे. की सत्तापक्ष नेत्यांनी जी माहिती मागितली आहे ती त्यांनी वयक्तीक मागितली आहे की सभागृहाच्या पटलावर ठेवण्यासाठी मागितली आहे.

निगम सचिव :- मा.महापौरजी, मा.सत्तापक्ष नेते श्री.अविनाश ठाकरे यांच्या पत्राचे मी वाचन करीत आहे. वरील विषयाच्या अनुषंगाने विषय महानगरपालिका अधिनियम ३१९ (२) अंतर्गत दुर्धर साथीच्या रोगासाठी केलेल्या कार्यवाहीची माहिती नागपूर महानगरपालिकेला कळविण्याकरीता प्रशासनाला आदेश देण्याबाबत. वरील विषयाच्या अनुषंगाने विषय महानगरपालिका अधिनियम ३१९ (२) नुसार दुर्धर साथीच्या रोगाला प्रतिबंधीत करण्याकरीता नागपूर मनपा प्रशासनातर्फे जी कार्यवाही करण्याकरीता जे आदेश निर्गमित करण्यात येतात किंवा वित्तीय खर्च करण्यात येतो त्या संबंधीची माहिती प्रशासनातर्फे महानगरपालिकेला अवगत करणे बंधनकारक आहे. परंतु गेल्या वर्षभरापासून नागपूर मनपा प्रशासनातर्फे या संबंधीची कोणतीही माहिती महानगरपालिकेला दिल्याचे आढळुन आले नाही. मागील आठवडयात जेष्ठ नगरसेविका सौ.आभा पांडे यांनी दुर्धर साथीच्या रोगाच्या प्रतिबंधात्मक कारवाई करीता औषधी व साहित्य खरेदीमध्ये गैरप्रकार झाल्याचे आरोप केले आहे त्यामुळे महानगरपालिकेची जनमानसात प्रतिमा मलीन होत आहे. या सर्व बाबींचा विचार करता महानगरपालिका अधिनियम ३१९ (२) नुसार सुचित

केल्याप्रमाणे दुर्धर साथीच्या रोगाच्या प्रतिबंधा करीता निर्गमित केलेले आदेश नागपूर मनपा प्रशासनातर्फे खरेदी केलेले साहित्य व औषधी तसेच प्रतिबंधात्मक कार्यवाही संबंधी विस्तृत अहवाल येणा-या महानगरपालिकेच्या महासभेच्या पटलावर ठेवण्याकरीता महानगरपालिका प्रशासनाला आदेश देण्यात यावे, ही विनंती.

महापौर :- सत्तापक्ष नेता श्री.अविनाश ठाकरे यांनी वयक्तीक माहिती मागितली नाही. नियमाप्रमाणे सभागृहाच्या पटलावर समस्त नगरसेवकांच्या माहितीकरीता ठेवायला सांगितले आहे. मा.सदस्या सौ.आभा पाडे यांनी प्रेसमध्ये जे आरोप लावले आहे ते अत्यंत गंभीर असल्यामुळे सर्वांसमोर येणे अतिआवश्यक आहे असे निवेदन सुध्दा त्यामध्ये आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, त्यांच्या निवेदनाप्रमाणे प्रशासनाने त्यांचा अहवाल निश्चितपणाने ठेवलेला आहे. त्यावर स्वतंत्र चर्चा निश्चितपणाने करता येते, मात्र स्थगण प्रस्ताव स्वीकृतीचा जो आपला नियम आहे. त्यामुळे आभाताईचा जो प्रस्ताव आहे तो आपण नामंजूर करावा आणि सत्तापक्ष नेता श्री.अविनाश ठाकरे यांच्या निवेदनावर प्रशासनाने जी माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवली आहे त्यावर स्वतंत्र चर्चा करावी. व दुसरा सार्वजनिक व निकडीचा स्थगण प्रस्ताव आपण स्वीकारला पाहिजे ही माझी विनंती आहे.

महापौर :- मा.सदस्य श्री. प्रफुल्ल गुडधे येथे चार स्थगण प्रस्ताव सादर करण्यात आले आहे त्यातील सर्वात निकडीचा विषय म्हणुन मला कोरोनाचा विषय आढळला, आणि करोना हा तीन विषयापेक्षा जास्त निकडीचा व आपातकालीन विषय नाही आहे जर आपली अशी सूचना असेल तर आपण तसे मांडावे की करोनावर चर्चा नाही झाली पाहिजे ही प्राथमिकता या सभागृहाची नाही हे आपण सांगावे मी त्यावर निर्णय घेतो. उरलेल्या तीन प्रस्तावापेक्षा करोनावर चर्चा करणे हे प्राथमिकतेचे नाही असे आपण सांगावे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, मी अत्यंत विनम्रतेणे आपल्या निदर्शनास आणुन देतो आपण जो प्रस्ताव स्वीकारलेला आहे तो आपल्या विशेषाधिकाराचा भाग आहे आणि तो विशेषाधिकार आम्ही मान्य करतो. दूसरा महत्वाचा प्रश्न आहे जर आपण स्थगण प्रस्ताव स्वीकारला तर चर्चा त्याच दिवशी केली पाहिजे असा नियम सांगते, मी तीच आठवण आपल्याला करुन देत आहे. या ठिकाणी मला दुसरे काही म्हणायचे नाही.

श्री.अविनाश ठाकरे :- मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन ही जी नियमावली ज्यावेळी तयार केली तेव्हा महानगरपालिकेच्या सदस्यामधुन काही सदस्यांची निवड केली व त्या सदस्यांच्या माध्यमातून ती नियमावली तयार केली व त्या नियमावलीला नागपूर महानगरपालिकेची मान्यता आहे. आज सभागृहाचे असे मत आहे आपल्या माध्यमातून की जो विषय मा.आभाताई पांडे यांनी मांडलेला आहे त्यावर सर्वकष चर्चा होईल, जर आभाताई पांडे यांनी चर्चा केली व त्यांनी विषय ठेवला व त्या विषयामध्ये जर पुर्ण सदस्यांचा सहभाग असेल तर चर्चा अजुन चांगली होईल अजुन चांगले त्यामधुन आऊटपुट येईल, त्यामुळे नियम हे सभागृहानेच तयार केले आहे तर त्यामध्ये गैर काय आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, मी फक्त नियम सांगितला आहे.

श्री.तानाजी वनवे :- मा.महापौरजी, पॉइंट ऑफ ऑर्डर स्थगण प्रस्तावावर जर वेगळी चर्चा होणार असेल तर जो स्थगण प्रस्ताव मी सादर केला आहे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे जे अंबाझरी येथील भवन तोडण्यात आले होते त्या संदर्भात सुध्दा आपण चर्चा करावी.

श्री.जितेंद्र घोडेस्वार :- मा.महापौरजी, निश्चितरुपाने नियमाप्रमाणे स्थगण प्रस्ताव स्वीकारण्याचा विशेषाधिकार मा.महापौरांना आहे ते आम्हाला मान्य आहे परंतु २९ वर्षापासून जो प्रलंबित विषय आहे त्या

स्थगण प्रस्तावावर चर्चा करण्यात यावी. हा जागतिक लेव्हलचा विषय आहे.

श्री.अविनाश ठाकरे :- मा.महापौरजी मला असे वाटते की आपण या विषयावर रुलिंग दिलेले आहे त्या रुलिंगचे सन्मान सर्व सदस्यांकडून व्हावा अशी मी आपणांस विनंती करीत आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, सत्तापक्ष नेत्यांनी या ठिकाणी जो मनोदय व्यक्त केला आहे मी सुध्दा माझी बाजु या ठिकाणी मांडलेली आहे. आपण जे रुलिंग दिलेले आहे ते आम्ही मान्य करतो मात्र कामकाज नियमावलीमध्ये जो उल्लेख केला आहे तो आपल्या निर्देशनास आणुन दिला आहे त्याच्या पलीकडे आमचे काहीच म्हणणे नाही.

महापौर :- सन्माननिय सर्व सदस्यांनी या विषयावर भरपुर चर्चा केली यामध्ये मुळ विषय असा आहे की ज्यांचा स्थगण प्रस्ताव आहे त्यांनी स्वत: संमत्ती दिली आहे की पुढच्या तारखेला त्या स्वत: चर्चा करायला तयार आहे त्यामुळे पुढच्या सभागृहात आपण ही कारवाई करावी या दृष्टीने मी निगम सचिवांना निवेदन करतो तसेच दोन वैयक्तीक प्रस्ताव सभागृहात आलेले आहे त्याचे वाचन निगम सचिवांनी सभागृहाच्या समोर करावे.

निगम सचिव :- मा.महापौरजी, मा.सदन, सुचक – मा.अविनाशजी ठाकरे, सत्तापक्ष नेते तसेच अनुमोदक – श्री.प्रकाशजी भोयर, स्थायी समिती सभापती, आणि मा.नगरसेवक श्री.विजयजी झलके, विषय – २२-०६-२०२१ च्या सर्वसाधारण सभेत खालील ठराव मंजूरीकरीता ठेवण्यात आले आहे. विषयाची प्रस्तावणा – मा.महोदय, मा.सर्वोच्च न्यायालय यांनी याचिका क्र ९८० सन २०१९ विकास गवळी विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर या प्रकरणातील दिनांक ०४ मार्च, २०२१ च्या आदेशामध्ये नमुद केलेले इतर मागासवर्गीय (OBC) आरक्षण मा.सर्वोच्च न्यायालयाकडून पुर्नस्थापित होत नाही तोपर्यंत महाराष्ट्रतील सर्व स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या होणा-या निवडणुकांना महाराष्ट्र शासनाव्दारे तातडीने स्थगती दयावी असा पत्रातील मासदस्यांचा मानस आहे. अस्तीत्वात असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या संपुष्टात येणा-या कार्यकाळाला कायदयाच्या तरतुदीनुसार यथा योग्य मुदतवाढ देण्यात यावी, या ठरावास मा. सभागृहाने मंजूरी प्रदान मंजूरी प्रदान करावी, ही विनंती.

दुसरी प्रस्तावना आहे त्यामध्ये सुध्दा सुचक – मा.अविनाशजी ठाकरे, सत्तापक्ष नेते तसेच अनुमोदक – श्री.प्रकाशजी भोयर, स्थायी समिती सभापती, आणि मा.नगरसेवक श्री.विजयजी झलके,
मा.महोदय नागपूर शहर हे हिरवेगार शहर म्हणुन पुर्ण भारतात प्रसिध्द आहे. नागपूर शहरातील पर्यावरणाची योग्य ती काळजी घेण्याच्या दृष्टीने प्राणवायु सोडणारे वृक्ष लागवड करणे ही काळाची गरज आहे. म्हणुन कडूनिंबाचे झाड "राष्ट्रीय वारसा वृक्ष" म्हणुन नागपूर महानगरपालिकेने घोषित करावे अशी मी सभागृहात आपणाव्दारे विनंती करतो तसेच कडूनिंबाच्या झाडांचे जास्तीत जास्त प्रमाणात वृक्षारोपन करण्याचे शहरातील सर्व संस्था व नागरिकांना प्रशासनाव्दारे आव्हान करावे, करीता या ठरावास मा.सभागृहाने मंजूरी प्रदान करावी, ही विनंती.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, प्रस्ताव क्रमांक १ ला मी अंशत: मंजूरी प्रदान करण्याची मी सूचना करतो. ओबीसी आरक्षण जो पर्यत निर्धारीत होत नाही तो पर्यत स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका पुढे ढकलण्यात या प्रस्तावाला मा.सभागृहाने मान्यता प्रदान करावी अशी मी आपणांस विनंती करतो. सोबतच त्याचा कार्यकाळ वाढविण्यात यावा या संदर्भात मला असे वाटते की ती आपल्या अधिकार क्षेत्रातील बाब नाही. नियम काय आहे त्या अनुषंगाने राज्य शासन निर्णय घेईल, आपल्या कार्यकाळ संपल्यानंतर जर मुदतवाढ देण्याची आपल्या कायदयामध्ये जर तरतुद असेल तर सरकार देईलच परंतु नसेल तर नियमाच्या विरुध्द ठराव करणे योग्य होणार नाही. त्यामुळे तो भाग वगळुन बाकी सर्व विषयाला मंजूरी प्रदान करावी.

श्री.तानाजी वनवे :- पॉइंट ऑफ ऑर्डर मा.महापौरजी, विषय असा आहे की एकदा महानगरपालिकेचे जे ओबीसी चे आरक्षण आहे ते झाल्याशिवाय निवडणुका घेणे हे काही उचित होणार नाही. जे राज्य सरकारच्या अधिकार क्षेत्रात मुदतवाढीचा विषय आहे त्यामुळे त्याला मंजूरी देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

श्री.अविनाश ठाकरे :- मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन या ठरावाचे परत एकदा वाचन व्हावे कारण की त्या ठरावामध्ये महानगरपालिकेतर्फे महाराष्ट्र शासनालाच विनंती करण्यात आलेली आहे. की तातडीने स्थगिती दयावी हा मा.सदस्यांचा मानस आहे आणि अस्तित्वात असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यकाळ हा संपुष्टात येणारच आहे. त्यामुळे आपल्या अधिकार क्षेत्राची जाणीव ठेऊनच हे केलेले आहे. त्यामुळे या संपुर्ण ठरावाला मंजूरी प्रदान करावी अशी माझी सभागृहाला विनंती आहे.

श्री.तानाजी वनवे :- मा.महापौरजी, ओबीसी चे आरक्षण अबाधीत ठेऊनच त्यामध्ये निवडणुका घ्यावा असा आपण त्यामध्ये उल्लेख करावा.

महापौर :- ओबीसी आरक्षण जो पर्यंत मा.सर्वोच्च न्यायालयाकडुन पुर्नस्थापित होत नाही, तो पर्यंत महाराष्ट्रातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये होणा-या निवडणुकांना महाराष्ट्र शासनानी स्थगिती द्यावी, असा सभागृहातील सदस्यांचा मानस आहे, अस्तित्वात आलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या संपुष्टात येणा-या कार्यकाळाला यथायोग्य मुदतवाढ देण्यांत यावी, या ठरावाला महानगरपालिकेची ही सभा मंजूरी प्रदान करते असे निवेदन राज्य सरकारला करण्यांत येत आहे. जो पर्यंत ओबीसी आरक्षण पुन्हा कायम होत नाही तो पर्यंत निवडणुका होऊ नये, मुदतवाढ हा शब्द यासाठी यामध्ये वापरण्यात आला आहे कि, संवैधानिक नियमाअंतर्गत जे काही शासनाचे नियम निकष असेल त्या अंतर्गत विचार करण्यांत यावा, ही त्या मागची पार्श्वभुमी दिसते. मला असे वाटते कि हा विषय ओबीसी समाजाशी निगडीत आहे आणि हा प्रत्येकाचा स्वभिमानाचा विषय आहे, या विषयाला आपण सर्वांनी मंजूरी द्यावी, असे मी निवेदन करतो.

**<u>ठराव क्र.९३</u> :- मा.सदस्यांनी सादर केलेला खालील ठराव मा.महापौरजी यांनी दिलेल्या निर्देशानुसार निगम सचिवांनी सभागृहात वाचून दाखविला व त्यास सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने मान्यता प्रदान केली.**

**<u>ठराव</u>**

मा. सर्वोच्च न्यायालय यांनी याचीका क्रमांक ९८० सन २०१९ विकास गवळी विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर या प्रकरणातील दि. ४ मार्च २०२१ च्या आदेशामध्ये नमुद केलेल्या इतर मागासवर्गीय (O.B.C.) आरक्षण मा. सर्वोच्च न्यायालयाकडून पुनर्स्थापीत होत नाही तोपर्यंत महाराष्ट्रातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या होणा-या निवडणुकांना महाराष्ट्र शासनाने संवैधानिक चौकटीच्या आतमध्ये राहून पुढे ढकलाव्या तसेच अस्तित्वात आलेले स्थानिक स्वराज्य संस्थेचा संपुष्टात येणा-या कार्यकाळाला कायद्याच्या तरतूदीनुसार यथा योग्य मुदतवाढ देण्यात यावी. असा सभागृहातील मा.सदस्यांचा मानस आहे. करीता या ठरावास मा.सभागृहाने मंजूरी प्रदान करावी. ही विनंती

सुचक/- अविनाश ठाकरे
सत्तापक्ष नेते, म.न.पा. नागपूर

अनुमोदक/- १) प्रकाश भोयर

अध्यक्ष,स्थायी समिती, मनपा नागपूर
२) विजय झलके
नगरसेवक, मनपा नागपूर

महापौर :- दुसरा विषयाचे वाचन केले आहे त्यामध्ये असे आहे की कडुनिंबाचे जे झाड आहे कडूनिंबाच्या झाडाला “राष्ट्रीय वारसा वृक्ष” म्हणुन घोषित करण्यांत यावे, यावर आपण निर्णय घेवु शकत नाही, म्हणुन हा विषय आपण केंद्र सरकारकडे पाठवित आहे, कडूनिंबाचे महत्व सगळयांना माहित आहे म्हणुन या विषयाला आपण सर्वांनी मंजूरी प्रदान करावी,

**ठराव क्र. ९४ :- मा.सदस्यांनी सादर केलेला खालील ठराव मा.महापौरजी यांनी दिलेल्या निर्देशानुसार निगम सचिवांनी सभागृहात वाचून दाखविला व त्यास सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने मान्यता प्रदान केली.**

**ठराव**

नागपूर शहर हे हिरवेगार शहर म्हणून पुर्ण भारतात प्रसिध्द आहे. नागपूर शहरातील पर्यावरणाचे योग्य ती काळजी घेण्याच्या दृष्टीने प्राणवायू सोडणारे वृक्ष लागवड करणे ही काळाची गरज आहे. म्हणून कडुनिंबाचे झाड "राष्ट्रीय वारसा वृक्ष" म्हणून नागपूर महानगरपालिकेने घोषीत करावे अशी मी या सभागृहात आपणाद्वारे विनंती करतो. तसेच कडूनिंबाचे झाडांचे जास्तीत जास्त प्रमाणात वृक्षारोपण करण्याचे शहरातील सर्व संस्था व नागरीकांना प्रशासनाद्वारे आव्हान करावे या ठरावात मनपा सभागृहाने मंजूरी प्रदान करावी ही विनंती.

सुचक/- अविनाश ठाकरे
सत्तापक्ष नेते, म.न.पा. नागपूर

अनुमोदक/- १) प्रकाश भोयर
अध्यक्ष,स्थायी समिती, मनपा
नागपूर
२) विजय झलके
नगरसेवक, मनपा नागपूर

महापौर :- शिक्षण विभागाकडुन एक सुचना आलेली आहे त्या सुचनांचे वाचन निगम सचिवांनी करावे.

निगम सचिव :- मा.महापौरजी, विषय मनपा ठराव क्र ५८ दिनांक २२-०६-२०२१ मध्ये स्थायी समितीने मंजूरी अंती ठरावामधुन वगळण्याबाबत. शिक्षण विभागाने सादर केलेल्या ठरावाच्या प्रारुपमध्ये स्थायी समितीची मंजूरी अंती असे अनावधानाने झालेले आहे ठराव क्र ५८ दिनांक २२-०६-२०२१ च्या ठरावात स्थायी समितीची मंजूरी अंती असे नमुद केलेला मजकूर वगळण्याबाबत विनंती, शिक्षणाधिकारी महानगरपालिका नागपूर.

महापौर :- विषयाचे वाचन करीत असतांना जी सूचना केलेली आहे ती सूचना ग्राहय धरावी.

**ठराव क्र.:९५ :-- नागपूर महानगरपालिका, महासभेचे खालील कार्यवृत्त कायम करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून कायम करण्यास मान्यता प्रदान केली.**

1. म.न.पा. सर्वसाधारण सभा दिनांक 19.03.2021 सकाळी 11.00 वाजता चे कार्यवृत्त
2. म.न.पा. स्थगित सर्वसाधारण सभा दिनांक 25.03.2021 सकाळी 11.35 वाजता चे कार्यवृत्त
3. म.न.पा. स्थगित सर्वसाधारण सभा दिनांक 25.03.2021 दुपारी 12.45 वाजता चे कार्यवृत्त

**ठराव क्र.९६/वि.क्र.५३ :**-मौजा–लेन्ड्रा येथील पंजाबराव कृषी विद्यापीठाच्या जागेवर नागपूर **{नगर रचना विभाग}** महानगरपालिकेची वस्तीगृह बांधकामाची पुर्नपरवानगी न घेता केलेल्या बांधकामावर प्रशमन शुल्क व मलनिस्सारण वाहिनी जोडणीकरीता रू. 13,26,317/– एवढया रक्कमेचे मागणी शुल्क पंजाबराव कृषी विद्यापीठ संस्थेला भरणेबाबत सुट देण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**ठराव क्र.९७/वि.क्र.५४ :- {साप्रवि}** महाराष्ट्र शासनाकडुन प्राप्त झालेल्या शासन निर्णय, अध्यादेश, परिपत्रक मनपा सभागृहाच्या माहितीस्तव सादर.

महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई दिनांक १६ एप्रिल, २०२१ अन्वये दिव्यांग व्यक्ति हक्क अधिनियम, २०१६ (The Rights of Persons With Disalbilities Act २०१६) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने राज्यातील महानगरपालिका आस्थापनेवरिल गट-अ ते गट-ड संवर्गातील पदे दिव्यांगासाठी सुनिश्चित करणेबाबतच्या प्रश्नाची सभागृहाने एकमताने नोंद घेतली.

**ठराव क्र.९८/वि.क्र.५५ :- {नगर रचना विभाग}** विकास योजना नागपूर.

नागपूर येथील मौजा – धंतोली न.भु.क्र. 327, शिट क्र. 20, बी, नझुल भुखंड क्र. 30 (क्षेत्र सुमारे 925.00 चौ.मी.) लगतचे धारकाचे मिळकतीप्रमाणे रहिवासी विभागातुन वगळुन वाणिज्य विभागात समाविष्ट करण्याकरीता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 (1) अंतर्गत विकास योजनेतील फेरबदलाबाबत.

नागपूर शहराची सुधारीत विकास योजना (भागशः) नगर विकास विभागाकडील अधिसुचना क्र. टिपीएस–2496–2643–सीआर–300–97–युडी–9 दि. 07.01.2000 अन्वये मंजूर झालेली असुन सदर विकास योजना दि. 01. 03.2000 पासुन अमलात आलेली आहे. तसेच पुर्नप्रसिध्द् विकास योजना शासनाकडील अधिसुचना क्र. टिपीएस–2400–1628–सीआर–200–2000–युडी–9 दि.10.09.2001 नुसार मंजूर करण्यात आलेली असुन उक्त विकास योजना दि. 21.09.2001 पासुन अंमलात आलेली आहे. तसेच शासनाचे नगर विकास विभागाची अधिसुचना क्र. टिपीएस–2401/855/सीआर–76–9, दि. 27.02.2002 अन्वये नागपूर सुधार प्रन्यासच्या अखत्यारीतील सात योजना सोडून उर्वरित नागपूर शहराकरीता महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले होते.

शासन निर्णय क्र. टिपीएस–2419/1419/प्र.क्र.154/2019/नवि–9, दि. 27 ऑगस्ट 2019 अन्वये नागपूर सुधार प्रन्यासच्या अखत्यारीतील सात योजने मधील क्षेत्राकरीता महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरण म्हणुन घोषीत केलेले आहे. नागपूर शहराच्या मंजूर विकास योजनेतील मौजा – धंतोली, न.भु.क्र. 327, शिट क्र. 20 बी, नझुल भुखंड क्र. 30 (क्षेत्रनुसार–925.00 चौ.मी.) मधील जागा नागपूर शहराचे मंजूर विकास योजनेत रहिवासी वापराकरीता दर्शविलेली आहे. सदर

भुखंडा खालील जागा रहिवासी विभागातुन वगळून वाणिज्य विभागात समाविष्ट करण्याबाबत अर्जदाराने शासनास विनंती केल्याचा अनुषंगाने नागपूर महानगरपालिकेने सादर केलेल्या अहवालानुसार शासनाने नागपूर शहराकरीता मंजूर विकास योजनेतील रहिवासी विभागाकरीता दर्शविलेली जागा रहिवासी विभागातुन वगळुन वाणिज्य विभागात समाविष्ट करण्यास्तव महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 (1) खालील फेरबदलाची संपूर्ण वैद्यानिक कार्यवाही पुर्ण करून फेरबदल प्रस्ताव अंतिम मंजूरीसाठी शासनास सादर करणेबाबत नागपूर महानगरपालिकेला निर्देशीत केले आहे.

नागपूर शहराच्या मंजूर सुधारीत वि. यो. नागपूर मधील मौ. धंतोली येथील नगर भूमापन क्र. 3210, शिट क्र. 20 बी., नझूल भू. क्र. 30 (क्षेत्र सुमारे 925.00 चौ.मी.) च्या आजुबाजूचा वाणिज्य विभाग विचारात घेता अर्जदाराची विषयांकित जागा रहिवास विभागातून वगळून वाणिज्य विभागात समाविष्ट करणेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37(1) अन्वये फेरबदल प्रस्ताव कार्यान्वित करणेकरीता मा. सभागृहाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर उक्त फेरबदलाची सुचना शासन राजपत्रात, दैनिक वृत्तपत्रात प्रसिध्द करून त्यावरील आक्षेप/हरकतीवर योग्य निर्णय घेऊन उक्त फेरबदल प्रस्ताव शासनास मंजूरीस्तव सादर करण्याकरीता मा. आयुक्त म.न.पा. नागपूर यांना अधिकार प्रदान करण्याबाबत मंजूरी देण्याचा प्रश्न विचारात घेणेस्तव प्रस्ताव सादर करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**ठराव क्र.९९/वि.क्र.५६ :-** स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत नागपूर शहरातील एकीकृत **{सार्व. आ. अभि. विभाग}** घनकचर व्यवस्थापनाकरीता शासनाद्वारे सुधारीत सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) रु. २६८.६८ कोटीस शासन निर्णय दिनांक १४ मे २०२१ अन्वये मंजूरी प्राप्त झाल्याची माहिती सादर करण्याबाबत.

नागपूर शहरातील एकीकृत घनकचरा व्यवस्थापना अंतर्गत तयार केलेला प्रस्तावित रु. ३३९.०० कोटीचा विस्तृत प्रकल्प अहवाल (DPR) स्वच्छ भारत मिशन अंतर्गत अनुदान प्राप्त करण्याकरीता शासनास सादर करण्यात आला होता. या प्रकल्प अहवालास मा. स्थायी समिती ठराव क्र. ७०४, दि. २९.०२.२०१६ व मनपा महासभा ठराव क्र. २३४, दि १८.०३.२०१६ अन्वये मंजूरी प्राप्त आहे. सदर प्रकल्प अहवाल राज्यशासनाकडे राज्यअभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) मुंबई येथे सादर केला असता त्यांनी सुचविल्याप्रमाणे सुधारीत प्रकल्प अहवाल रु. ३०८.०० कोटीचा तयार करण्यात आला व मंजूरीस्तव सादर करण्यात आला. या अहवालास स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत उच्चाधिकार समितीने (HPC) दिनांक २२.०३.२०१६ च्या बैठकीमध्ये मंजूरी प्रदान केली आहे. तथापि योजनेच्या निकषानुसार तो रु. २८८.६८ कोटी वर सिमीत आहे. तसेच VGF म्हणून रु. ९६.२२ कोटींच्या निधीला मंजूरी दिलेली असून निधी मनपास उपलब्ध झालेला आहे.

दरम्यान काळात, नविन मार्गदर्शिका (SWM Rules २०१६, हस्तपुस्तिका, घनकचरा प्रबंध नियम २०१६) आणि नागपूर शहरातील घनकचरा व्यवस्थापनेत सुधार आणण्यासाठी मुळ प्रकल्प अहवालातील काही नविन घटकांत बदल करणे आवश्यक होते. त्यानुसार अहवालामध्ये काही नविन घटक घेण्यात आले व काहींच्या संख्येत बदल करण्यात आला होता. मुळ प्रकल्प अहवालातील कच-यापासून उर्जा निर्मितीचा प्रकल्प (Waste to Energy) व्यवहार्य नसल्याचे लक्षात आल्याने रद्द करण्यात येवून त्याऐवजी Bio-gas to Bio-CNG, Decentralized MRF, MRF & RDF Centralized plant at Bhandewadi २०० MTPD, Green waste processor at garden या घटकांचा अंतर्भाव करण्यात आला. सुधारीत प्रकल्प अहवालास स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत उच्चाधिकार समितीने (HPC) रु. २६६.६३ कोटींच्या राशीस दिनांक ३०.०८.२०१९ च्या बैठकीमध्ये मंजूरी प्रदान केली आहे.

मुळ मंजूर केलेला अहवाल व मंजूर सुधारीत अहवालाचा तुलनात्मक तक्ता घटक व राशी

पुढीलप्रमाणे आहे.

| Sr. No. | विवरण (Original DPR) | रक्कम )कोटी) | विवरण (Revised DPR) | रक्कम (कोटी) |
|---|---|---|---|---|
| 01 | Primary Storage and Collection System | 4.26 | Primary Storage and Collection | 1.45 |
| 02 | Street Sweeping | 20.72 | Street Sweeping | 1.83 |
| 03 | Collection and Transportation | - | Collection and Transportation | 143.25 |
| 04 | **Waste Treatment and Processing** | | **Waste Treatment and Processing** | |
| A | Decentralised Composting | 7.88 | **Composting Plant @ 200 MTPD**<br>• Screening Machine<br>• Shredder<br>• Composting Pit Shed<br>• Material Recovery Facility | 6.00 |
| B | Construction & Demolition (C&D) | 21.00 | Construction and Demolition Waste treatment Plant (C&D) | 16.65 |
| C | Processing and Disposal through WtE including reallocation of existing waste) | 248.01 | **Hotel Waste, Market Vegetable Waste and Organic Waste to Bio Gas to Bio CNG Plant @ 100x3 MTPD and Refilling Station** | 75.00 |
| D | - | - | **Decentralised MRF at Zone levels**<br>• Pre Sorting Shed<br>• Storage Room<br>• Weighing Machine<br>• Rest Rooms etc. | 3.00 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| E | - | - | **MRF and RDF centralised plant at Bhandewadi @200 MTPD**<br>• Pre Sorting Section<br>• Preparatory Section<br>• Refinement Section<br>• RDF Section | 6.00 |
| F | - | - | Green Waste processor at Gardens | 6.00 |
| G | Incinerator for Disposal of Dead Animal Carcass | 2.39 | Animal Crematorium | 3.5 |
| | **Total** | 279.28 | **Total** | 116.15 |
| 4 | **Information and Communication Technology (ICT)** | 3.15 | **Information, Education & Communication (IEC)** | 5.00 |
| 5 | **Information, Education and Communication (IEC) Project for Awareness to Citizens** | 0.16 | **Information, Communication & Technology (ICT) for Existing Infrastructure** | 1.00 |
| 6 | **Environmental Compliance Cost** | 0.16 | - | |
| | **Total Cost IN Crores** | 307.73 | **Total Cost IN Crores** | 266.63 |

शहराच्या हद्दीत मोकळ्या जागांचा अभाव असून, जवळच्या रहिवाशांच्या विरोधाची शक्यता देखील नाकारता येत नाही म्हणून दिनांक 10 फेब्रुवारी 2020 रोजी झालेल्या बैठकीत, माननीय प्रधान सचिव, नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याशी झालेल्या विस्तृत चर्चेनंतर शहरातील घनकचरा व्यवस्थापन केंद्रीय पद्धतीने प्रक्रियान्वित व्हावा असे निर्देश देण्यात आले. यात ओला कचरा प्रक्रियेने खतनिर्मिती आणि सुका कचऱ्यासाठी साहित्यपुर्नप्राप्ती सुविधा (Material Recovery Facility) उभारण्याचे सांगण्यात आले. तसेच उत्तरदायित्व आणि पारदर्शकता वाढविण्यासाठी SCADA या तंत्रज्ञानाचा वापर करण्यात यावा असे ठरविण्यात आले. त्याअनुरूप पुन:श्च प्रस्तावित सुधारीत विस्तृत

प्रकल्प अहवालामध्ये कंपोस्टिंग, साहित्य पुर्नप्राप्ती सुविधा (Material Recovery Facility), आणि सॅनिटरी लँड फिल सुविधेच्या सहाय्याने सुलभ देखरेख व नियंत्रणासाठी केंद्रीकृत प्रक्रिया सुविधेसाठी नियोजन करणे आवश्यक असल्याने समावेश करण्यात आलेला असून त्यामधील सुधारीत घटक व आर्थिक दृष्टीने अनुदान विनियोगाचे विवरण खालीलमाणे प्रस्तावित करण्यात आले.

| अ. क्र. | विवरण | संख्या | युनिट | रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|
| 1 | **Primary Storage and Collection** | | | |
| **A** | Litter Bins (twin Bins) floor mounted with Stand | 1000 | Nos. | 12500000 |
| **B** | Garbage Bins (240 Ltrs) (Rectangular Bins floor mounted with Wheels) | 250 | Nos. | 2000000 |
| | **Sub Total** | | | 1,45,00000 |
| 2 | **Street Sweeping** | | | |
| **A** | Wheel barrows for collection of street sweeping waste | 1000 | Nos. | 5310000 |
| **B** | Hand Carts for collection of street sweeping waste | 1000 | Nos. | 13000000 |
| | **Sub Total** | | | 1,83,10000 |
| 3 | **Collection and Transportation** | | | |
| **A** | **Vehicles for Primary Collection**<br>(Door to Door Collection)<br>* E- Rickshaw / Motorised Vehicle<br>* Light Commercial Vehicles | 1 | Lot | 413800100 |
| **B** | **Vehicles for Secondary Collection and** | 1 | Lot | 220796432 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | **Transportation** | | | |
| | * Refuse Compactors | | | |
| | * Hook Loaders with Container | | | |
| **C** | **Common Setup** | 1 | Lot | 197880000 |
| | * Tippers | | | |
| | * Backhoe Loader | | | |
| | * Litter Bin Cleaning Vehicle | | | |
| | * Supervisor Vehicle | | | |
| | * Call Centre | | | |
| | * Mechanical Workshop for Vehicle Maintenance | | | |
| | * Domestic Hazardous Waste Collection Centre | | | |
| | * ICT | | | |
| | **Sub Total** | | | 83,24,76,532 |
| 4 | **Waste Treatment, Processing and Disposal** | | | |
| **A** | Construction and Demolition Waste treatment Plant (C&D) **@150 MTPD (Separate report attached)** | 1 | Unit | 166500000 |
| **B** | **Composting Plant @600MTPD** | 1 | Unit | 196500000 |
| | * Screening Machine | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | * Shredder | | | |
| | * Composting Pit Shed | | | |
| | * Material Recovery Facility | | | |
| C | **MRF and RDF centralized plant at Bhandewadi @ 380 MTPD** | 1 | Unit | 130000000 |
| | * Pre Sorting Section | | | |
| | * Preparatory Section | | | |
| | * Refinement Section | | | |
| | * RDF Section | | | |
| **D** | **Animal Crematorium** | 1 | Unit | 35000000 |
| **E** | **Green Waste Re-processor at Gardens** | 20 | Unit | 60000000 |
| **F** | **Development of Sanitary Landfill over the period of 15 years** | | | 1173465789 |
| | **Sub Total** | | | 1734965789 |
| 5 | **Information, Education & Communication (IEC)** | 1 | Unit | 50000000 |
| 6 | **Information, Communication & Technology (ICT) for Existing Infrastructure** | 1 | Unit | 10000000 |
| | **Sub Total** | | | 60000000 |
| | **Total** | | | 2686752321 |
| | **Say in Crores** | | | 268.68 |

सदरहू सुधारीत विस्तृत प्रकल्प अहवाल (DPR) शासनास सुधारीत प्रशासकीय मंजूरीस्तव दिनांक 12.06.2020 रोजी सादर करण्यात आला असता स्वच्छ भारत अभियान (नागरी) अंतर्गत गठीत उच्चाधिकार समितीच्या दिनांक 25.02.2021 च्या बैठकीत मान्यता प्रदान केली असून शासन निर्णय क्र. स्वमअ-2021/प्र.क्र.26(2)/नवि-34, दिनांक 14 मे 2021 अन्वये सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यांत आलेली आहे.

तसेच दिनांक 20.01.2020 च्या स्थगित सर्वसाधारण सभा कार्यवृत्त ठराव क्र. 33, 34 व 35 अन्वये 200 TPD composting, 150 TPD C&D आणि 200 MTPD MRF सेंटर उभारणेकरीता अनुक्रमे आजपावेतो करण्यात आलेल्या संपूर्ण प्रक्रियेस मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून नागपूर महानगरपालिकेची जागा तारण न ठेवता त्यावर निर्णय घेण्याचे संपूर्ण अधिकार निगम आयुक्त यांना प्रदान करण्यात येत असल्याबाबत मंजूरी प्रदान केलेली आहे. त्याअनुषंगाने यासोबतच DPR अंतर्भूत प्रमुख घटकांच्या निविदा प्रक्रिया सुरु करण्यात येत आहे.

उपरोक्तप्रमाणे घनकचरा व्यवस्थापन सुधारीत विस्तृत प्रकल्प अहवालास शासनाने सुधारीत प्रशासकीय मान्यता दिनांक 14 मे 2021 रोजी प्रदान केलेली असल्याने व विभागाद्वारे मंजूर DPR नुसार प्रमुख घटकांच्या निविदा प्रक्रिया सुरु करण्यात येत असल्याबाबतची माहिती मा. महासभेस सविनय सादर करण्यात येत आहे. उपरोक्त प्रश्न सभागृहाने विचारात घेतला

श्री.संदीप जाधव :- मा.महापौरजी, एकुण ३३९ कोटीचा हा डीपीआर होता हा कमी करुन २६८.६८ कोटीला मंजूरी मिळाली आहे. यामध्ये जवळपास ३८ कोटी रुपये कमी झालेले आहेत याचे कारण काय आहे.

महापौर :- प्रशासनाने उत्तर दयावे.

कार्यकारी अभियंता (श्री.मनोज तालेवार) :- मा.महापौरजी, शासनाकडे जो डीपीआर सादर केला होता त्या मध्ये शासनाचे पॉप्युलेशनच्या संदर्भातले काही निकष आहे त्या अनुषंगाने आपल्याला मंजूरी दिली आहे. तो जो प्रकल्प आहे त्याला २६६.६३ कोटी रुपये मंजूर केलेले आहे.

श्री.संदीप जाधव :- मा.महापौरजी, ३८ कोटी रुपये जे कमी करण्यात आले आहे ते कशामुळे कमी करण्यात आलेले आहे.

अति.आयुक्त (श्री.संजय निपाणे) :- मा.महापौरजी, जसे आता कार्यकारी अभियंता श्री.तालेवार यांनी सांगितले की आपण जरी मोठया रकमेचा प्रस्ताव पाठविला तरी लोकसंख्येच्या अनुपात प्रमाणे तो मंजूर होतो ही बाब होती त्याचप्रमाणे तिस-यांदा जेव्हा हा रिव्हाईज डिपीआर पाठविला त्यामध्ये ज्या गोष्टी आपल्याला करायच्या नव्हत्या त्यामुळे ती कॉस्ट डिलीट झाली आणि अंतिम २६६.६३ कोटी रुपयांवर तो मंजूर झाला आहे.

महापौर :- हा जो प्रस्ताव दिलेला आहे यामध्ये जो चार्ट दिला आहे त्यावर त्याचा उल्लेख आहे वेस्ट ऐनर्जी, बायोगॅस, बायो सिएनजी हे जे सर्व विषय आहे हे शक्य नसल्यामुळे यामध्ये लागणारे जे पैसे होते ते वगळल्यानंतर ही कॉस्ट कमी झालेली आहे असे प्रशासनाचे निवेदन आहे.

श्रीमती नंदाताई जिचकार :- मा.महापौरजी, आपण लिटर बिन्ससाठी १ कोटी २५ लक्ष रुपयांची रक्कम दिली आहे आतापर्यंत शहरामध्ये किती कोटीचे लिटर बिन्स लावले आहे व त्याची सध्या अवस्था काय आहे त्या संदर्भात निवेदन प्रशासनाने करावे.

उपायुक्त (श्री.राजेश भगत) :- मा.महापौरजी, १८०० लिटर बिन्स लावलेले होते त्यामधील काही

तुटलेल्या असल्यामुळे त्या भंगारमध्ये दिलेल्या आहे व काही लिटर बिन्स वापरामध्ये आहे.

श्रीमती नंदाताई जिचकार :- मा.महापौरजी, आपण जे लिटर बिन्स लावतो हे जनतेच्या पैशातून आपण लावतो आणि ते जर लोक चोरुन नेत असेल तर किंवा ते एका वर्षात गायब होत असेल तर तर लिटर बिन्सचा उपयोग काय ? पैशाचा आपण नासोळा का करायचा यावर प्रशासनाने काही विचार केला आहे काय ?

उपायुक्त (श्री.राजेश भगत) :- मा.महापौरजी, लिटर बिन्सचे आयुष्य जास्त राहत नाही व ज्या पध्दतीचा कचरा त्यामध्ये डंम्प केला जातो त्यामुळे ३ वर्षापेक्षा जास्त काळ आयुष्य राहत नाही. आता ज्या लिटर बिन्स लावायच्या आहे त्यामध्ये रहिवासी ऐरियामध्ये लावायच्या आहे. डीपीआर मध्ये तरतुद केली आहे की सर्व पार्किंगमध्ये लावल्या आहे.

श्रीमती नंदाताई जिचकार :- मा.महापौरजी, लिटरबिन्सच्या मेंटेनन्सची योजना काय आहे की या अशाच वाया जाणार आहे. अत्यंत निकृष्ट कॉलिटीचे आपण लिटरबिन्स लावत आहे ते लगेच तुटन जातात त्यामुळे त्याकडे लक्ष देण्याची गरज आहे.

उपायुक्त (श्री.राजेश भगत) :- मा.महापौरजी, या जया लिटर बिन्स आहे त्या सर्व झोनस्तरावर वानिज्यीक वापराकरीता त्याची व्यवस्था करण्यात येते.

वरील चर्चेनंतर स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत नागपूर शहरातील एकीकृत घनकचरा व्यवस्थापनाकरीता शासनाद्वारे सुधारीत सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) रु. २६८.६८ कोटीस शासन निर्णय दिनांक १४ मे २०२१ अन्वये मंजूरी प्राप्त झाल्याची माहिती सादर करण्याबाबत.

नागपूर शहरातील एकीकृत घनकचरा व्यवस्थापना अंतर्गत तयार केलेला प्रस्तावित रु. ३३९.०० कोटीचा विस्तृत प्रकल्प अहवाल (DPR) स्वच्छ भारत मिशन अंतर्गत अनुदान प्राप्त करण्याकरीता शासनास सादर करण्यात आला होता. या प्रकल्प अहवालास मा. स्थायी समिती ठराव क्र. ७०४, दि. २९.०२.२०१६ व मनपा महासभा ठराव क्र. २३४, दि १८.०३.२०१६ अन्वये मंजूरी प्राप्त आहे. सदर प्रकल्प अहवाल राज्यशासनाकडे राज्यअभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) मुंबई येथे सादर केला असता त्यांनी सुचविल्याप्रमाणे सुधारीत प्रकल्प अहवाल रु. ३०८.०० कोटीचा तयार करण्यात आला व मंजूरीस्तव सादर करण्यात आला. या अहवालास स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत उच्चाधिकार समितीने (HPC) दिनांक २२.०३.२०१६ च्या बैठकीमध्ये मंजूरी प्रदान केली आहे. तथापि योजनेच्या निकषानुसार तो रु. २८८.६८ कोटी वर सिमीत आहे. तसेच VGF म्हणून रु. ९६.२२ कोटींच्या निधीला मंजूरी दिलेली असून निधी मनपास उपलब्ध झालेला आहे.

दरम्यान काळात, नविन मार्गदर्शिका (SWM Rules २०१६, हस्तपुस्तिका, घनकचरा प्रबंध नियम २०१६) आणि नागपूर शहरातील घनकचरा व्यवस्थापनेत सुधार आणण्यासाठी मुळ प्रकल्प अहवालातील काही नविन घटकांत बदल करणे आवश्यक होते. त्यानुसार अहवालामध्ये काही नविन घटक घेण्यात आले व काहींच्या संख्येत बदल करण्यात आला होता. मुळ प्रकल्प अहवालातील कच-यापासून उर्जा निर्मितीचा प्रकल्प (Waste to Energy) व्यवहार्य नसल्याचे लक्षात आल्याने रद्द करण्यात येवून त्याऐवजी Bio-gas to Bio-CNG, Decentralized MRF, MRF & RDF Centralized plant at Bhandewadi २०० MTPD, Green waste processor at garden या घटकांचा अंतर्भाव करण्यात आला. सुधारीत प्रकल्प अहवालास स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत उच्चाधिकार समितीने (HPC) रु. २६६.६३ कोटींच्या राशीस दिनांक ३०.०८.२०१९ च्या बैठकीमध्ये मंजूरी प्रदान केली आहे.

मुळ मंजूर केलेला अहवाल व मंजूर सुधारीत अहवालाचा तुलनात्मक तक्ता घटक व राशी पुढीलप्रमाणे आहे.

| Sr. No. | **विवरण (Original DPR)** | **रक्कम )कोटी)** | **विवरण (Revised DPR)** | **रक्कम (कोटी)** |
|---|---|---|---|---|
| 01 | Primary Storage and Collection System | 4.26 | Primary Storage and Collection | 1.45 |
| 02 | Street Sweeping | 20.72 | Street Sweeping | 1.83 |
| 03 | Collection and Transportation | - | Collection and Transportation | 143.25 |
| 04 | **Waste Treatment and Processing** | | **Waste Treatment and Processing** | |
| A | Decentralised Composting | 7.88 | **Composting Plant @ 200 MTPD**<br>• Screening Machine<br>• Shredder<br>• Composting Pit Shed<br>• Material Recovery Facility | 6.00 |
| B | Construction & Demolition (C&D) | 21.00 | Construction and Demolition Waste treatment Plant (C&D) | 16.65 |
| C | Processing and Disposal through WtE including reallocation of existing waste) | 248.01 | **Hotel Waste, Market Vegetable Waste and Organic Waste to Bio Gas to Bio CNG Plant @ 100x3 MTPD and Refilling Station** | 75.00 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| D | - | - | **Decentralised MRF at Zone levels**<br>• Pre Sorting Shed<br>• Storage Room<br>• Weighing Machine<br>• Rest Rooms etc. | 3.00 |
| E | - | - | **MRF and RDF centralised plant at Bhandewadi** @200 **MTPD**<br>• Pre Sorting Section<br>• Preparatory Section<br>• Refinement Section<br>• RDF Section | 6.00 |
| F | - | - | Green Waste processor at Gardens | 6.00 |
| G | Incinerator for Disposal of Dead Animal Carcass | 2.39 | Animal Crematorium | 3.5 |
| | **Total** | 279.28 | **Total** | 116.15 |
| 4 | **Information and Communication Technology (ICT)** | 3.15 | **Information, Education & Communication (IEC)** | 5.00 |
| 5 | **Information, Education and Communication (IEC) Project for Awareness to Citizens** | 0.16 | **Information, Communication & Technology (ICT) for Existing Infrastructure** | 1.00 |
| 6 | **Environmental Compliance Cost** | 0.16 | - | |
| | **Total Cost IN Crores** | 307.73 | **Total Cost IN Crores** | 266.63 |

शहराच्या हद्दीत मोकळ्या जागांचा अभाव असून, जवळच्या रहिवाशांच्या विरोधाची शक्यता देखील नाकारता येत नाही म्हणून दिनांक 10 फेब्रुवारी 2020 रोजी झालेल्या बैठकीत, माननीय प्रधान सचिव, नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याशी झालेल्या विस्तृत चर्चेनंतर शहरातील घनकचरा व्यवस्थापन केंद्रीय पद्धतीने प्रक्रियान्वित व्हावा असे निर्देश देण्यात आले. यात ओला कचरा प्रक्रियेने खतनिर्मिती आणि सुका कचऱ्यासाठी साहित्यपुर्नप्राप्ती सुविधा (Material Recovery Facility) उभारण्याचे सांगण्यात आले. तसेच उत्तरदायित्व आणि पारदर्शकता वाढविण्यासाठी SCADA या तंत्रज्ञानाचा वापर करण्यात यावा असे ठरविण्यात आले. त्याअनुरूप पुन:श्च प्रस्तावित सुधारीत विस्तृत प्रकल्प अहवालामध्ये कंपोस्टिंग, साहित्य पुर्नप्राप्ती सुविधा (Material Recovery Facility), आणि सॅनिटरी लँड फिल सुविधेच्या सहाय्याने सुलभ देखरेख व नियंत्रणासाठी केंद्रीकृत प्रक्रिया सुविधेसाठी नियोजन करणे आवश्यक असल्याने समावेश करण्यात आलेला असून त्यामधील सुधारीत घटक व आर्थिक दृष्टीने अनुदान विनियोगाचे विवरण खालीलमाणे प्रस्तावित करण्यात आले.

| अ. क्र. | विवरण | संख्या | युनिट | रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|
| 1 | **Primary Storage and Collection** | | | |
| A | Litter Bins (twin Bins) floor mounted with Stand | 1000 | Nos. | 12500000 |
| B | Garbage Bins (240 Ltrs) (Rectangular Bins floor mounted with Wheels) | 250 | Nos. | 2000000 |
| | **Sub Total** | | | **1,45,00000** |
| 2 | **Street Sweeping** | | | |
| A | Wheel barrows for collection of street sweeping waste | 1000 | Nos. | 5310000 |
| B | Hand Carts for collection of street sweeping waste | 1000 | Nos. | 13000000 |
| | **Sub Total** | | | **1,83,10000** |
| 3 | **Collection and Transportation** | | | |
| A | **Vehicles for Primary Collection** | 1 | Lot | 413800100 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | (Door to Door Collection) | | | |
| | * E- Rickshaw / Motorised Vehicle | | | |
| | * Light Commercial Vehicles | | | |
| **B** | **Vehicles for Secondary Collection and Transportation** | 1 | Lot | 220796432 |
| | * Refuse Compactors | | | |
| | * Hook Loaders with Container | | | |
| **C** | **Common Setup** | 1 | Lot | 197880000 |
| | * Tippers | | | |
| | * Backhoe Loader | | | |
| | * Litter Bin Cleaning Vehicle | | | |
| | * Supervisor Vehicle | | | |
| | * Call Centre | | | |
| | * Mechanical Workshop for Vehicle Maintenance | | | |
| | * Domestic Hazardous Waste Collection Centre | | | |
| | * ICT | | | |
| | **Sub Total** | | | 83,24,76,532 |
| 4 | **Waste Treatment, Processing and Disposal** | | | |
| **A** | Construction and Demolition Waste treatment Plant (C&D) @150 **MTPD (Separate** | 1 | Unit | 166500000 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | **report attached)** | | | |
| B | **Composting Plant @600MTPD** | 1 | Unit | 196500000 |
| | * Screening Machine | | | |
| | * Shredder | | | |
| | * Composting Pit Shed | | | |
| | * Material Recovery Facility | | | |
| C | **MRF and RDF centralized plant at Bhandewadi @ 380 MTPD** | 1 | Unit | 130000000 |
| | * Pre Sorting Section | | | |
| | * Preparatory Section | | | |
| | * Refinement Section | | | |
| | * RDF Section | | | |
| D | **Animal Crematorium** | 1 | Unit | 35000000 |
| E | **Green Waste Re-processor at Gardens** | 20 | Unit | 60000000 |
| F | **Development of Sanitary Landfill over the period of 15 years** | | | 1173465789 |
| | **Sub Total** | | | 1734965789 |
| 5 | **Information, Education & Communication (IEC)** | 1 | Unit | 50000000 |
| 6 | **Information, Communication & Technology (ICT) for Existing Infrastructure** | 1 | Unit | 10000000 |

| | | |
|---|---|---|
| | **Sub Total** | 60000000 |
| | **Total** | 2686752321 |
| | **Say in Crores** | 268.68 |

सदरहू सुधारीत विस्तृत प्रकल्प अहवाल (DPR) शासनास सुधारीत प्रशासकीय मंजूरीस्तव दिनांक 12.06.2020 रोजी सादर करण्यात आला असता स्वच्छ भारत अभियान (नागरी) अंतर्गत गठीत उच्चाधिकार समितीच्या दिनांक 25.02.2021 च्या बैठकीत मान्यता प्रदान केली असून शासन निर्णय क्र. स्वमअ-2021/प्र.क्र.26(2)/नवि-34, दिनांक 14 मे 2021 अन्वये सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यांत आलेली आहे.

तसेच दिनांक 20.01.2020 च्या स्थगित सर्वसाधारण सभा कार्यवृत्त ठराव क्र. 33, 34 व 35 अन्वये 200 TPD composting, 150 TPD C&D आणि 200 MTPD MRF सेंटर उभारणेकरीता अनुक्रमे आजपावेतो करण्यात आलेल्या संपूर्ण प्रक्रियेस मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून नागपूर महानगरपालिकेची जागा तारण न ठेवता त्यावर निर्णय घेण्याचे संपूर्ण अधिकार निगम आयुक्त यांना प्रदान करण्यात येत असल्याबाबत मंजूरी प्रदान केलेली आहे. त्याअनुषंगाने यासोबतच DPR अंतर्भूत प्रमुख घटकांच्या निविदा प्रक्रिया सुरु करण्यात येत आहे.

उपरोक्तप्रमाणे घनकचरा व्यवस्थापन सुधारीत विस्तृत प्रकल्प अहवालास शासनाने सुधारीत प्रशासकीय मान्यता दिनांक 14 मे 2021 रोजी प्रदान केलेली असल्याने व विभागाद्वारे मंजूर DPR नुसार प्रमुख घटकांच्या निविदा प्रक्रिया सुरु करण्यात येत असल्याबाबतची माहिती मा. महासभेस सविनय सादर करण्यात येत आहे. उपरोक्त प्रश्न सभागृहाने विचारात घेवून त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**<u>ठराव क्र.१००/वि.क्र.५७</u> :-**
**{समाजकल्याण विभाग}**

नागपूर महानगरपालिके मार्फत दिव्यांग बांधवांकरिता वेगवेगळ्या योजना राबविण्यात येतात, त्यातीलच “दिव्यांग बांधवांना व्यवसायाकरिता अर्थसहाय्य” हि एक योजना आहे. या योजने अंतर्गत दिव्यांग लाभार्थ्यांना व्यवसायाकरिता अर्थसहाय्य देण्यात येते.

मनपा ठराव क्र. १७९, दि. २५/०२/२०१८ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३०(३) नुसार विधी समिती गठीत करण्यात आलेली आहे. सदर समितीची सभा दि. १७/०६/२०१९ विषय क्र. ५ नुसार दिव्यांग बांधवांना शहरात विविध ठिकाणी व्यवसायाबाबत स्टॉल बांधून देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आलेला आहे. तसेच मा. महापौरजी, मनपा यांच्या अध्यक्षेतेखाली दिव्यांग बांधवांची समिती गठीत करण्यात आली असून सदर समितीची सभा दि. २६/०२/२०२१ नुसार दिव्यांग बांधवांना स्थावर विभागाच्या माध्यमातून शहरातील विविध क्षेत्रामध्ये स्टॉल उपलब्ध करून देण्याबाबत निर्देश देण्यात आले होते. उपायुक्त स्थावर विभाग यांच्या विभागाकडून दिव्यांग बांधवांना स्टॉल उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने असा अभिप्राय प्राप्त झाला कि, समाज कल्याण विभागाने दिव्यांगांना नागपूर महानगरपालिका क्षेत्रात रस्त्यावर जागा देण्याकरिता नवीन धोरण बनविण्याऐवजी महाराष्ट्र नगर विकास विभागाच्या शासन

निर्णय दि. ०९/०१/२०१७ नुसार अंमलबजावणी करावी असा अभिप्राय दिलेला आहे. तसेच स्थावर विभागाद्वारे वेगवेगळ्या विभागाच्या शासन निर्णयाचा आधार घेवून समाज कल्याण विभागाने दिव्यांग बांधवांना स्टॉल/ओटे वाटप करावे असे नमूद केले, त्यामुळे राज्य शासनाच्या वेगवेगळया विभागांच्या शासन निर्णयाचा विचार करता खालीलप्रमाणे वस्तुस्थिती निदर्शनास येत आहे.

१) दिनांक २५/०७/२००७ चा शासन निर्णय महसूल व वनविभाग या विभागाचा असून दिव्यांग बांधवांना निवासी, वाणिज्यिक व औद्योगिक व इतर बाबींकरिता शासकीय जमिन मंजूर करण्याच्या बाबीशी संबंधित आहे. सदर शासन निर्णयाचा महानगरपालिकेच्या दिव्यांगांना जागा वाटपाशी कोणताही संबंध नाही.

२) दिनांक २५/०६/२०१८ चा शासन निर्णय ग्रामविकास विभागाने निर्गमित केलेला असून, त्यामध्ये पंचायत राज संस्थांनी त्यांच्या स्वःउत्पन्नातून ५ टक्के निधी मधून द्यावयाच्या अपंग कल्याणासाठी योजनेच्या खर्चाबाबत मार्गदर्शन सूचना याकरिता असून, त्यामध्ये जिल्हा परिषदध पंचायत समितीध ग्रामपंचायत यांनी राबवायच्या योजनांबाबत मार्गदर्शन करण्यात आलेले आहे. सदर शासन निर्णयाचा महानगरपालिकेच्या दिव्यांग बाबतच्या धोरणाशी कोणताही संबंध नाही.

३) दिनांक ०९/०१/२०१७ चा शासन निर्णय नगर विकास विभागाने निर्गमित केलेला असून, सदर शासन निर्णय पथ विक्रेता (उपजीविका संरक्षण व पथ विक्री विनियमन) (महाराष्ट्र) योजना – २०१७ असे असून, सदर शासन निर्णयाचे अवलोकन केले असता, त्यामध्ये शहरातील पथ विक्रेत्यांच्या संबंधाने धोरण निश्चितीची तरतूद दिसून येते. सदर शासन निर्णयामध्ये दिव्यांगांना व्यवसायाकरिता स्टॉल किंवा ओटे वाटपाची कोणतीही तरतूद दिसून येत नाही.

४) दिनांक ०५/०६/२००० रोजीचे नगर विकास विभागाचा शासन निर्णयामध्ये गठई कामगारांना कामासाठी देण्यात येणाऱ्या बंदिस्त स्टॉलबाबत आहे. व या शासन निर्णयानुसार केवळ बंदिस्त स्टॉलचे आवंटन करणायत येते.

वरील सर्व शासन निणर्याचा विचार करता दिव्यांग बांधवांना महानगरपालिकेने ओटे/ स्टॉल उपलब्ध करून देण्याबाबत शासन निर्णय नाही. नागपूर शहरातील दिव्यांग बांधवांची संख्या विचारात घेता त्यांना ओटे/ स्टॉल त्यांच्या मागणीनुसार आणि संख्येनुसार उपलब्ध करून देणे शक्य नाही. इतकेच नाही तर राज्यातील इतर महानगरपालिकेमध्ये विचारणा केली असता तिथे सुद्धा दिव्यांग बांधवांना ओटे/ स्टॉल उपलब्ध करून दिलेले नाही. वरील सर्व बाबींचा विचार करता दिव्यांग बांधवांना वेगवेगळ्या झोनमध्ये व्यवसायाकरिता ओटे/ स्टॉल उपलब्ध करून देणे शक्य नसल्याने त्यांना जर तीन चाकी वाहन, चार चाकी वाहन, ई-रिक्षा इ. वाहनांवर योग्य डिझाईननुसार स्टॉलची बांधणी करून दिल्यास त्यांना छोटेखाणी, वस्तू विक्रीचा व्यवसाय, जसे फिरत्या वाहनांवर भाजीपाला विक्री व्यवसाय, फळे विक्री व्यवसाय, खाद्यपदार्थाच्या अनुषंगाने इडली, सांबर वडा इ. स्नॅक्स विक्री तसेच रेडीमेड कपडे, कटलेरी व्यवसाय इत्यादी सारखे व्यवसाय करता येईल. याकरिता समाज कल्याण विभागाद्वारे दिव्यांग व्यक्तींना वैयक्तिक किंवा बचत गटाच्या माध्यमातून स्वयंरोजगाराकरिता अर्थसहाय्य या घटका अंतर्गत मदत करता येईल. याकरिता खालीलप्रमाणे तरतूद उपलब्ध आहे.

१) वैयक्तिक स्वयंरोजगाराकरिता कमाल रु. १,००,०००/–

२) बचत गटांना सामुहिक स्वयंरोजगाराकरिता रु. २,५०,०००/– ते ५,००,०००/–

वरील योजनेवर खर्च करण्याची तरतूद पद क्र. A-27301342302 व पदशीर्ष “अंत्योदय योजना अपंग व दिव्यांगाकरिता” तरतूद करण्यात आलेली आहे.

सदर योजनेची अंमलबजावणी करतांना महानगरपालिकेचे अर्थसहाय्य आणि लाभार्थ्यांचा हिस्सा, यांचे प्रारूप खालीलप्रमाणे निश्चित करता येईल.

| **अ. क्र.** | **महानगरपालिकेचे अर्थसहाय्य** | **लाभार्थ्यांचा हिस्सा** |
|---|---|---|
| १ | वैयक्तिक लाभार्थ्यांकरिता कमाल मर्यादा | लाभार्थ्यांचा हिस्सा 25%. एकूण |

| | | |
|---|---|---|
| | रु. १.०० लक्ष | प्रकल्पाच्या, तसेच त्यावरील रक्कम जे जास्त असेल ते. |
| २ | बचत गटाकरिता रु. २.५० लक्ष ते रु. ५.०० लक्ष रुपये कमाल | लाभार्थ्यांचा हिस्सा 25% एकूण प्रकल्पाच्या, तसेच त्यावरील रक्कम जे जास्त असेल ते. |

वर नमूद केलेल्या तक्त्यानुसार सदर योजनेची बांधणी करून अंमलबजावणी करता येईल. सबब दिव्यांग बांधवांना व्यवसाय करण्याकरिता फिरत्या वाहनांवर स्टॉल बांधणी करून व्यवसाय करण्यास योजनेमधून मदत करता येईल. त्या अनुषंगाने योजेचे प्रारूप सादर करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रश्न सभागृहाने विचारात घेवून त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

महापौर :- मा.सदस्य श्री.प्रदीप पोहाणे यांनी जी सूचना केली आहे यामध्ये एक नाव सुटलेले आहे ते नाव समाविष्ट करण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात येते.

श्री.जुल्फेकार भुट्टो :- मा.महापौरजी, सन २०१८-२०१९ मे जो कंत्राटी शिक्षका को ११ महिने के लिये हरसाल लेते है वह कितने शिक्षक नागपूर महानगरपालिका मे कार्यरत है। इसमे से कई शिक्षक ऐज बार हो गये है वह शिक्षक दुसरी तरफ काम नही कर सकते है इसलिये यह शिक्षक को महानगरपालिका मे कॉट्रॅक्ट बसीसपर लेना चाहिये यह मेरा आपसे निवेदन है।

श्री.सुनिल अग्रवाल :- मा.महापौरजी, जो मा.सदस्य जुल्फेकार भुट्टोजी ने जो विषय रखा है वह सही है लेकीन शासन की जो नियमावली है उसके संदर्भ मे प्रशासन ने जानकारी देना चाहिये।

महापौर :- प्रशासनाने उत्तर दयावे.

शिक्षणाधिकारी (श्रीमती प्रिती मिश्रीकोटकर) :- मा.महापौरजी, जेव्हा महानगरपालिकेमध्ये माध्यमिक शिक्षक रिटायर्ड झाले आहे आणि विशेषत: गणित विज्ञान विषय व इतर माध्यमातून शिकवलेल्या शिक्षकांची आवश्यकता भासली त्यावेळी मानधनावर शिक्षक घेण्याचा निर्णय प्रशासनाने घेतलेला होता त्या अनुषंगाने आपण मानधनावर शिक्षक नियुक्त करीत असतो.

**<u>ठराव क्र.१०१/वि.क्र.५८:-</u>**
**(शिक्षण विभाग)**

विशेष बाब म्हणून सत्र 2018 – 2019 मध्ये जाहीरातीद्वारे नियुक्त केलेल्या 56 मानधनावरील विषयनिहाय कंत्राटी शिक्षकांना सत्र 2021–22 या सत्रात मुदतवाढीचे प्रस्तावास स्थायी समितीचे मंजूरीअंती महासभेपुढे प्रस्ताव मंजूरीस्तव पाठविण्याचा प्रश्न विचारात घेणे.

शिक्षण विभाग माध्यमिक आस्थापनेवर 2018–19 या शालेय वर्षात मानधनावर विषयनिहाय शिक्षकांचे आवश्यकतेनुसार 61 पदांची जाहीरात देऊन निवड समितीने निवड केल्यानुसार 56 विषयनिहाय शिक्षकांना सत्र 2018–19 मध्ये 10 महिन्याचे कालावधीकरिता नियुक्ती आदेश देण्यात आलेले होते. यांचेवर वेतनापोटी होणाऱ्या अपेक्षित खर्च रक्कम रू. 80,00,000/– ऐंशी लक्ष रूपये इतक्या खर्चास स्थायी समितीने मंजूरी प्रदान केलेली आहे.

शासन परिपत्रक क्र. एस.आर.व्ही.2017/प्र.क्र. 455/कार्या.–12 दि. 9 फेब्रुवारी 2018 नुसार,कंत्राटी पद्धतीने नेमणूका या करार पध्दतीने प्रथमतः 11 महिन्यासाठी करण्यात याव्यात.11 महिन्यानंतर आवश्यक असल्यास करारनाम्याची मुदत वेळोवेळी वाढविता येईल. तथापि, अशी मुदत वाढवितांना एका वेळी ही मुदत 11 महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही याची काळजी नियुक्ती प्राधिकारी यांनी घ्यावी. अशाप्रकारे जास्तीत जास्त 3 वेळा नियुक्ती करता येईल. त्यानंतर अशा उमेदवाराची पुनःश्च नियुक्त करणे आवश्यक आहे असे सक्षम प्राधिकाऱ्यांचे मत असल्यास त्या उमेदवारास पुनःश्च निवड

प्रक्रियेस सामोरे जावे लागेल असे नमुद आहे. त्यानुसार सत्र 2018–19 मधील निवड केलेल्या 56 मानधनावरील शिक्षकांना सत्र 2019–20 व सत्र 2020–2021 पर्यंत स्थायी समितीची अपेक्षित खर्चास मंजूरी प्राप्त करून नियुक्ती आदेश प्रत्येक वर्षी 10 महिन्याचे कालावधीकरिता देण्यात आले होते.

वरील प्रमाणे 2018 ते 2021 पर्यंत 3 वेळा कंत्राटी तत्वावरील शिक्षकांना नियुक्ती आदेश देण्यात आलेले असून सत्र 2021 – 22 या शालेय वर्षात विषयनिहाय मानधनावरील शिक्षकांची आवश्यकता आहे. ही पदे नव्याने भरत असतांना आरक्षण स्थितीबाबत बिंदूनामावली मंजूर असणे आवश्यक आहे. परंतु सहा. आयुक्त (मावक) नागपूर यांनीSEBC आरक्षणासंदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देशाचे अनुंषगाने सध्यास्थितीत बिंदुनामावली तपासणी शक्य नसल्याचे नमूद केलेले आहे. सबब नव्याने जाहीरात करणे शक्य होणार नाही. विद्यार्थ्यांचे हितासाठी सदर कंत्राटी शिक्षक नियुक्त करणे अती आवश्यक आहे.

सबब सत्र 2021–22 या शालेय वर्षात कोविड – 19 चे प्रादुर्भावामुळे व जाहीरातीने पदे भरणे शक्य नसल्यामुळे विशेष बाब म्हणून सदर नियुक्त कंत्राटी शिक्षकांना सत्र 2021–22 या शैक्षणिक वर्षासाठी मुदतवाढ मिळणेस्तव प्रस्ताव महासभेपुढे सादर करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रश्न सभागृहाने विचारात घेवून श्रीमती वैशाली कुलरकर, मानधनावरील कंत्राटी शिक्षक यांच्या नावांसह त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**ठराव क्र.१०२/वि.क्र.५९ :-** दानागंज, हरीहर मंदीर, जूना भंडारा रोड लगत मनपाच्या जागेवर **{सार्व.बांधकाम विभाग}** बांधा, वापरा व हस्तांतरीत करा (BOT) या तत्वावर व्यापारी संकुलाचे बांधकाम M/s Orange City Mall Pvt. Ltd. (SPV) यांना दि. ०८.०५.२०१४ च्या मुळ करारनामा आणि दिनांक २७.०९.२०१७ च्या पुरवणी करारनाम्या अन्वये देण्यात आलेले असून बांधकाम कालावधी पुढे वाढविणे, करारनाम्यातील schedule-२ मध्ये premium च्या payment मधील होणारे बदल द्वितीय पुरवणी करारनाम्यात समाविष्ट करण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

दानागंज, हरीहर मंदीर, जूना भंडारा रोड लगत मनपाच्या जागेवर बांधा, वापरा व हस्तांतरीत करा (BOT) या तत्वावर व्यापारी संकुलाचे बांधकाम M/s Orange City Mall Pvt. Ltd. (SPV) यांना दि. ०८.०५.२०१४ च्या मुळ करारनाम्या अन्वये देण्यात आलेले असून Financial Closure नंतर प्रकल्पाचे बांधकाम २ वर्षात पूर्ण करावयाचे होते परंतू Financial Closure ठराविक वेळेत न झाल्यामुळे व काम सुरु करण्याकरीता आलेल्या अडचणी लक्षात घेता बांधकाम कालावधी वास्तविक झालेल्या Financial Closure च्या दिनांकापासून पुढे वाढविणे याकरीता झालेले बदल पुरवणी करारनाम्यामध्ये समाविष्ट करण्यात येवून मा. स्थायी समितीच्या दिनांक ०४.०८.२०१७ रोजीच्या सभेत मंजूरी प्रदान केलेली आहे. त्या अनुषंगाने मनपा व M/s Orange City Mall Pvt. Ltd. (SPV) यांचे दरम्यान दिनांक २७.०९.२०१७ रोजी पुरवणी करारनामा करण्यात आला. यामध्ये प्रकल्पाच्या बांधकामाची अंतिम दिनांक २८.०९.२०१७ आणि मुळ करारनाम्यातील clause 3. b. ii नुसार वाढीव अंतिम दिनांक २८.०९.२०१८ ही होती.

सदरहू प्रकल्पाच्या बांधकामाबाबत अनेक अडचणी उपस्थित झाल्याने त्या सोडविण्याकरीता "Resolution Meeting" दिनांक २९.०५.२०१७ रोजी घेण्यात आली. यामध्ये M/s Orange City Mall Pvt. Ltd. (SPV) मार्फत प्रकल्पाकरीता पर्यावरणीय मंजूरी आवश्यक असल्याची बाब उपस्थित करण्यात आली. ही मंजूरी मनपाने राज्यसरकारला अर्ज करुन प्राप्त करावयाची असल्याने मनपाद्वारे रितसर कार्यवाही करुन दिनांक २.२.२०१९ रोजी प्राप्त केली. यामध्ये २०,००० चौ.मी. पेक्षा जास्त बांधकामाकरीता पर्यावरणीय मंजूरी आवश्यक असल्याबाबत नमूद आहे. पर्यावरणीय मंजूरी प्राप्त झाल्याने ऐजन्सीद्वारे सहायक संचालक, नगररचना, मनपा यांना इमारत नकाशा मंजूरीकरीता सादर केला. तथापि एकत्रित विकास नियमावली अस्तित्वात आल्याने इमारत नकाशामध्ये होणारे बदल समाविष्ट करुन ऐजन्सीला

पुन:श्च मंजूरीकरीता सादर करावयाचा आहे.

पर्यावरणीय मंजूरी दिनांक २.०२.२०१९ रोजी प्राप्त झाल्यानंतरही ऐजन्सीद्वारे प्रकल्पाच्या बांधकामास सुरुवात करण्यात आलेली नसल्याने सन २०१९-२० या कालावधीकरीता मुळ करारनाम्याप्रमाणे रु. १.०० कोटी व त्यावर १६% व्याज देण्यास ऐजन्सी बंधनकारक आहे. या अगोदर ऐजन्सीद्वारे मनपास एकसंघ प्रिमीयम रु. ६.०० कोटी प्रथम प्रिमीयम (२०१६-१७) रु. २.५० कोटी व त्यावरील व्याजापोटी रु. १.८१ कोटी असे एकूण रु. १०.३० कोटींचा भरणा केलेला आहे. यावरुन ऐजन्सी प्रकल्पाचे काम करण्यास इच्छुक असल्याचे दिसून येते.

तथापि COVID-१९ च्या संचारामुळे ऐजन्सीद्वारे सन २०२०-२१ या कालावधीत बांधकामास सुरुवात करण्यात आलेली नाही. त्यामुळे ऐजन्सीद्वारे प्रकल्प बांधकामाचा कालावधी पुन:श्च ३ वर्षांकरीता म्हणजेच अंतिम दिनांक २८.०९.२०२४ पर्यंत वाढवून देण्याबाबत विनंती करण्यात आलेली असून सन २०१७-१८, २०१८-१९, २०१९-२० व २०२०-२१ करीता भरावयाचा प्रिमीयम सन २०२४-२५ पासून पुढील सलग वर्षात अतिरिक्त स्वरुपात भरण्यास तयारी दर्शविलेली आहे. तसेच प्रस्तावित ३ वर्ष मुदतवाढीच्या कालावधीतील (२०२०-२१ ते २०२३-२४) प्रिमीयम चे भुगतान मुळ करारनाम्यातील schedule-२ प्रमाणे राहणार असून ऐजन्सीद्वारे भरण्यात येणार आहेत. तथापि विभागाद्वारे प्रस्तावित करण्यात आल्याप्रमाणे ऐजन्सीद्वारे कामास सन २०१९-२० मध्ये सुरुवात न झाल्याने या वर्षीचा प्रिमीयम रु. १.०० कोटी १६% व्याजासह एकूण रु. १.१६ कोटी ऐजन्सीला प्रस्तावित द्वितीय पुरवणी करारनामा करतेवेळी मनपात भरणा करावयाचा प्रस्तावित आहे. याबाबत विभागाद्वारे मनपा चे कायदयाचे वरीष्ठ सल्लागार अँड. श्री. एस.एम.पुराणिक यांचे अभिमत मागविण्यात आलेले असून दिनांक २८.०५.२०२१ रोजी प्राप्त झालेले असून ऐजन्सीला मनपाद्वारे बांधकाम मुदतवाढ उपरोक्तप्रमाणे देण्यास सकारात्मकता दर्शविलेली आहे.

उपरोक्तप्रमाणे M/s Orange City Mall Pvt. Ltd. (SPV) यांना ३ वर्षांकरीता प्रकल्पाची बांधकाम मुदतवाढ देण्याबाबत, मुळ करारनाम्यातील schedule-२ payment of premium मध्ये बदल करण्याबाबत, सन २०१९-२० चा प्रिमीयम रु. १.०० कोटी १६% व्याजासह एकूण रु. १.१६ कोटी मनपामध्ये जमा करण्याबाबत आणि उपरोक्तप्रमाणे होणा-या बदलांबाबत द्वितीय पुरवणी करारनाम्यामध्ये समाविष्ट करुन मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेतला

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, विषय क्रमांक ५९ दानागंज हरीहर मंदीर जूना भंडारा रोड लगत जागेवर जो बीओटीचा प्रकल्प आपण राबवित होतो त्याला विलंब झाल्यामुळे त्याला मुदतवाढ देण्याचा हा प्रश्न आहे. विषयाची नस्ती पाहीली असता असे लक्षात येते की, महानगरपालिकेने दानागंजच्या बाजुला असलेली जी जागा आहे १६७८४ चौरस मिटर जागा ही सन २०११ ला निविदा काढुन बीओटी तत्वावर विकसीत करण्याचे निश्चित केले होते त्याचे ओपन टेन्डर झाले आणि या ओपन टेन्डरमध्ये विश्वराज इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड यांनी १६२ कोटी रुपयांची निवीदा भरली २० वर्षामध्ये ती रक्कम महानगरपालिकेला प्रमियमच्या स्वरुपामध्ये देण्याचे त्यांनी मान्य केले होते. त्यामध्ये वन टाईम प्रिमियम ६ कोटी जमा झाली आहे. मी नस्ती वाचल्यानंतर त्यातील काही बाबी आपल्या निर्देशनास आणुन देऊ इच्छितो ६ कोटी रुपये त्यांनी भरले आणि त्याचा प्रथम करारनामा दिनांक ०८/०५/२०१४ रोजी झाला व ०९-०५ ला त्याचा कार्यादेश देण्यात आला. या विषयामध्ये सांगण्यात आले की फायननशीअल क्लोजर ठराविक वेळेत न झाल्यामुळे प्रथम करारनाम्याप्रमाणे कामाला सुरुवात करता आली नाही. हा जो प्रथम ॲग्रीमेंट आहे तो सुध्दा नस्तीमध्ये नव्हता. मुळ नस्ती वेगळी आहे आणि मुदतवाढीची नस्ती सभागृहापुढे

आलेली आहे. मुळ नस्तीचे जेव्हा अवलकोन केले आणि हा जो करारनामा मी पाहिला या करारनाम्यातील क्लॉजमधील ५ मध्ये फायननशीअल क्लोजरमध्ये ३ महिन्याची मदुतवाढ मा.आयुक्त देऊ शकतात त्याप्रमाणे तीन महिन्याची मुदतवाढ दिली मात्र ३ महिन्यानंतर कुठलिही मुदतवाढ देता येत नाही असा करारनामा सांगत आहे. तत्कालीन मात्र तत्कालीन आयुक्तांनी ३ महिन्यांनी वाढविली त्यानंतर पुन्हा तीन महिन्यानंतर दिनांक ०७.११.२०१४ पर्यत वाढविली. त्यानंतर प्रत्यक्षात फायननशीअल क्लोजर १ वर्षानंतर केले दिनांक २९.०९.२०१५ ला त्यासाठी कारण जे दिले मार्केट इस्टुटीटयुटचे हे कारण दाखविण्यात आले. हा विषय ज्यावेळी प्रशासन हाताळुन राहिला होता आणि हा बीओटीचा जो करारनामा झाला हा करारनामा या आधी सभागृहापुढे येणे अपेक्षित होते परंतु मुळ करारनामा हा सभागृहापुढे आलेला नाही आणि प्रशासनाने त्यांच्या स्तरावर स्थायी समितीची मंजूरी घेऊन पहिला करारनामा केलेला आहे. हा नोंदणीकृत करारनामा आहे. बांधकामाचा कालावधी ऑगस्ट २०१४ चा असुन ऑगस्ट २०१६ पर्यत निश्चित केला होता. त्यामुळे फायननशीअल क्लोजर का लेट झाले त्याचे उत्तर प्रशासनाने दिले पाहिजे. करारनाम्याप्रमाणे ३ महिने व पुन्हा एक टर्म म्हणजे ३ महिण्याची मुदतवाढ देणे अपेक्षित होती मात्र पुर्ण वर्षभर मुदतवाढ प्रशासनाने दिले त्याचे कारण या ठिकाणी नमुद केले पाहिजे. १६२ कोटी रुपयांचा त्यांनी २० ॲन्युअल इन्स्टॉलमेंटमध्ये पैसे भरायचे होते आणि त्यामध्ये जे शुडल दोन निश्चित केले होते २०१४ ला ६ कोटी रुपये प्रिमियम भरण्यात आले होते. नॉन रिफंडेबल प्रिमियम होते ६ कोटी रुपये आणि हे १६२ कोटी रुपये ६ कोटीच्या व्यतिरिक्त होते असे एकंदर १६८ कोटी रुपये महानगरपालिकेला येणे अपेक्षित होते आणि त्याचे प्रिमियम सुरु होणार होते २०१६-२०१७ मध्ये आणि तेव्हापासून त्याच्या प्रिमियमची रक्कम निश्चित केली होती. ही प्रिमियमची १६२ कोटी रुपयांची रक्कम आपल्याला यामधुन मिळणार आहे त्यामुळे मी तर निश्चितपणाने आनंदित झालो होतो या मालमत्तेची १ लाख ८० हजार स्केअर मिटरची रेडीरेकनरची किंमत आहे १ कोटी ६१ लक्ष रुपये २०१४ मध्ये होती ज्यावेळी आपण टेन्डर फ्लोट केले, या टेन्डरला मान्यता प्रदान केली यावेळेस ९० कोटी रुपयांची ही मालमत्ता होती त्यातुन आपल्याला १६२ कोटी रुपये मिळणार होते त्यावेळी आपण सहाजिकच आनंदित झालो होतो परंतु हे १६२ कोटी रुपये पुढच्या २० वर्षामध्ये मिळणार होते त्याचे टप्पे कोणी निश्चित केले तर ते प्रशासनाने निश्चित केले, कशाच्या आधारावर केले तर त्याचा कुठलाही आधार नाही व एकॉनॉमिक्स नाही. १६२ कोटी रुपयांची विभागणी मी सांगत आहे २०१६ ते २०२० पर्यत ६ कोटी , २०२० ते २०३० मध्ये १६२ कोटी व २०३० ते २०३६ या कालावधीमध्ये ११८ कोटी रुपये मा.महापौरजी शेवटच्या ६ वर्षामध्ये ११८ कोटी रुपये मिळणार होते म्हणजे या प्रॉपर्टीचा लॉस किती होत आहे. ६ कोटीच्या प्रमियमवर आपण ९० कोटी रुपयांची प्रॉपर्टी देत आहे. ४५ रुपये प्रति चौरस मिटर बांधीव क्षेत्रावर आपल्याला यातुन उत्पन्न मिळणार होते या ४५ रुपये बांधीव क्षेत्राचे प्रमियमचा सप्लीमेंट्री ॲग्रीमेंटमध्ये कुठेही उल्लेख नाही. दुसरे जे कारण या ठिकाणी सांगण्यात आले स्थायी समितीचा ठराव क्रमांक ११७ अन्वये पुरवणी करारनाम्याला मान्यता दिली होती. हा पुरवणी करारनामा स्थायी समितीला दिल्यानंतर हा सभागृहाकडुन आला काय ? एखादया मंजूर करारनाम्यामध्ये जर बदल करायचा असेल तर तो या सभागृहामध्ये याकरीता आला की आपल्याला मुळ करारनाम्यामध्ये बदल करायचा आहे. या करारानाम्यामध्ये स्थायी समितीने बदल केला तरी सुध्दा २०१७ मध्ये या स्थायी समितीने या सभागृहाची परवानगी न घेता परस्पर त्या करारनाम्यामध्ये बदल केला आहे. हा करारनामा नोंदणीकृत पण नाही. स्थायी समितीचा ठराव झाला व या स्थायी समितीच्या ठरावाच्या अनुषंगाने त्यांनी त्यांची इन्स्टॉलमेंट दिलेली आहे. मा.महापौरजी, यामध्ये मुख्य कारण सांगण्यात आले एन्हायरमेंटची एन.ओ.सी. मिळण्यासाठी उशीर झाला मा.महापौरजी या ठिकाणी २०१४ मध्ये हा प्रोजेक्ट हस्तांतरीत केला त्याचा

वर्कऑर्डर केला २०१९ पर्यत एनव्हायरमेंटल क्लीअरन्स दिलेला नाही. त्या करीता आपण अप्लीकेशन कुठल्या तारखेला केली याचा सुध्दा उल्लेख नाही. जर बीओटी ऑपरेटर कंपनीने जर एनव्हायरमेंट क्लीअरन्स वेळत दिला असता आणि आपण ऐवढे मोठे टेन्डर बीओटीवर काढले आहे तर २० हजार चौ.मी पेक्षा अधिकच्या बांधकामाला इनव्हायरमेंटल क्लीअरन्स लागते आणि त्याच अनुषंगाने आपण टेन्डर काढतो आणि हे सर्व महानगरपालिका प्रशासनाला माहिती असतांना सुध्दा एनव्हायरमेंट क्लीअरन्सचा मुद्या उपस्थित करीत आहे. अशा पध्दतीचे टेन्डर काढायचे आणि त्याची टोटल फिगर मोठी दाखवायची आणि त्याची इन्स्टॉलमेंट अशा पध्दतीने विभागुन दयायचे विभागणी करणे म्हणजे काय १६२ भागीला २० करा त्यामुळे प्रत्येक वेळी सारखी इन्स्टॉलमेंट घ्यायला पाहिजे होते मात्र त्या मुळ करारनाम्यामध्ये ११८ कोटी रुपये शेवटच्या ६ महिन्यामध्ये आणि बाकी १४ वर्षामध्ये ४४ कोटी रुपये अशा पध्दतीचा करारनामा प्रशासन व स्थायी समिती परस्पर करीत आहे व सभागृहाला काहीही माहिती नाही. आता तो प्रोजेक्ट फेल झाला म्हणुन सप्लीमेंटरी ॲग्रीमेंटसाठी तो सभागृहाकडे पाठवायचा ते पुर्णत: चुकीचे आहे हा प्रस्तावच चुकीचा आहे. पहिलेच्या अग्रीमेंट आणि हे ६ कोटी रुपये अंतर्भुत नव्हते मात्र नव्याने जो रिव्हाईज पेमेंट असतील त्यामध्ये ६ कोटी रुपयांची धुळफेक प्रशासन करीत आहे. नेस्ट प्रिमियम किती आहे तर ती २०२४ व २०२५ पासुन सुरुवात होईल ती ३ वर्ष काम करण्यासाठी ही पेनडॅमिक स्थितीमध्ये काम करण्यासाठी आपण ही मुदतवाढ देत आहे. आणि ही मुदतवाढ दिल्यानंतर त्याचे बांधकाम २०२४ मध्ये कंम्पलीट होणे अपेक्षित आहे. २०२४ नंतर ही ५ वर्षाची जी थकित प्रमियमची रक्कम आहे ती पुढच्या २०२४ पासून ते २०२८ पर्यत हे वाढवुन व मागची रक्कम सुध्दा यामध्ये समावेश करण्याचा पिक्चर क्रीयेट करण्यात आला आहे. करारनाम्यामध्ये १६ परसेंट पर ॲनम जो इंटरेस्ट आकारायचा आहे तो या रकमेवर आकरल्याचे आपल्याला दिसत नाही. त्यामुळे या विषयामध्ये खुप मोठा गोडबंगाल आहे असे मी अत्यंत जबाबदारीने सांगतो आणि यामध्ये ६ कोटी रुपयांचा वेगळा विषय आहे आणि यामध्ये जो १६ टक्क्यांचा इंटरेस्ट कुठेही उपस्थित केलेला नाही. एखादया गरिबाने जर कर्ज विलंबाने भरले तर त्यावर २४ परसेंट आपण पेनॉल्टी लावतो व व्याज आकारतो आणि या करारनाम्यामध्ये १६ परसेंट कुठुन आणले आहे. महानगरपालिकेच्या कायद्याच्या विरुध्द आपण करारनामा करतो काय ? हा करारनामा तत्कालीन प्रशासनाने केला आहे त्याला अमेडमेंट स्थायी समितीने केलेले आहे. स्थायी समितीने अमेडमेंट करीत असतांना सभागृहाची मान्यता घेतली नाही मात्र आता या सभागृहाची मान्यता घेण्याची आवश्यकता का भासली याचे उत्तर प्रशासनाने दिले पाहिजे. आपण पहिल्यांदा एकदा त्यांना मुदतवाढ दिली त्यामध्ये कंत्राटदार कंपनी निश्‍चितपणाने काम पुर्ण करु शकले नाही आणि त्याकरीता कारणे देत आहे आणि ही सर्व कारणे आपण अझुम करुन घेतले आहे काय काय राहु शकते काय काय राहु नाही शकत हे पुर्ण अग्रीमेंट मध्ये दिसुन येत नाही आणि पुन्हा एकदा सप्लीमेंट्री ॲग्रीमेंट केले आणि सप्लीमेंट्री ॲग्रीमेंटसाठी हा विषय सभागृहात आला. माझा व्यक्तीगत या पुर्ण विषयाला विरोध आहे. या कंत्राटाची चौकशी झाली पाहिजे, सारखे इन्स्टॉलमेंट असायला पाहिजे होते सारखे इन्स्टॉलमेंट न ठेवता शेवटच्या ६ महिन्यामध्ये वेगळे इन्स्टॉलमेंट ठेवणे त्यामुळे या करारनाम्याची चौकशी झाली पाहिजे. अशा पध्दतीने कॉट्रॅक्ट कंडीशन बदलुन त्याला मान्यता दयायची त्यामुळे मला असे वाटते की हे महानगरपालिकेचे मोठया प्रमाणात नुकसान करणारी बाब आहे.

(बेल)

महापौर :- विषय पत्रिकेवर जो विषय आहे त्यावर आपण चर्चा करावी, कोणत्या कंपनीचा कोण मालक आहे याच्यावर चर्चा करण्याऐवजी जे तत्थात्मक विषय पत्रिकेवर विषय आहे त्याच्यावर चर्चा

करावी.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, मी काही चुकीचे नाव घेतले असे नाही मात्र कोणाला ते नाव रुचले नसेल तो त्यांचा व्यक्तीगत भाग असु शकतो. हे नाव मी याच्यासाठी घेतले होते की साधारणत: कंपनीमध्ये त्यांची मालकी निश्चित झाली असते.

महापौर :- माझी सन्माननिय सदस्यांना विनंती आहे कोण मालक आहे काय निश्चित असतो हा आपल्या चर्चेचा भाग नसावा जे विषय पत्रिकेवर विषय आहे त्या विषयावर आपण चर्चा करावी.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, मी जे या ठिकाणी प्रश्न उपस्थित केले आहे की पर्यावरणाची मंजूरीकरीता आपण कधी अप्लीकेशन केली त्यावर मंजूरी कधी प्राप्त झाली. दुसरा महत्वाचा विषय या ठिकाणी असा आहे की, वन टाईम प्रिमियम जो आहे पहिल्यांदा ६ कोटी रुपये ते १६२ कोटी मध्ये अंतर्भुत आहे किंवा नाही. त्या संदर्भात उत्तर प्रशासनाकडून अपेक्षित आहे. ज्यावेळी स्थायी समितीची मंजूरी घेतली त्यावेळी सभागृहाची सप्लीमेंट्री ॲग्रीमेंटवर मंजूरी का घेतली नाही. त्यावेळी जर आवश्यकता नव्हती तर आता कुठली आवश्यकता पडली सभागृहाची मान्यता घेण्याकरीता, चौथा प्रश्न असा आहे की ४५ रुपये चौरस मिटरचा जो बांधीव क्षेत्राचा जो विलंबाचे नुकसाण आहे त्या विलंबाची नुकसाण भरपाई आपण कशा पध्दतीने करणार आहोत. मुळ करारनाम्यामध्ये जर कुठल्याही कारणामुळे विलंब झाला असेल तर १६ परसेंट पर ॲनम प्रमाणे त्यावर इंटरेस्ट आकारण्यात यावा. तो प्रमियमच्या रकमेवरती जो ४५ रुपये चौरस मिटरचा जो रेंट रक्कम आहे त्याचा उल्लेख या ॲग्रीमेंट मध्ये का करण्यात आलेला नाही. या संपुर्ण गोष्टीच्या संदर्भात प्रशासनाला निर्देश दयावे की मी उपस्थित केलेल्या प्रश्नावर प्रशासनाने उत्तर दयावे.

महापौर:- मा.सदस्य श्री.प्रफुल्ल गुडधे यांनी जे प्रश्न या ठिकाणी मांडले आहे त्यावर प्रशासनाने उत्तर दयावे.

उपअभियंता (श्री.राजेश दुफारे) :- मा.महापौरजी, दानागंज शॉपिंग मॉलचा हा बीओटी प्रोजेक्ट होता त्यामध्ये पहिले ॲग्रीमेंट हे ०८.०९.२०१४ ला झाले होते. त्यानंतर त्याचे फायननशिअल क्लोजर करायचे होते ते २९.०९.२०१५ ला झाले होते ते झाल्यानंतर २ वर्षाचा कालावधी बांधकाम करण्याकरीता होता ते म्हणजे २०१७ पर्यतचा त्यानंतर प्रत्यक्ष काम करतांना त्या जागेवर मागच्या बाजुला अतिक्रमण होते.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, पॉइंट ऑफ ऑर्डर, करारनाम्याप्रमाणे फायननशिअल क्लोजरची तारीख काय होती. २९.०९.२०१५ ला आपण फायननशिअल क्लोजर केले. करारनाम्याप्रमाणे फायननशिअल क्लोजर करणे केव्हा अपेक्षित होते ते सांगण्यात यावे.

उपअभियंता (श्री.राजेश दुफारे) :- मा.महापौरजी, फायननशिअल क्लोजर हे करारनामा देण्याच्या ३ महिन्या अगोदर करणे आवश्यक होते. तीन महिन्याचा त्यामध्ये उल्लेख आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, दिनांक ०७.११.२०१५ पर्यत फायननशिअल क्लोजर करणे अपेक्षित होते. २०१४ ते २०१५ या वर्षाच्या कालखंडाचा जो वाढ झाला तो कोणाच्या मान्यतेने वाढविला आहे.

उपअभियंता (श्री.राजेश दुफारे) :- मा.महापौरजी, पुर्ण डॉक्युमेंट बॅकेकडे सबिमिट करावे लागते त्या सबमिशनप्रमाणे काय करणे आवश्यक आहे त्याप्रमाणे फायननशिअल क्लोजर करतात. त्यांचे २९.०९.२०१५ ला फायननशिअल क्लोजर झालेले आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, फायननशिअल क्लोजरच्या संदर्भामध्ये करारनाम्यामध्ये क्लॉज काय होता त्याचे वाचन करण्यात यावे.

उपअभियंता (श्री.राजेश दुफारे) :- मा.महापौरजी, (पेज नं ५ टी चे वाचन करण्यात आले.)

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, नो फर्दर एक्सटेंशन हा स्पेसिफीक शब्द ॲग्रीमेंटमध्ये निश्चित केलेला आहे. नो फर्दर एक्सटेंशन नसतांना २९.०९.२०१५ चे एक्सटेंशन कोणी दिले.

उपअभियंता (श्री.राजेश दुफारे) :- मा.महापौरजी, हे फायननशिअल इन्स्टीटयुटने निश्चित केले आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, फायननशिअल इन्स्टीटयुट हे त्या कंत्राटदाराच्या कागदपत्राच्या आधारावर निश्चित होते ते फायननशिअल इन्स्टीटयुटवर निश्चीत राहत नाही. कंत्राटदार कागदाची परिपुर्तता जशी करेल त्या अनुषंगाने ते फायननशिअल क्लोजर देतात त्यानंतर सुध्दा त्याला मुदतवाढ देता येत नाही तरी सुध्दा देतांना स्थायी समितीची मान्यता घेतली होती काय ? नोव्हेंबर २०१४ पर्यत फायननशिअल क्लोजर त्यांना देणे गरजेचे असतांना त्यांनी सप्टेबर २०१५ पर्यत त्यांनी एक्सटेंड केले या घटनेला स्थायी समितीची किंवा तत्सम कुठल्या प्राधिका-याची मान्यता घेतली आहे त्याचे उत्तर प्रशासनाने दयावे.

उपअभियंता (श्री.राजेश दुफारे) :- मा.महापौरजी, फायननशिअल क्लोजर जे करायचे होते ते बाओटी ऑपरेटरला करायचे होते त्याकरीता कोणत्या बॅकेकडुन फायनन्स घ्यायचे आहे काय करायचे आहे ते त्यांनी ठरवायचे होते त्या संदर्भात मला माहिती नाही.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, माझा प्रश्न वेगळा आहे व उत्तर वेगळे देत आहे. फायननशीअल क्लोजर केल्यानंतर जी मुदत वाढविली ती ॲग्रीमेंटच्या विरुध्द वाढविली त्याला कोणाची मान्यता घेतली आहे. त्याला कुठल्या सक्षम प्राधिका-याची मान्यता घेतली आहे हा माझा प्रश्न आहे. घेतली असेल तर हो म्हणावे नसेल घेतली तर नाही म्हणावे.

उपअभियंता (श्री.राजेश दुफारे) :- मा.महापौरजी, करारनाम्याप्रमाणे प्राजेक्टचे फायननशीअल क्लोजर करायचे होते ते बीओटी ऑपरेटरने केलेले आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, किती कालखंडापर्यत केले पाहिजे ते करारनाम्यामध्ये नमुद आहे त्यावेळी जर करारनाम्याचा भंग त्या ऑपरेटरने केलेला होता तर त्याच्यावर प्रशासनाने काय कारवाई केली. फायननशिअल क्लोजरसाठी एक वर्ष आपण अनधिकृत त्याला मुदतवाढ दिलेली आहे. त्यासाठी कुठल्याही सभागृहाची मान्यता घेतली नाही. स्थायी समितीची मान्यता घेतली नाही. जर आयुक्तांची मान्यता घेतली असेल तर तसे सांगावे की आयुक्तांनी मान्यता घेतली आहे.

उपअभियंता (श्री.राजेश दुफारे) :- मा.महापौरजी, फायननशिअल क्लोजर हे फायननशिअल इन्स्टीटयुटला ऑपरेटरने केलेले आहे त्यामध्ये साईडमध्ये तफावत होती.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, ते सर्व तफावत मला माहिती आहे परंतु हा करारनाम्याचा भंग आहे की नाही याचे उत्तर मला देण्यात यावे.

निगम आयुक्त :- या प्रकरणामध्ये मा.सदस्य श्री.प्रफुल्ल गुडधेजी यांनी सांगितले की फायननशिअल क्लोजर वेळेवर का झाले नाही आणि त्याला मुदतवाढ का देण्यात आली अशा संदर्भातील त्यांचे प्रश्न आहे. कोणतेही प्राजेक्ट घेत असतांना महत्वाचा मुद्या आपण लक्षात घेतला पाहिजे काही ऑब्लीगेशन हे बिड ओपन करणा-या संस्थेचे म्हणजे मनपाचे आहे व काही ऑब्लीगेशन बेड घेतलेल्या बीओटी ऑपरेटरचे आहे. या केसमध्ये आपण बघितले तर यामध्ये जे बिड अपलोड करण्यात आले होते त्यामध्ये महत्वाचा पॉइंट आहे की संबंधित जागा आपल्याला अतिक्रमण मुक्त करुन देणे आवश्यक होते माझ्या माहिती प्रमाणे २४ मिटरचा रस्ता इस्ट साईडमध्ये त्यांना उपलब्ध करुन दिले पाहिजे आणि सभागृहाच्या माहिती करीता सांगतो की आतापर्यत मनपाव्दारे २४ मिटरचा रस्ता तयार करुन देण्यात आलेला नाही. अश्याप्रकारचा विलंब मनपा कडुन झालेला आहे वेगवेगळया कारणामुळे तसेच आजच हा विषय

सभागृहाच्या पटलावर का आ णण्यात आला हा मा.सदस्यांचा प्रश्न होता त्याचे कारण असे आहे की, बिडमध्ये जे इन्हायरमेंट क्लीअरन्सची जबाबदारी मनपा कडुन घेण्यात आली होती ते झाले नाही त्यामुळे पुढच्या फिल्डचे काम होत नाही आपल्याला माहिती आहे की इन्हायरमेंट क्लीअरन्सला किती विलंब होतो त्यामुळे विलंब झालेला आहे. २०१५ वरुन त्यांना २०१७ पर्यत का मुदतवाढ देण्यात आली होती त्या मा.सदस्यांनी सांगितले ते बरोबर आहे की त्यांनी फायननशिअल क्लोजर ६ महिन्यामध्ये केले नसेल तर त्याला मुदतवाढ देऊ नये हा एक मुद्या होता. त्या व्यतिरिक्त सुध्दा क्लॉजेस ॲग्रीमेंटमध्ये उपलब्ध आहे. त्याअनुषंगाने ठरावासंदर्भात मिटींग घेण्यात आली होती  असे रेकॉर्ड वरुन दिसते त्यामध्ये बीओटी ऑपरेटरला काय काय अडीअडचणी जात आहे ते समोर मांडलेले आहे. त्या अनुषंगाने पुढे फायननशिअल क्लोजरची तारीख वाढविण्यात आली होती. त्याला पुढे स्थायी समितीचे अप्रुव्हल घेऊन व त्याकाळामध्ये सुध्दा लिगल ओपिनिअन घेऊन व त्या अनुषंगाने सप्लीमेंट्री ॲग्रीमेंट त्यांनी केला व पुढे गेला आता यामध्ये दोन ते तीन मुद्ये महत्वाचे आहे का आपण हा प्रश्न सभागृहाच्या पटलावर आणलेला आहे. आजरोजी आपल्याकडे बघितले तर त्यांनी या प्राजेक्टला मुदतवाढ मागितली आहे. मुदवाढीमध्ये मध्ये त्यांनी कारणे सांगितले आहे. त्यातील महत्वाचा भाग म्हणजे मनपा चे ऑब्लीगेशन करण्यामध्ये आपल्याला विलंब झाला जरी आपण २०१४ मध्ये ॲग्रीमेंट केला असला तरी २०१९ पर्यत ईसी झालेली नव्हती. जे काही प्रिमियमच्या संदर्भात मा.सदस्य श्री प्रफुलजी म्हणत होते त्यावर ऑलरेडी चर्चा झालेली होती. दुसरा महत्वाचा प्रश्न असा की का आपण प्रशासनातर्फे त्यांना परत संधी देण्याची शिफारस करीत आहोत तर या बिडरने आतापर्यत सिआर ऑफ परमीशन घेतले आहे त्यामुळे त्यांचे इंटेशन प्राजेक्ट ऑपरेट करण्याचे आहे. आणि त्यानंतर त्यांची बरीच काही मागणी होती उदाहनार्थ १६ टक्के व्याजाची मागणी, तसेच अनेक कारणे होते ते आम्ही आमच्या स्तरावर रिजेक्ट केले आहे. त्यामध्ये आपण १६ टक्क्यांचा व्याज कायम ठेवले आहे. ३ वर्षाचा कालावधी जो आहे ई.सी. चा तो पुढे वाढविण्यासाठी आपण त्यांना मुदतवाढ देत आहे. कोणत्याही  ॲग्रीमेंटच्या अटी आणि शर्तीमध्ये बदल करायचे आपण येथे सुचवित नाही. फेबुवारी २०१९ ला त्यांना ईसी मिळाल्यानंतर त्यांना प्लॅनिंग अप्रुव्हलमध्ये वेळ लागतो तरी सुध्दा त्यांना २०१९ ते २०२० चा जो इंटरेस्ट आहे १६ टक्के त्यांना पे करावेच लागेल अशी आपण त्यांना सूचना केलेली आहे. मागच्या वेळी आपण स्थायी समितीच्या समोर हा  विषय आणला परंतु सभागृहासमोर आणला नाही परंतु प्रशासनाच्या स्तरावर ही मदत बोओटी ऑपरेटरला होऊ शकते परंतु मी  २०१९ ते २०२० चे पेमेंट करायला सांगितले होते अलॉंग विथ इंटरेस्ट परंतु मागचे वर्ष २०२० ते २०२१ हे संपुर्ण वर्ष कोरोना महामारीमध्ये गेले असल्यामुळे तेवढया कालावधी करीता ते इंटरेस्टची माफी मागत होते त्याकरीता आपण सभागृहापुढे हा विषय आणला आहे अशी प्रशासनाची भुमिका होती त्यामध्ये दोन ते तिन महत्वाच्या गोष्टी सांगायच्या आहेत कोणत्याही ॲग्रीमेंटच्या मुळ क्लॉजमध्ये आपण बदल करीत नाही. यामध्ये दुस-यांदा सविस्तर लिगल ओपिनियन घेतले आहे. तिसरा महत्वाचे म्हणजे बिडर काम करण्यासाठी इच्छुक आहे. त्यांनी सर्व परवानगी घेतलेली आहे. त्यांनी प्रिमियम सुध्दा भरले आहे. आज जर त्यांना रिजेक्ट केले तर पुढील काळामध्ये एखादे लिटीगेशन तयार झाल्यास आपण महानगरपालिकेमध्ये बघितले आहे की ब-याच केसेसमध्ये आपला आरबीट्रेटर स्तरावर आहे. अशाप्रकारच्या ब-याच केसेस मी फायनल स्टेजला आणल्या आहेत.  त्यामुळे आपले आर्थिक दंड किंवा नुकसाण होण्याची संभावणा आहे याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे मागच्या काळामध्ये त्यांना का ऐवढे प्रिमियम आकारण्यात आले होते  त्याला उत्तर आज देणे संयुक्तीक वाटत नाही. अजुनपर्यत महानगरपालिकेच्या वतीने फ्री ऑफ इन्क्रोचमेंट, २४ मिटर रोड याची येणा-या कार्यकाळामध्ये पुर्तता करु, महत्वाचे म्हणजे युडीसीआर च्या अनुषंगाने त्यामध्ये

सुध्दा बदल झाला आहे त्यामुळे सन्माननिय सदस्यांचे जे काही चांगले सजेशन असेल ते सुध्दा यामध्ये गृहीत धरण्यात येईल असे प्रशासनाने नम्र निवेदन आहे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, मा.आयुक्तांनी या ठिकाणी आपले सविस्तर निवेदन दिले. त्यांनी विलंब का झाले याचे कारणे सुध्दा या ठिकाणी नमुद केले. मात्र माझा पहिला जो प्रश्न होता याची इन्टॉलमेंट त्यावेळी सारखी का ठरविली नाही हे उत्तर मी आज देऊ शकणार नाही असे मा.आयुक्तांनी सांगितले ही बाब खरी आहे. माझा आक्षेप या प्रश्नासाठी आहे ही इन्स्टॉलमेंट ठरवित असतांना फायननशिअल लॉसेस मोठया प्रमाणात महानगरपालिकेचे केलेले आहे आता ते शक्य नाही. लिटीगेशनची भुमिका मा.आयुक्तांनी या ठिकाणी व्यक्त केली. परंतु महानगरपालिका अशा पध्दतीचे चुकीची ॲग्रीमेंट सभागृहाला विश्वासात न घेता व सभागृहाच्या मंजूरीशिवाय परस्पर करुन टाकते त्यानंतर आलेल्या अडचणी दुर करण्यासाठी सभागृहाची मान्यता घेते. मा.महापौरजी, पहिले जे सप्लीमेंट्री ॲग्रीमेंट झाले त्यावेळी सुध्दा सभागृहाची मान्यता घेतली नाही. मुळ ॲग्रीमेंटचा टर्म आणि कंडीशन बदलत नसतील तरी त्याचे फायननशिअल इप्लीकेशन काय होऊन राहिले आहे तर निश्चितपणाने महानगरपालिकेचे नुकसाण होत आहे. जे उत्पन्न आपल्याला २०१७ ते २०१८ पासून मिळणे अपेक्षित होते ते २०१७ ते २०१८ पासून न मिळता २०२४ ते २०२५ पासून मिळणार आहेत. त्यामुळे जवळपास ६ ते ७ वर्ष फायननशिअल नुकसाण आपले होणार आहे. टेन्डर काढण्याच्या पुर्वी याची तपासणी केली की नाही. अतिक्रमण आहे की नाही याची तपासणी केली की नाही आपण तसे काही न करता आपण अशा पध्दतीचे महाकाय बीओटी चे प्रोजेक्ट करायचे आणि कालांतरणे त्यातील जे हरडल्स आहे ते आपल्याला माहिती आहे त्यामध्ये विलंब होऊ दयायचा आणि त्यामध्ये महानगरपालिकेचे नुकसाण निश्चितपणाने होते म्हणुन या संपुर्ण मुळ करारनाम्याला माझा विरोध आहे की या मुळ करारनाम्याची चौकशी झाली पाहिजे. ११८ कोटी शेवटच्या ६ वर्षामध्ये का ठरविण्यात आले त्याचे फायननशिअल स्टेटमेंट आपल्याकडे आहे काय ? त्याचा प्रोजेक्ट लायबिलीटी रिपोर्ट आपल्याकडे आहे काय ? प्रोजेक्ट लायबिलीटीमध्ये जो रेव्हेन्युचा सोर्स आहे त्यामधुन कशा पध्दतीने रेव्हेन्यु मिळणार आहे याची शहानिशा न करता आपण सरसकट त्यांना अशा पध्दतीचे इन्स्टॉलमेंट दिलेले आहे याबद्यल आमचा विरोध आहे त्यामुळे हा प्रस्ताव नामंजूर करण्यात यावा, यावर एक चौकशी समिती गठीत करण्यात यावी. त्यावेळी सभागृहाला विश्वासात न घेता पहिले सप्लीमेंट्री ॲग्रीमेंट रजिस्टर केले नाही. ते का केले नाही इतक्या वर्षापासून, एक साधे स्टॅम्प पेपरवर आपण ॲग्रीमेंट करीत आहे त्याला नोंदणीकृत करीत नाही. पहिले दस्तऐवज आपण नोंदणीकृत करतो मात्र दुसरे दस्तावेज आपण नोंदणीकृत करीत नाही यामध्ये मोठा गौडबंगाल आहे. त्यामुळे या संपुर्ण प्रकरणाची चौकशी झाली पाहिजे. मा.महापौरजी, माझी नम्र विनंती आहे आपण एक चौकशी समिती गठीत करुन १६५ कोटी रुपयांचे इन्स्टॉलमेंट त्यामध्ये ६ कोटी रुपये गायब दिसुन राहिले आहे. ६ कोटी रुपयांचा हिशोब लागत नाही. मा.आयुक्तांनी सुध्दा त्यांच्या उत्तरामध्ये ६ कोटी रुपयांचा उल्लेख केलेला नाही. या संपुर्ण विषयाची चौकशी आपल्या अधिकार क्षेत्राखाली नियुक्त करावी, जर आपण या विषयाची चौकशी करणार नसाल तर या प्रकरणाची चौकशी राज्य सरकारच्या माध्यमातून करण्याचे निवेदन करावे लागणार आहे म्हणुन आमचा निश्चितपणाने या विषयाला विरोध आहे त्यामुळे आमचा विरोध या ठिकाणी नोंदवावा, आणि जो आपल्याला निर्णय घ्यायचा आहे तो निर्णय घ्यावा त्याकरीता आपण सक्षम आहे. त्यामुळे माझा नामंजूरीचा विरोध या ठिकाणी नोंदविण्यात यावा ही विनंती करतो.

श्री.तानाजी वनवे :- मा.महापौरजी, आमचा सुध्दा विरोध या प्रस्तावाला नोंदवावा याकरीता जो काही निर्णय आपल्याला घ्यायचा असेल तरे घ्यावा.

श्री.अविनाश ठाकरे :- मा.महापौरजी, लोकशाही मध्ये सर्वांना अधिकार आहे एखादया प्रस्तावाला मान्यता दयायची की नाही दयायची हे ठरविण्याकरीता सभागृहामध्ये प्रस्ताव आहे परंतु काही विषयामध्ये सभागृहामध्ये ज्यावेळी चर्चा होते आपल्याला जे सोयीचे आहे तेवढेच मांडायचे आणि बाकीचे सोडुन दयायचे या प्रकारचा जो अजेंडा आहे तो चुकीचा आहे. हा जो दानागंजचा प्रस्ताव आहे तो कोणाच्या कार्यकाळात आला होता तत्कालीन महापौर श्री.गावंडे असतांना त्यांनी हा प्रस्ताव समोर ठेवला होता आणि आपला हा मोठेपणा आहे त्यावेळी आपण विरोधी पक्षात असतांना देखील आपण त्या प्रस्तावाला कुठेही रोकण्याचा प्रयत्न केला नाही त्याला इम्प्लीमेंट करण्याचा प्रयत्न जेव्हा महानगरपालिकेमध्ये आपली सत्ता आली तेव्हा इम्प्लीमेंट करण्याचा प्रयत्न केला हा आपला मोठेपणा आहे ही वस्तुस्थिती या ठिकाणी प्रफुल्लजी यांनी सुध्दा वर्तविली आणि विरोधी पक्ष नेता श्री.तानाजी वनवे यांनी सुध्दा वर्तविली. यामध्ये मा.सदस्यांनी जी भुमिका मांडली आहे ते त्यांच्या सोयीने मांडली आहे सुरुवात तुम्ही केली जसे गोरेवाडाचे जंगल आम्ही तयार केले तुम्ही स्वत:चे नावे देऊन टाकले, मा.महापौरजी, यामध्ये ज्याप्रमाणे प्रफुल्लजी सांगत आहे या विषयामध्ये जर गडबडी झाली असेल तर निश्चितपणाने चौकशी व्हायलाच पाहिजे. अधिकारी यामध्ये दोषी असतील तर त्यांच्यावर कारवाई व्हायलाच पाहिजे. महानगरपालिकेचा इंटरेस्ट त्यामध्ये जपलाच पाहिजे या मताचा सत्तापक्ष सुध्दा आहे. त्यामुळे या संपुर्ण प्रकरणामध्ये जर महानगरपालिकेचे नुकसाण होत असेल तर इन द इंटरेस्ट ऑफ महानगरपालिका काम करणारे सर्व लोक आहे. मा.आयुक्तांनी सुध्दा या ठिकाणी निवेदन केले. आयुक्तांनी निवेदन केल्यानंतर आणखी कोणाचे व्हर्जन ऐकणार आहे प्रफुल्लजी गुडधे कोणाची चौकशी करणार आहे. स्थायी समिती समोर प्रस्ताव पाठविणे हा प्रशासनाचा विषय आहे. महानगरपालिकेकडे प्रस्ताव पाठवायचा की नाही हा प्रशासनाचा विषय आहे. त्यामुळे प्रशासनाची चौकशी झालीच पाहिजे. या विषयाला प्रफुल्लजींच्या पक्षाने सुरुवात केली होती आता ते त्यांच्याच विषयाला विरोध करणार असेल तर काही हरकत नाही त्यामुळे आपण या विषयाला मान्यता प्रदान करावी, अशी मी आपणांस विनंती करतो.

महापौर :- मा.सदस्य, श्री.प्रफुल्ल गुडधे यांनी या विषयावर सखोल निवेदन केले आहे, सखोल निवेदन केल्यानंतर आयुक्तांनी सुध्दा या विषयावर प्रशासनाची भुमिका मांडली, या विषयाला २००७ ला स्थायी समितीमध्ये मंजूरी मिळालेली आहे, जेव्हा मी स्थायी समितीचा सदस्य होतो आणि फक्त एक विषय होता, यासोबतच बर्डी येथील सुपर मार्केट, महानगरपालिकेचा वॉटर वर्क्सचे ऑफिस यासोबतच नेताजी मार्केट ज्याला आपण फुल मार्केट म्हणतो या तिन्ही स्थानावर कोणत्याही बिडरने काम सुरु केलेले नाही. या ठिकाणी एका बिडरनी काम सुरु केले आणि काम सुरु केल्यानंतर दुर्देवाने म्हणावे लागत आहे कि जे काही आपल्याकडुन उपलब्ध करुन देणारी वास्तविकता होती ती महानगरपालिकेनी पुर्ण केली नाही, यासाठी जबाबदार कोण आहे हा नंतरचा भाग आहे. आणि त्यानंतर पुन्हा करार झाला आणि पुन्हा करार झाल्यानंतर एक काम सुरु झालेले आहे, तो संपुष्टात आणण्यात यावे. यामध्ये पाच प्रस्ताव होते त्या पाच प्रस्तावामध्ये पांचपावली, बर्डी येथील सुपर मार्केट, म.न.पा. वॉटर वर्क्सचे कार्यालय, दानागंज शॉपिंग मॉल, नेताजी मार्केट आणि पांचपावली मार्केट या पाच प्रकल्पा पैकी फक्त एक प्रकल्प सुरु झाला. सभागृहापुढे मुळ प्रश्न असा आहे कि हा प्रकल्प सुरु करायचा कि पुन्हा लेटिगेशनमध्ये जायचे, याबाबत आयुक्तांनी जो संदेह व्यक्त केला आहे मी सभागृहापुढे नमुद करु इच्छितो कि, ज्या माणसांनी हा पहिला प्रस्ताव केला होता जो चेंज करुन दुस-याला देण्यांत आला तो माणुस नागपूर महानगरपालिकेच्या आणखी एका विषयासाठी काम करीत होता, आपल्या लक्षात असेल कि, पहिल्या टप्प्यांचा सिमेंट रोड आणि जेव्हा तो त्याप्रकरणामध्ये लेटिगेशनमध्ये गेला तो लेटिगेशनमध्ये गेल्यानंतर नागपूर महानगरपालिकेला २६ कोटी

रुपयांचा भुर्दंड बसला, आयुक्तांच्या मनात तोच संशय आहे हा विषय आपण पुर्णत्वास न आणता जी त्रुटी आहे त्या त्रुटीला मानवी दृष्टीने किंवा प्रशासनिक दृष्टीने जी चुक झालेली आहे त्याला नियमात बसवून प्रोजेक्ट पुढे ढकलण्याच्या मानसिकतेवरुन आयुक्त कार्यवाही करीत आहे असे त्यांच्या निवेदनावरुन दिसुन येत आहे. मा.सदस्य श्री. प्रफुल्ल गुडधे यांनी जे मुद्दे उपस्थित केले आहे त्या मुद्यांबाबत आयुक्तांनी स्पष्टीकरण दिले आहे. आयुक्तांनी हे ही नमुद केले कि हे सर्व करत असतांना फक्त प्रशासनाने भुमिका घेतली असे नाही, पहिल्यांदा जेव्हा झाले तेव्हा ही लिगल ओपिनियन घेतले आहे. आता जे होत आहे याच्यात ही लिगल ओपिनियन घेत आहे, आणि त्या करारनाम्यामध्ये महानगरपालिकेच्या प्रशासनाला निर्णय घेण्याचे अधिकार आहे, कोविडच्या कार्यकाळाच्या दृष्टीने हा विषय सभागृहापुढे आणण्यात आलेला आहे असा आयुक्तांचा माणस आहे. नागपूर महानगरपालिकेच्या माध्यमातुन होणारे पाच बीओटीचे प्रोजेक्ट होते त्यापैकी फक्त एक बीओटी प्रोजेक्ट सुरु आहे, आणि हा प्रोजेक्ट पुर्णत्वास आला पाहिजे हिच प्रशासनाची मानसिकता आहे, असे आयुक्तांच्या निवेदनावरुन लक्षात येते, मा.सदस्य श्री.प्रफुल्ल गुडधे यांचे पुर्ण निवेदन ऐकले आहे त्या अनुषंगाने प्रशासनाला निर्देश देण्यांत येते कि, मा.सदस्य श्री. प्रफुल्ल गुडधेजी यांनी या विषयामध्ये ज्या त्रुटया सांगीतल्या आहे त्याप्रमाणे मुळ करारनाम्यामध्ये कोणताही बदल करावयाचा असेल तर सभागृहाच्या पटलावर तो विषय आणणे नितांत आवश्यक आहे. याबाबत प्रशासनाला सक्त ताकीद देण्यांत येते. सन्माननिय सदस्य श्री.प्रफुल्लजी गुडधे व विरोधी पक्ष नेते श्री.तानाजी वनवे यांनी या विषयाला विरोध नोंदविला आहे. प्रफुल्लजी बोलता बोलता म्हणाले की संपुर्ण कॉंग्रेस पक्षाचा विरोध नोंदवायचा म्हणुन मी मा.सदस्य श्री.प्रफुल्लजी गुडधे व विरोधी पक्ष नेते श्री.तानाजी वनवे या दोघांचा विरोध नोंदवितो आणि हा विरोध नोंदवुन हा विषय प्रशासनाने पारीत करावा.

वरील चर्चेनंतर दानागंज, हरीहर मंदीर, जूना भंडारा रोड लगत मनपाच्या जागेवर बांधा, वापरा व हस्तांतरीत करा (BOT) या तत्वावर व्यापारी संकुलाचे बांधकाम M/s Orange City Mall Pvt. Ltd. (SPV) यांना दि. ०८.०५.२०१४ च्या मुळ करारनामा आणि दिनांक २७.०९.२०१७ च्या पुरवणी करारनाम्या अन्वये देण्यात आलेले असून बांधकाम कालावधी पुढे वाढविणे, करारनाम्यातील schedule-२ मध्ये premium च्या payment मधील होणारे बदल द्वितीय पुरवणी करारनाम्यात समाविष्ट करण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

दानागंज, हरीहर मंदीर, जूना भंडारा रोड लगत मनपाच्या जागेवर बांधा, वापरा व हस्तांतरीत करा (BOT) या तत्वावर व्यापारी संकुलाचे बांधकाम M/s Orange City Mall Pvt. Ltd. (SPV) यांना दि. ०८.०५.२०१४ च्या मुळ करारनाम्या अन्वये देण्यात आलेले असून Financial Closure नंतर प्रकल्पाचे बांधकाम २ वर्षात पूर्ण करावयाचे होते परंतू Financial Closure ठराविक वेळेत न झाल्यामुळे व काम सुरु करण्याकरीता आलेल्या अडचणी लक्षात घेता बांधकाम कालावधी वास्तविक झालेल्या Financial Closure च्या दिनांकापासून पुढे वाढविणे याकरीता झालेले बदल पुरवणी करारनाम्यामध्ये समाविष्ट करण्यात येवून मा. स्थायी समितीच्या दिनांक ०४.०८.२०१७ रोजीच्या सभेत मंजूरी प्रदान केलेली आहे. त्या अनुषंगाने मनपा व M/s Orange City Mall Pvt. Ltd. (SPV) यांचे दरम्यान दिनांक २७.०९.२०१७ रोजी पुरवणी करारनामा करण्यात आला. यामध्ये प्रकल्पाच्या बांधकामाची अंतिम दिनांक २८.०९.२०१७ आणि मुळ करारनाम्यातील clause 3. b. ii नुसार वाढीव अंतिम दिनांक २८.०९.२०१८ ही होती.

सदरहू प्रकल्पाच्या बांधकामाबाबत अनेक अडचणी उपस्थित झाल्याने त्या सोडविण्याकरीता "Resolution Meeting" दिनांक २९.०५.२०१७ रोजी घेण्यात आली. यामध्ये M/s Orange City Mall

Pvt. Ltd. (SPV) मार्फत प्रकल्पाकरीता पर्यावरणीय मंजूरी आवश्यक असल्याची बाब उपस्थित करण्यात आली. ही मंजूरी मनपाने राज्यसरकारला अर्ज करुन प्राप्त करावयाची असल्याने मनपाद्वारे रितसर कार्यवाही करुन दिनांक २.२.२०१९ रोजी प्राप्त केली. यामध्ये २०,००० चौ.मी. पेक्षा जास्त बांधकामाकरीता पर्यावरणीय मंजूरी आवश्यक असल्याबाबत नमूद आहे. पर्यावरणीय मंजूरी प्राप्त झाल्याने ऐजन्सीद्वारे सहायक संचालक, नगररचना, मनपा यांना इमारत नकाशा मंजूरीकरीता सादर केला. तथापि एकत्रित विकास नियमावली अस्तित्वात आल्याने इमारत नकाशामध्ये होणारे बदल समाविष्ट करुन ऐजन्सीला पुन:श्च मंजूरीकरीता सादर करावयाचा आहे.

पर्यावरणीय मंजूरी दिनांक २.०२.२०१९ रोजी प्राप्त झाल्यानंतरही ऐजन्सीद्वारे प्रकल्पाच्या बांधकामास सुरुवात करण्यात आलेली नसल्याने सन २०१९-२० या कालावधीकरीता मुळ करारनाम्याप्रमाणे रु. १.०० कोटी व त्यावर १६% व्याज देण्यास ऐजन्सी बंधनकारक आहे. या अगोदर ऐजन्सीद्वारे मनपास एकसंघ प्रिमीयम रु. ६.०० कोटी प्रथम प्रिमीयम (२०१६-१७) रु. २.५० कोटी व त्यावरील व्याजापोटी रु. १.८१ कोटी असे एकूण रु. १०.३० कोटींचा भरणा केलेला आहे. यावरुन ऐजन्सी प्रकल्पाचे काम करण्यास इच्छुक असल्याचे दिसून येते.

तथापि COVID-१९ च्या संचारामुळे ऐजन्सीद्वारे सन २०२०-२१ या कालावधीत बांधकामास सुरुवात करण्यात आलेली नाही. त्यामुळे ऐजन्सीद्वारे प्रकल्प बांधकामाचा कालावधी पुन:श्च ३ वर्षांकरीता म्हणजेच अंतिम दिनांक २८.०९.२०२४ पर्यंत वाढवून देण्याबाबत विनंती करण्यात आलेली असून सन २०१७-१८, २०१८-१९, २०१९-२० व २०२०-२१ करीता भरावयाचा प्रिमीयम सन २०२४-२५ पासून पुढील सलग वर्षात अतिरिक्त स्वरुपात भरण्यास तयारी दर्शविलेली आहे. तसेच प्रस्तावित ३ वर्ष मुदतवाढीच्या कालावधीतील (२०२०-२१ ते २०२३-२४) प्रिमीयम चे भुगतान मुळ करारनाम्यातील schedule-२ प्रमाणे राहणार असून ऐजन्सीद्वारे भरण्यात येणार आहेत. तथापि विभागाद्वारे प्रस्तावित करण्यात आल्याप्रमाणे ऐजन्सीद्वारे कामास सन २०१९-२० मध्ये सुरुवात न झाल्याने या वर्षीचा प्रिमीयम रु. १.०० कोटी १६% व्याजासह एकूण रु. १.१६ कोटी ऐजन्सीला प्रस्तावित द्वितीय पुरवणी करारनामा करतेवेळी मनपात भरणा करावयाचा प्रस्तावित आहे. याबाबत विभागाद्वारे मनपा चे कायदयाचे वरीष्ठ सल्लागार अँड. श्री. एस.एम.पुराणिक यांचे अभिमत मागविण्यात आलेले असून दिनांक २८.०५.२०२१ रोजी प्राप्त झालेले असून ऐजन्सीला मनपाद्वारे बांधकाम मुदतवाढ उपरोक्तप्रमाणे देण्यास सकारात्मकता दर्शविलेली आहे.

उपरोक्तप्रमाणे M/s Orange City Mall Pvt. Ltd. (SPV) यांना ३ वर्षांकरीता प्रकल्पाची बांधकाम मुदतवाढ देण्याबाबत, मुळ करारनाम्यातील schedule-२ payment of premium मध्ये बदल करण्याबाबत, सन २०१९-२० चा प्रिमीयम रु. १.०० कोटी १६% व्याजासह एकूण रु. १.१६ कोटी मनपामध्ये जमा करण्याबाबत आणि उपरोक्तप्रमाणे होणा-या बदलांबाबत द्वितीय पुरवणी करारनाम्यामध्ये समाविष्ट करुन मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून मा.सदस्य श्री. प्रफुल्ल गुडधे यांनी ज्या त्रुटया सांगितल्या त्याप्रमाणे जेव्हाही, कधीही मुळ करारनाम्यामध्ये बदल करावयाचा असेल तर अशा स्थितीत पुढच्या वेळेपासून सभागृहाच्या पटलावर तो विषय आणणे नितांत आवश्यक आहे अशी ताकीद नागपूर महानगरपालिकेच्या प्रशासनाला देण्यात येते आणि या विषयामध्ये मा. विरोधी पक्ष नेता श्री तानाजी वनवे आणि मा.सदस्य श्री. प्रफुल्ल गुडधे यांचा विरोध नोंदवून हा विषय मंजूर करण्यात येते. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**ठराव क्र.१०३/वि.क्र.६० :-** 1) विषय :– नागपूर शहराच्या मंजुर विकास योजनेनूसार मौजा **{नगर रचना**

**विभाग}** – बाबुलखेडा, नगर भुमापन क्र. 4758, शिट क्र. 26, 32, कुंजीलालपेठ प्राथमिक शाळेच्या परिसरात P.S. (प्राथमिक शाळा) वापराकरीता नामनिर्देशीत असलेल्या जागेपैकी खुल्या जागेवर 900.00 चौ.मी. जागा अमृत योजनेअंतर्गत पाणीपुरवठा करण्यास्तव जलकुंभाकरीता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये फेरबदल करणेबाबत.

2) विषय :– नागपूर शहराच्या मंजुर विकास योजनेनूसार मौजा –बिनाकी, खसरा क्र. 42, 44, शिट क्र. 290 (24), नगर भुमापन क्र. 3478 या जागेवरील वैशाली नगर बारसे नगर, स्मशान घाट या जागेवरील B.G.C.G. या वापराकरीता नामनिर्देशीत असलेल्या जागेपैकी खुल्या जागेवर 1000.00 चौ.मी. जागा अमृत योजनेअंतर्गत पाणीपुरवठा करण्यास्तव जलकुंभाकरीता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये फेरबदल करणेबाबत.

विषयांकित प्रकरणी उपरोक्त संदर्भीय पत्रानूसार अमृत योजनेअंतर्गत पाणी पुरवठा करण्यास्तव जलकुंभाकरीता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये फेरबदल करण्याबाबतचे विनंती पत्र कार्यकारी अभियंता, सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभाग, महानगरपालिका, नागपूर यांचेतर्फे प्राप्त झालेला आहे.

ज्याअर्थी, नागपूर शहराची सुधारीत विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 31(1) अन्वये शासन, अधिसुचना नगर विकास विभाग क्र. टिपीएस –2496–2643–प्र.क्र.300(अ)–97 –नवि–9, दि. 07 जानेवारी 2000 अन्वये भागशः मंजुर झाली असून ती दि. 01 मार्च 2000 पासून अमंलात आली आहे.

तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसुचना, नगर विकास विभाग क्र. टिपीएस –2400–1628– सी. आर.– 200– नवि–9, दि. 10.09.2001 अन्वये मंजुर झाली असून ती दि. 21.09.2001 पासून अमंलात आलेली आहे. तसेच शासनाचे नगर विकास विभागाचे अधिसुचना क्र. टिपीएस– 2401–885– प्र.क्र.–76/नवि–9, दि. 27 फेब्रुवारी 2002 अन्वये नागपूर सुधार प्रन्यासच्या क्षेत्रांअंतर्गत सात योजनांचे क्षेत्र वगळुन उर्वरीत नागपूर शहराकरीता नागपूर महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले होते.

तथापी शासनाकडील नगर विकास विभागाची अधिसूचना क्र. टिपीएस– 2419– 1419–प्र.क्र.–154–2019 –नवि–9, दि. 27 ऑगस्ट 2019 अन्वये नागपूर सुधार प्रन्यासच्या कार्यक्षेत्राअंतर्गत असलेल्या सात योजनेकरीता सुध्दा नागपूर महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले आहे.

परंतु शासन निर्णय क्र. टिपीएस –2419/1419/प्र.क्र.154(भाग–1)/ 2019/नवि–9, दि. 09.04.2021 अन्वये नागपूर महानगरपालिकेकडील असलेल्या 7 योजनेसाठी नियोजन प्राधिकरणाचे अधिकार पुनश्चः नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांना प्रदान करण्यात आले आहे.

नागपूर शहराच्या मंजुर सुधारीत विकास योजनेत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 नूसार खाली नमुद केल्याप्रमाणे फेरबदल करण्याचे प्रस्तावित आहे.

विषय क्र. (1) मौजा – बाबुलखेडा, नगर भुमापन क्र. 4758, शिट क्र.26, 32, कुंजीलालपेठ प्राथमिक शाळेच्या परिसरातील खुल्या जागेवर केंद्र शासन पुरस्कृत अमृत योजनेअंतर्गत जलकुंभ बाधण्याचे प्रयोजन आहे.

नागपूर शहराच्या मंजुर विकास योजनेत उक्त जागेवर P.S. (प्राथमिक शाळा) या आरक्षणाचे नामनिर्देशीत आरक्षण दर्शविलेले आहे. सदर जागेवरील जलकुंभ बांधण्याकरीता जागा मिळण्याबाबत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभाग, म.न.पा. यांचे पत्र प्राप्त असून नस्तीत टांचन आहे. नगर भुमापन विभागाचे मालमत्ता पत्रकातील नोंदीनूसार सदर जागेची मालकी महानगरपालिकेच्या नावाने असून क्षेत्र 1603.81 चौ.मी. ची नोंद आहे. कुंजीलालपेठ प्राथमिक शाळेच्या परिसरातील मोकळया जागेपैकी उत्तर दिशेकडील अंदाजित क्षेत्र 30.00 मी. x 30.00 मी. = 900.00 चौ.मी. जागा

विषय क्र. (2) मौजा – बिनाकी, खसरा क्र. 42, 44, शिट क्र. 290 (24), नगर भुमापन क्र. 3478 या जागेवरील वैशाली नगर बारसे नगर, स्मशन घाटाच्या जागेपैकी मोक्यावरील उपलब्ध खुल्या जागेवर केंद्र शासन पुरस्कृत अमृत योजनेअंतर्गत जलकुंभ बांधण्याचे प्रयोजन आहे.

नागपूर शहराच्या मंजुर विकास आराखडयात सदर जागा B.G. C.G. (स्मशान भुमी दहन भुमी) या वापराचे नामनिर्देशीत आरक्षण दर्शविले आहे. करीता उक्त आरक्षित जागेवर जलकुंभ बांधण्याकरीता घनकचरा व्यवस्थापन विभाग यांचे नाहरकत पत्र प्राप्त असून नस्तीत टांचन आहे.

सदर जागेवरील जलकुंभ बांधण्याकरीता जागा मिळण्याबाबत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभाग, म.न.पा. यांचे पत्र प्राप्त असून नस्तीत टांचन आहे. नगर भुमापन विभागाचे मालमत्ता पत्रकातील नोंदीनूसार सदर जागेची मालकी महानगरपालिकेच्या नावाने असून क्षेत्र 16238.00 चौ.मी. ची नोंद आहे. वैशाली नगर बारसे नगर स्मशन घाटाच्या जागेपैकी उत्तर दिशेकडील मोक्यावर उपलब्ध असलेली मोकळी जागा अंदाजित क्षेत्र 25.00 मी. x 40.00 मी या मापाची एकुण आराजी 1000.00 चौ.मी. जागा अमृत योजनेअंतर्गत जलकुंभ बांधण्याकरीता आवश्यक असल्याने सदर जागेवर जलकुंभ उभारण्याकरीता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये अंशतः फेरबदल करण्यास्तव महानगरपालिकेच्या मा. सभागृहाची मंजुरी घेण्यास्तव तसेच उक्त प्रस्तावास मा. सभागृहाची मान्यता प्राप्त झाल्यास सदर फेरबदलाची अधिसुचना शासन राजपत्रात, दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्द करून त्यावरील आक्षेप/हरकतीवर योग्य निर्णय घेवून प्रस्ताव शासनास मंजुरीस्तव सादर करण्याकरीता मा. आयुक्त, महानगरपालिका, नागपूर यांना अधिकार प्रदान करण्याबाबत मंजुरी देण्याचा प्रश्न विचारात घेणे यास्तव सादर प्रश्न सभागृहाने विचारात घेतला

श्रीमती वंदना भगत :- मा.महापौरजी, या विषयाच्या संदर्भात एक सुचना करायची आहे की कुंजीलाल पेठ प्राथमिक शाळा येथे सध्या व्हॅक्सीनेशन सेंटर आहे तसेच बाजुला प्राथमिक आरोग्य केंद्र आहे. एका बाजुला छोटीशी इमारत होती ती तेथ होमियोपॅथीक हॉस्पीटल होते परंतु ते हॉस्पीटल आता आपली जी शाळा आहे ती मोडकळीस आलेले आहे. तेथे हॉस्पीटल व फायलेरियाचे ऑफीस आहे. ती शाळा पुर्णपणे मोडकळीस आलेली आहे. जागा मोठी असुन ती मोक्याची जागा आहे. स्थानिक लोकांची मागणी आहे की तेथे व्यापारी संकुल बनावे, तेथे जे प्राथमिक आरोग्य केंद्र आहे त्याचा विस्तार करण्यात यावा. स्थानिक लोकांची दुसरी अशी मागणी आहे की जलकुंभाकरीता आरक्षण बदलासाठी जो प्रस्ताव दिला आहे त्याचप्रमाणे उर्वरीत जागेचे देखील आरक्षण बदलुन त्या जागेचे व्यापारी संकुल निर्माण करावे अशी स्थानिक लोकांची मागणी आहे.

श्रीमती भारती बुंदे :- मा.महापौरजी, त्या भागात दवाखाना सुध्दा असावा असे निवेदन मी दिलेले होते त्या अनुषंगाने देखील विचार करण्यात यावा अशी माझी सभागृहास विनंती आहे.

महापौर :- मा.सदस्यांनी जी भावना व्यक्त केली आहे, शिक्षणासाठी राखीव असलेल्या जागेवर काय काय करता येवु शकते व काय करता येवु शकत नाही, याबाबत कोर्टानी काही निर्देश सुध्दा दिलेल आहे, ते निर्देश तपासुन मा.सदस्यांना त्यांच्या सूचनांचे एक वेगळे पत्र द्यावे आणि ते नियमांतर्गत होत अेसल तर ३७ चा एक वेगळा प्रस्ताव त्या जागेच्या संदर्भात प्रशासनानी सभागृहाच्या समोर सादर करावा.

श्री.इब्राहीम तौफीक अहमद :- मा.महापौरजी सिध्दार्थ नगर घाट के संदर्भ मे जो विषय आया है मै उसका विरोध करता हु l

महापौर :- मा.इब्राहीम भाई आपने जो विषय रखा यह जो स्मशान भुमी है और कब्रस्तान है यह कब्रस्तान बौध्द पध्दतीका कब्रस्तान है l बौध्द समाज मे भी एक समाज है जो वहा दफन करते है और समाज मे उनकी संख्या बहोत कम है और वहा जो जगह है वह बहोत बडी है, यह जनरल कब्रस्तान नही है इस दृष्टी से मतावलंबी की संख्या कम होने के कारन इतनी वर्षो से वहापर दफन किया गया उसकी संख्या को ध्यान मे

रखते हुये प्रशासन ने निर्णय लिया है।

वरील चर्चेनंतर 1) विषय :– नागपूर शहराच्या मंजुर विकास योजनेनूसार मौजा – बाबुलखेडा, नगर भुमापन क्र. 4758, शिट क्र. 26, 32, कुंजीलालपेठ प्राथमिक शाळेच्या परिसरात P.S. (प्राथमिक शाळा) वापराकरीता नामनिर्देशीत असलेल्या जागेपैकी खुल्या जागेवर 900.00 चौ.मी. जागा अमृत योजनेअंतर्गत पाणीपुरवठा करण्यास्तव जलकुंभाकरीता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये फेरबदल करणेबाबत.

2) विषय :– नागपूर शहराच्या मंजुर विकास योजनेनूसार मौजा –बिनाकी, खसरा क्र. 42, 44, शिट क्र. 290 (24), नगर भुमापन क्र. 3478 या जागेवरील वैशाली नगर बारसे नगर, स्मशान घाट या जागेवरील B.G.C.G. या वापराकरीता नामनिर्देशीत असलेल्या जागेपैकी खुल्या जागेवर 1000.00 चौ.मी. जागा अमृत योजनेअंतर्गत पाणीपुरवठा करण्यास्तव जलकुंभाकरीता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये फेरबदल करणेबाबत.

विषयांकित प्रकरणी उपरोक्त संदर्भीय पत्रानूसार अमृत योजनेअंतर्गत पाणी पुरवठा करण्यास्तव जलकुंभाकरीता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये फेरबदल करण्याबाबतचे विनंती पत्र कार्यकारी अभियंता, सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभाग, महानगरपालिका, नागपूर यांचेतर्फे प्राप्त झालेला आहे.

ज्याअर्थी, नागपूर शहराची सुधारीत विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 31(1) अन्वये शासन, अधिसुचना नगर विकास विभाग क्र. टिपीएस –2496–2643–प्र.क्र.300(अ)–97 –नवि–9, दि. 07 जानेवारी 2000 अन्वये भागशः मंजुर झाली असून ती दि. 01 मार्च 2000 पासून अमंलात आली आहे.

तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसुचना, नगर विकास विभाग क्र. टिपीएस –2400–1628– सी. आर.– 200– नवि–9, दि. 10.09.2001 अन्वये मंजुर झाली असून ती दि. 21.09.2001 पासून अमंलात आलेली आहे. तसेच शासनाचे नगर विकास विभागाचे अधिसुचना क्र. टिपीएस– 2401–885– प्र.क्र.–76/नवि–9, दि. 27 फेब्रुवारी 2002 अन्वये नागपूर सुधार प्रन्यासच्या क्षेत्रांअंतर्गत सात योजनांचे क्षेत्र वगळुन उर्वरीत नागपूर शहराकरीता नागपूर महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले होते.

तथापी शासनाकडील नगर विकास विभागाची अधिसूचना क्र. टिपीएस– 2419– 1419–प्र.क्र.–154–2019 –नवि–9, दि. 27 ऑगस्ट 2019 अन्वये नागपूर सुधार प्रन्यासच्या कार्यक्षेत्राअंतर्गत असलेल्या सात योजनेकरीता सुध्दा नागपूर महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले आहे.

परंतु शासन निर्णय क्र. टिपीएस –2419/1419/प्र.क्र.154(भाग–1)/ 2019/नवि–9, दि. 09.04.2021 अन्वये नागपूर महानगरपालिकेकडील असलेल्या 7 योजनेसाठी नियोजन प्राधिकरणाचे अधिकार पुनश्चः नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांना प्रदान करण्यात आले आहे.

नागपूर शहराच्या मंजुर सुधारीत विकास योजनेत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 नूसार खाली नमुद केल्याप्रमाणे फेरबदल करण्याचे प्रस्तावित आहे.

विषय क्र. (1) मौजा – बाबुलखेडा, नगर भुमापन क्र. 4758, शिट क्र.26, 32, कुंजीलालपेठ प्राथमिक शाळेच्या परिसरातील खुल्या जागेवर केंद्र शासन पुरस्कृत अमृत योजनेअंतर्गत जलकुंभ बाधण्याचे प्रयोजन आहे.

नागपूर शहराच्या मंजुर विकास योजनेत उक्त जागेवर P.S. (प्राथमिक शाळा) या आरक्षणाचे नामनिर्देशीत आरक्षण दर्शविलेले आहे. सदर जागेवरील जलकुंभ बांधण्याकरीता जागा मिळण्याबाबत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभाग, म.न.पा. यांचे पत्र प्राप्त असून नस्तीत टांचन आहे. नगर भुमापन विभागाचे मालमत्ता पत्रकातील नोंदीनूसार सदर जागेची मालकी महानगरपालिकेच्या नावाने असून क्षेत्र 1603.81 चौ.मी. ची नोंद आहे. कुंजीलालपेठ प्राथमिक शाळेच्या परिसरातील मोकळया जागेपैकी उत्तर दिशेकडील अंदाजित क्षेत्र 30.00 मी. x 30.00 मी. = 900.00 चौ.मी. जागा

विषय क्र. (2) मौजा – बिनाकी, खसरा क्र. 42, 44, शिट क्र. 290 (24), नगर भुमापन क्र. 3478 या जागेवरील वैशाली नगर बारसे नगर, स्मशन घाटाच्या जागेपैकी मोक्यावरील उपलब्ध खुल्या जागेवर केंद्र शासन पुरस्कृत अमृत योजनेअंतर्गत

जलकुंभ बांधण्याचे प्रयोजन आहे.

नागपूर शहराच्या मंजुर विकास आराखडयात सदर जागा B.G. C.G. (स्मशान भुमी दहन भुमी) या वापराचे नामनिर्देशीत आरक्षण दर्शविले आहे. करीता उक्त आरक्षित जागेवर जलकुंभ बांधण्याकरीता घनकचरा व्यवस्थापन विभाग यांचे नाहरकत पत्र प्राप्त असून नस्तीत टांचन आहे.

सदर जागेवरील जलकुंभ बांधण्याकरीता जागा मिळण्याबाबत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभाग, म.न.पा. यांचे पत्र प्राप्त असून नस्तीत टांचन आहे. नगर भुमापन विभागाचे मालमत्ता पत्रकातील नोंदीनूसार सदर जागेची मालकी महानगरपालिकेच्या नावाने असून क्षेत्र 16238.00 चौ.मी. ची नोंद आहे. वैशाली नगर बारसे नगर स्मशन घाटाच्या जागेपैकी उत्तर दिशेकडील मोक्यावर उपलब्ध असलेली मोकळी जागा अंदाजित क्षेत्र 25.00 मी. x 40.00 मी या मापाची एकुण आराजी 1000.00 चौ.मी. जागा अमृत योजनेअंतर्गत जलकुंभ बांधण्याकरीता आवश्यक असल्याने सदर जागेवर जलकुंभ उभारण्याकरीता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये अंशतः फेरबदल करण्यास्तव महानगरपालिकेच्या मा. सभागृहाची मंजुरी घेण्यास्तव तसेच उक्त प्रस्तावास मा. सभागृहाची मान्यता प्राप्त झाल्यास सदर फेरबदलाची अधिसुचना शासन राजपत्रात, दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्द करून त्यावरील आक्षेप/हरकतीवर योग्य निर्णय घेवून प्रस्ताव शासनास मंजुरीस्तव सादर करण्याकरीता मा. आयुक्त, महानगरपालिका, नागपूर यांना अधिकार प्रदान करण्याबाबत मंजुरी देण्याचा प्रश्न विचारात घेणे यास्तव सादर प्रश्न सभागृहाने विचारात घेवून मा.सदस्यांनी जी भावना व्यक्त केली. शिक्षणासाठी राखीव असलेल्या जागेवर काय करता येवु शकते व काय करता येवु शकत नाही याबाबत जे काही कोर्टाचे निर्देश आलेले आहेत ते निर्देश तपासून सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या सुचनांचे एक वेगळे पत्र दयावे आणि नियमाअंतर्गत ते होत असेल तर त्या जागेसाठी 37 चा एक वेगळा प्रस्ताव प्रशासनाने सभागृहाच्या समोर सादर करावा या मा. महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**ठराव क्र.१०४/वि.क्र.६१ :-:–** म.न.पा. ठराव क्र. 72 दिनांक 20.07.2017 अन्वये मा. **(सचिवालय)** महापौरजी यांनी दि. 18.01.2021 रोजी गठीत नामकरण समितीच्या दिनांक 07.06.2021 रोजी भरलेल्या सोबतच्या सभेच्या अहवालामध्ये (परिशिष्ट 'अ') करण्यांत आलेल्या विविध भागाचे नामकरणाच्या शिफारसींना मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेवून अजनी रेल्वे स्थानक ते आनंद टॉकीज पर्यंत मार्गाचे नाव डॉ. मुंजे मार्ग न वाचता डॉ. बाळकृष्ण शिवराम मुंजे मार्ग करण्याच्या सुचनेसह हा विषय मंजूर करण्यात येते. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**परिशिष्ट 'अ'**

नामकरण समितीच्या दि. ०७.०६.२०२१ रोजी दुपारी १२.०० वाजता भरलेल्या सभेचा अहवाल

उपस्थित सभासद

| अ क्र. | मा. सदस्यांचे नांव | पद |
|---|---|---|
| १ | मा. सौ. मनिषा आशिष धावडे, उपमहापौर | अध्यक्षा |
| २ | मा. श्री. सुनिल जिवराज अग्रवाल | सदस्य |
| ३ | मा. श्री. दिनेश बसंतलाल यादव | सदस्य |
| ४ | मा. श्री. शेख मोहम्मद जमाल मोहम्मद इब्राहीम | सदस्य |
| ५ | मा. श्री. लहुकूमार दत्तुजी बेहते | सदस्य |

अनुपस्थित सभासद

| अ क्र. | मा. सदस्यांचे नांव | पद |
|---|---|---|
| १ | मा. सौ. चेतना राजु टांक | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| २ | मा. श्री. दिपक मारोतराव चौधरी | सदस्य |

अध्यक्षा :— सभेची कार्यवाही सुरू करण्यात येत आहे आजच्या नामकरण समितीच्या सभेत नामकरण करण्याबाबतचे तीन प्रस्ताव नामकरण समितीसमोर ठेवण्यात येते व हे तीन प्रस्ताव एक मताने मंजुर करण्यात येते.

नामकरण समितीच्या दि. ०७.०६.२०२१ रोजीच्या सभेत नामकरण प्रस्तावावर घेण्यात आलेले निर्णय.

| अनु क्र. | सुचविणाऱ्याचे नाव | तपशिल | या पुर्वी नाव दिले असल्यास निर्णय मनपा ठराव |
|---|---|---|---|
| १ | श्रीमती उषा पॅलट, नगरसेविका, प्र.क्र. ३१<br>श्रीमती शितल कामडे, नगरसेविका, प्र.क्र. ३१<br>श्री. सतिश होले, नगरसेवक, प्र.क्र. ३१<br>श्री. रविंद्र (छोटु) भोयर नगरसेवक, प्र.क्र. ३१ | प्रभाग क्र. ३१ अंतर्गत सोमवारी क्वॉर्टर वडाच्या मैदानाला ''समाजसेवक श्री. जयवंतरावजी लुटे'' असे नामकरण करण्याबाबत | ——— |
| २ | श्रीमती उषा पॅलट, नगरसेविका, प्र.क्र. ३१<br>श्रीमती शितल कामडे, नगरसेविका, प्र.क्र. ३१<br>श्री. सतिश होले, नगरसेवक, प्र.क्र. ३१<br>श्री. रविंद्र (छोटु) भोयर नगरसेवक, प्र.क्र. ३१ | प्रभाग क्र. ३१ अंतर्गत उंटखाना चौक ते बोकडे किराणा कडे जाणाऱ्या मार्गाला ''समाजसेवक स्व.श्री. टॉबी नॉमन पॅलट मार्ग'' असे नामकरण करण्याबाबत | ——— |
| ३ | श्रीमती उषा पॅलट, नगरसेविका, प्र.क्र. ३१<br>श्रीमती शितल कामडे, नगरसेविका, प्र.क्र. ३१<br>श्री. सतिश होले, नगरसेवक, प्र.क्र. ३१<br>श्री. रविंद्र (छोटु) भोयर नगरसेवक, प्र.क्र. ३१ | प्रभाग क्र. ३१ अंतर्गत रेशीमबाग येथील गिल्लुरकर हॉस्पिटल जवळील श्री. संजय गहरवार ते पुष्पांजली अपार्टमेंट पर्वतच्या मार्गाला ''संत श्री समर्थ सद्‌गुरु बापुराव महाराज खातखेडकर मार्ग'' असे नामकरण करण्याबाबत | |

हस्ता/- मनिषा आशिष धावडे
अध्यक्ष
नामकरण समिती,

**ठराव क्र.१०५/नोटीस क्रमांक ७५** :-नागपूर महानगरपालिकेचा ठराव क्र. ३८९ दिनांक २०-०६-

२०१९ (**आस्थापना विभाग**) नुसार सहाय्यक आयुक्त/वार्ड अधिकारी (अ.ज.)-१ पदाकरिता (**मा. श्री. संदीप प्रल्हाद सहारे**) जाहिरात क्र. ५२०/पीआर, दिनांक १७-०१-२०१८ नुसार जाहिरात देण्यात आलेली होती. या जाहिरातीनुसार २४ उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाले होते. अर्ज पडताळणी ६ उमेदवारांचे अर्ज अपात्र ठरले. उर्वरित १८ उमेदवारांची लेखी परीक्षा महाऑनलाईन व्दारे दिनांक ०६-१०-२०१८ ला घेण्यात गुणानुक्रमांकानुसार ५ उमेदवारांना प्रत्यक्ष मुलाखतीकरिता दिनांक ०८-०२-२०१९ रोजी बोलविण्यात येऊन निवड समितीव्दारे प्रत्यक्ष मुलाखत घेऊन लेखी व मुलाखतीचा निकाल महानगरपालिकेच्या वेबसाईटवर दि. ०८-०२-२०१९ रोजी प्रसिध्द करण्यात आला. या मुलाखतीच्या यादीनुसार प्रथम क्र. श्री. घनश्याम पंधरे यांचे नाव असून व्दितीय क्रमांकावर श्री. योगेश गेडाम यांचे नाव आहे. श्री. योगेश गेडाम यांना प्रतिक्षा यादीत ठेवून श्री. घनश्याम पंधरे यांना नियुक्ती देणे अनिवार्य असतांना आज एक वर्षाचा कालावधी लोटला असतांना सुध्दा नियुक्ती न दिल्यामुळे होत असलेल्या अनियमिततेच्या संदर्भाने.

उपरोक्त नमूद केलेल्या विषयावर चर्चा करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या अंतिम मंजुरीकरिता पाठविण्याच्या विचारार्थ व निर्णयास्तव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "१" (जे) " प्रमाणे नोटीस ची सभागृहाने एकमताने नोंद घेतली.

**ठराव क्र.१०६/ नोटीस क्रमांक ७६** :- मनपा झोन क्र. १ ते ५ हया झोन अंतर्गत कचरा संकलन (**आरोग्य विभाग**) करणारी, ए.जी. एनव्हायरो कंपनीची कार्य, त्यांनी केलेला (**मा. ॲड धर्मपाल मेश्राम**) अनुबंध, त्यातील नियमावली, त्यातील कलमे व त्याचे अनुपालन व संदर्भातील अनियमितता संबंधी चर्चा करणे.

उपरोक्त नमूद केलेल्या विषयावर चर्चा करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या अंतिम मंजुरीकरिता पाठविण्याच्या विचारार्थ व निर्णयास्तव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "१" (जे) " प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेवून या विषयाच्या संदर्भात गठीत झालेल्या समितीला निर्देश देण्यात येते की त्यांनी मा.सदस्य यांना एक दिवसाची वेळ देवून त्यांचे म्हणणे ऐकुन घ्यावे आणि त्या अनुषंगाने पुढची कार्यवाही करावी या मा. महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**ठराव क्र.१०७/ नोटीस क्रमांक ७७** :-नागपूर महानगरपालिकेतील ऐवजदार सफाई कामगारांना सेवेत (आरोग्य विभाग (एस)) नियमित करण्यात आले नियमित करण्याच्या आदेशात अटी व (मा. श्री. प्रफुल्ल विनोदराव गुडधे) शर्तीतील अट क्र. **१८** मध्ये लाड पागे समितीच्या शिफारशी अंर्तगत वारसा हक्काबाबतच्या कुठलाही लाभ मिळणार नाही असा उल्लेख आहे लाड पागे समितीच्या शिफारशीनुसार सफाई कामगारांच्या वारसा हक्काच्या नियुक्तीच्या बाबतीत चर्चा उपस्थित करणे व निर्णय घेण्याबाबत.

उपरोक्त नमूद केलेल्या विषयावर चर्चा करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या अंतिम मंजुरीकरिता पाठविण्याच्या विचारार्थ व निर्णयास्तव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "**१**" (जे) " प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेतला

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, ऐवजदार सफाई कामगारांना मनपाच्या सेवेत २० सप्टेंबर २०१९ च्या शासन निर्णयाप्रमाणे कायम केले. शासन निर्णयामध्ये लाड पागे समितीची शिफारस लागु होणार नाही असे स्पष्ट नमुद केले होते त्यानंतर फेब्रुवारी २०२० मध्ये नगरविकास विभागाने परिपत्रक जाहीर केले आणि त्या परिपत्रकामध्ये स्पष्टपणे जाहीर केले राज्यातील सफाई कामगारांच्या वारसांना राज्यातील सर्व विभागाच्या अधिपत्याखाली सफाई कर्मचा-यासंदर्भात नियम व धोरणे सारखेच आहे. व एक वाक्यतेच्या दृष्टीने तसे असणे आवश्यक देखील आहे. सबब शासन परिपत्रकामध्ये निर्णय घेतला की राज्यातील सफाई कर्मचा-यांच्या वारसांच्या नियुक्ती प्रकरणामध्ये प्रशासन संचालणालयाने निर्गमीत केलेला दिनांक २३.०३.२००६ रोजीच्या परिपत्रकामध्ये नमुद आहे आणि वेळोवेळी निर्गमीत केलेले परिपत्रके तसेच स्थायी आदेश महानगरपालिका वारसा हक्क नियुक्ती प्रकरणात देखील लागू राहतील. १० फेब्रुवारी ला शासनाने असा निर्णय घेतला की लाड पागे समितीच्या नियुक्तीमध्ये एक वाक्यता असली पाहिजे म्हणुन सरसकट तो अस्थायी कर्मचारी जरी असेल तरी त्या वारसांना लाड पागे समितीचा नियुक्ती आदेश दिला पाहिजे. असा बदल शासनाने आपल्या निर्णयामध्ये घेतला आणि मा.आयुक्तांना ३ फेब्रुवारी २०२१ ला पत्र दिले त्यावर अजुन पर्यत कुठलिही कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे पहिलेचा जो शासन निर्णय होता २० सप्टेंबर २०१९ चा त्यामध्ये ज्या त्रुटी होत्या त्यामध्ये सफाई कामगारांना अस्थायी आदेशातील स्थायी झालेल्या सफाई कामगारांना लाड पागे समितीच्या शिफारसी लागु करता येणार नाही. आणि सोबतच ते पद व्यपगत होईल, असा जो निर्णय शासनाने घेतला होता त्यामध्ये सुधारणा करुन १० फेब्रुवारी रोजी निर्णय घेतला त्यामुळे या शासन निर्णयाच्या अनुषंगाने हे ऐवजदार सफाई कर्मचारी पदस्थापनेवर आहे. ज्यांनी वैद्यकीय दृष्टीकोणातून सेवानिवृत्ती घेतली तर त्यांच्या वारसांना लाड पागे समितीच्या शिफारसी लागू करण्याचा निर्णय या सभागृहाने घ्यावा, आणि आपण प्रशासनाला निर्देश दयावे की शासनाच्या या निर्देशान्वये प्रशासनाने कार्यवाही करावी. मा.महापौरजी, मधल्या काळामध्ये पेनडॅमीक सिच्युऐशन वाढली होती. त्यामुळे या प्रकरणाचा फॉलोअप करता आला नाही. त्यामुळे सभागृहाने या संदर्भात निर्णय घेऊन शासन निर्णयाच्या अनुषंगाने जे सफाई ऐजवदार कर्मचारी असतांना आपण लाड पागे समितीच्या शिफारसी लागू कराव्यात अशी विनंती या सभागृहाच्या माध्यमातून करण्यात येते.

वरील चर्चेनंतर सन्माननीय सदस्यांनी हा विषय मांडला आहे की ऐवजदारांना न्याय मिळाला पाहिजे याबद्दल कोणाचेही दुमत नाही. त्यांना न्याय मिळालाच पाहिजे या दृष्टीने प्रशासनाने कारवाई करावी, सन्माननीय सदस्यांनी ज्या शासन निर्णयाचा उल्लेख केला आहे त्या शासन निर्णयाप्रमाणे या प्रकारचा लाभ मिळण्यासाठी शासनाकडे आपले पत्र पाठवावे, शासनाचे जे निर्देश प्राप्त होतील त्याप्रमाणे त्या अनुषंगाने आपण पुढील कार्यवाही करावी. या मा. महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**ठराव क्र.१०८/ नोटीस क्रमांक ७८** :-नागपूर महानगरपालिकेच्या सिमे अंतर्गत शहरातील विविध
(आरोग्य विभाग (एस)) प्रभागात मोठया प्रमाणात इमारतीच्या बांधकामाचे काम सुरु
(मा. श्री. तानाजी सुकलाजी वनवे) असून या बांधकामाकरिता लागणारे साहित्य रस्त्यांच्या दुतर्फा ठेवत असल्यामुळे रहदारीस अडथळा होत असते. हे साहित्य ठेवण्याकरिता बांधकाम करणाऱ्यांनी महानगरपालिकेची परवानगी घेतली आहे किंवा नाही? तसेच बांधकामानंतर उरलेल्या साहित्यांचा तसेच सी.एन.डी. **(C.N.D.)** मटेरियल उचलण्याबाबत व ताबडतोब विल्हेवाट लावून रस्ता मोकळा करण्यास होत असलेल्या अनियमिततेच्या संदर्भाने चर्चा करुन निर्णय घेण्याबाबत."

उपरोक्त नमूद केलेल्या विषयावर चर्चा करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या अंतिम मंजुरीकरिता पाठविण्याच्या विचारार्थ व निर्णयास्तव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "**१**" (जे) " प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेवून नविन टेन्डरमध्ये याकरीता वेगळे प्रावधान केलेले आहे आपल्याकडे जे नियोजन आलेले आहे त्या डी.पी.आर. मध्ये ते नमुद आहे. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**ठराव क्र.१०९/ नोटीस क्रमांक ७९** :- सध्या संपूर्ण जगामध्ये जवळपास **९४** राष्ट्रांमध्ये कोरोना (आरोग्य विभाग (एम)) वायरसने थैमान घातले असून लक्षावधी जनता या कोरोना (मा. श्री. तानाजी सुकलाजी वनवे) वायरसमुळे पिडीत असून हजारोंच्या संख्येंनी नागरीकांचा मृत्यु झाला आहे. या कोरोना वायरस महामारीवर नागपूर महानगरपालिकेने काय उपाय योजना केली आहे या संदर्भाने चर्चा करुन निर्णय घेण्याबाबत.

उपरोक्त नमूद केलेल्या विषयावर चर्चा करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या अंतिम मंजुरीकरिता पाठविण्याच्या विचारार्थ व निर्णयास्तव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "**१**" (जे) " प्रमाणे नोटीस ची सभागृहाने एकमताने नोंद घेतली.

**ठराव क्र.११०/ नोटीस क्रमांक ८०** :- गांधीबाग झोन क्र. **६** अंतर्गत प्रभाग क्र. **८** मध्ये नागपूर (स्थावर विभाग) महानगरपालिकेचे यंग मुस्लिम फुटबॉलचे मैदान असून (मा. सौ. आशा उईके) सदर मैदान यंग मुस्लिम फुटबॉल क्लबकरिता महानगरपालिकेने लिजवर दिलेले आहे काय? ही बाब खरी आहे का? किंवा कसे? खरी असल्यास सार्वजनिक वापराचे मैदान कोणत्या नियमानुसार देण्यात आले असून या मैदानाची देखरेखीचे काम क्लब कडून करण्यात येते का? किंवा महानगरपालिका करते. उदा. इलेक्ट्रीक बिल, सामाजिक कार्यक्रमाकरिता या मैदानाचे शुल्क महानगरपालिका किंवा क्लब घेत आहे. तसेच मैदानात गैर वाजवी बांधकामाच्या अनियमिततेच्या चौकशी संदर्भाने चर्चा करुन निर्णय घेण्याबाबत.

उपरोक्त नमूद केलेल्या विषयावर चर्चा करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या अंतिम मंजुरीकरिता पाठविण्याच्या विचारार्थ व निर्णयास्तव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "**१**" (जे) " प्रमाणे नोटीस ची सभागृहाने एकमताने नोंद घेतली.

**ठराव क्र.१११/ नोटीस क्रमांक ८१** :- सन २०१७-१८, सन २०१८-१९ व सन २०१९-२० हया तीन **(स्लम विभाग)** आर्थिक वर्षात रमाई घरकुल योजनेत महाराष्ट्र शासनाकडुन **(मा. ॲड॰ धर्मपाल मेश्राम)** किती रक्कम प्राप्त झाली? त्यापैकी किती रक्कम नेमकी खर्च झाली? त्याचप्रमाणे किती लाभार्थ्यांना हया प्रत्येकी आर्थिक वर्षात हया योजनेचा लाभ मिळाला? व किती लाभार्थ्यांचे प्रस्ताव मंजूर होऊन रक्कमेकरिता प्रलंबित आहेत? हया संबंधी चर्चा करुन निर्णय घेण्याबाबत."

उपरोक्त नमूद केलेल्या विषयावर चर्चा करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या अंतिम मंजुरीकरिता पाठविण्याच्या विचारार्थ व निर्णयास्तव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "१" (जे) " प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेवून हा विषय पूर्वी झालेला आहे या मा.महापौरजी यांनी केलेल्या सुचनेची

सभागृहाने एकमताने नोंद घेतली.

श्री.तानाजी वनवे :- मा.महापौरजी, हा विषय जरी जुना असला तरी सुध्दा प्रत्येक ठिकाणी चेंबर गडर लाईन तुटलेल्या आहेत. नगरसेवक वार्डामध्ये काम करु शकत नाही. मी अधिका-याच्या वॉटस ॲप वर फोटो काढुन पाठविलेले आहे. माझी आपणांस विनंती आहे की पावसाळा सुरु होण्याची पुर्वी ही सर्व कामे त्वरीत करण्यात यावी.

महापौर :- यावर मा.महापौरजी यांनी निर्देशित केले की, झोनल बजेट करीत असतांना झोनल बजेटमध्ये इमरजन्सी म्हणुन सहा.आयुक्तांकडे निधी ठेवण्यात येत असतो. प्रत्येक बाबींची फाईल ही नगरसेवकांनीच बनविली पाहिजे हे आवश्यक नाही. हेल्थ विभागाच्या माध्यमातून सहा.आयुक्तांनी या सर्वाची माहिती गोळा करावी, आणि त्यांच्याकडे असलेला जो इमरजन्सीचा फंड आहे त्याचा वापर करुन पावसाळयाच्या कार्यकाळात हे सर्व कामे संपुष्टात आणण्याच्या दृष्टीने सहा.आयुक्तांनी स्वत: कार्यवाही करावी असे निर्देश देण्यात येत आहे.

**ठराव क्र.११२/ नोटीस क्रमांक ८६ :-** सन २०२० चा पावसाळा सुरु होत असून नागपूर **(लोककर्म विभाग)** महानगरपालिकेच्या सिमा क्षेत्रात असलेल्या प्रत्येक **(मा. तानाजी वनवे)** प्रभागातील पावसाळी नाल्या व सिवर लाईनचे तसेच नागपूर शहरातुन वाहणाऱ्या नदयांची पुर्णत- साफ सफाई करण्यात आली आहे का? तसेच सिवर लाईनच्या टाक्याची स्थिती सुनिश्चित करुन त्या टाक्यावर तुटलेली झाकणे बदलविण्यात आली आहे का? व पावसाळी पाण्याचा निचरा होण्याकरिता पावसाळी नालीचे टाके व त्यावरील झाकणांची स्थिती सुनिश्चित करण्यात आले आहे का? या संदर्भाने चर्चा करण्याबाबत.

उपरोक्त नमूद केलेल्या विषयावर चर्चा करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या अंतिम मंजुरीकरिता पाठविण्याच्या विचारार्थ व निर्णयास्तव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "१" (जे) " प्रमाणे नोटीस सभागृहाने सभागृहाने विचारात घेवून झोनल बजेट करीत असतांना झोनल बजेटमध्ये इमरजन्सी म्हणुन सहा.आयुक्तांकडे निधी ठेवण्यात येत असतो. हे आवश्यक नाही की प्रत्येक बाबींची फाईल ही नगरसेवकांनीच बनविली पाहिजे. हेल्थ विभागाच्या माध्यमातून सहा.आयुक्तांनी या सर्वाची माहिती गोळा करावी, आणि त्यांच्याकडे असलेला जो इमरजन्सीचा फंड आहे त्याचा वापर करुन पावसाळयाच्या कार्यकाळात हे सर्व काम संपुष्टात आणण्याच्या दृष्टीने सहा.आयुक्तांनी स्वत: कार्यवाही करावी असे निर्देश देण्यात येत आहे. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**ठराव क्र.११३/ नोटीस क्रमांक ८७ :-** नागपूर शहरातील गडर लाईनचे चोकेज दुरुस्त **(अधि. अभि.सा.आ.अभियांत्रिकी विभाग)** करण्यासाठी नव्याने निर्माण केलेल्या सार्वजनिक **(मा. श्री. प्रफुल्ल विनोदराव गुडधे)**

आरोग्य अभियांत्रिकी विभागामार्फत केल्या जात आहे मात्र या विभागाच्या अधिनस्त अधिकारी व कर्मचारी हे मनपाच्या विविध विभागाच्या असल्याने त्यामध्ये समन्वय निर्माण होत नाही. त्यामुळे उद्भवणाऱ्या प्रश्नाबाबत चर्चा करुन निर्णय घेण्याबाबत.."

उपरोक्त नमूद केलेल्या विषयावर चर्चा करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या अंतिम मंजुरीकरिता पाठविण्याच्या विचारार्थ व निर्णयास्तव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "१" (जे) " प्रमाणे

नोटीस ची सभागृहाने एकमताने नोंद घेतली.

**<u>ठराव क्र.११४/ नोटीस क्रमांक ८८</u>** :- नागपूर शहरातील मान्सुनपुर्व नाले सफाईसाठी **(घनकचरा व्यवस्थापन विभाग)** मागील वर्षीच्या तुलनेत कमी खर्चात नाले सफाई **(मा. श्री. प्रफुल्ल विनोदराव गुडधे)** करण्यात आली. दरवर्षी नाले सफाईची कोणती पद्धती होती व त्यामुळे अधिकचा पैसा खर्च होत होता. त्यामुळे मनपाचे इतक्या वर्षापासुन झालेले आर्थिक नुकसान व त्यासाठी जबाबदार अधिकारी याबाबत माहिती जाणुन घेणे व या विषयावर चर्चा करुन निर्णय घेण्याबाबत.."

उपरोक्त नमूद केलेल्या विषयावर चर्चा करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या अंतिम मंजुरीकरिता पाठविण्याच्या विचारार्थ व निर्णयास्तव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "१" (जे) " प्रमाणे नोटीस ची सभागृहाने एकमताने नोंद घेतली.

**<u>ठराव क्र.११५/ नोटीस क्रमांक ८९</u>** :- कोरोना संक्रमणामुळे निर्माण झालेल्या सामाजिक व **(कर विभाग)** आर्थिक स्थितीमुळे मागील आर्थिक वर्षातील **(मा. श्री. प्रफुल्ल विनोदराव गुडधे)** मालमत्ता कर, पानी कर व मनपाचे विविध देयके भरण्यास नागरीकांना विलंब होत असल्यामुळे त्यावर आकारण्यात येणारे वार्षिक २४% व्याजाची रक्कम माफ करण्यासंबंधी विषयावर चर्चा करुन निर्णय घेण्याबाबत."

उपरोक्त नमूद केलेल्या विषयावर चर्चा करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या अंतिम मंजुरीकरिता पाठविण्याच्या विचारार्थ व निर्णयास्तव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "१" (जे) " प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेतला

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, आपल्या सर्वांना माहिती आहे की मागच्या वर्षी फेब्रुवारी मार्च नंतर या देशामध्ये कोरोनाचा प्रादुर्भाव वाढला आणि लॉकडाऊन साधारणत: मार्च महिन्यामध्ये सुरु झाले आणि मालमत्ता कर भरण्याची जी लोकांची मानसिकता असते ती साधारणत: फेब्रुवारी व मार्च महिन्यामध्ये प्रॉपर्टी टॅक्स भरत असतात. नेमका त्याचवेळी मार्च २०२० पासुन लॉकडाऊन लागले आणि समोरच्या तीन महिन्यापर्यत ते लॉकडाऊन राहिले आणि त्या काळात लोकांनी एकमेकांना आधार दिला. सन २०१९-२०२० मध्ये मोठया प्रमाणात नागरिकांची थकबाकी राहिली आहे. ती थकबाकी राहिल्यामुळे २४ टक्के वार्षीक पेनॉल्टी लावली आहे. मधल्या काळामध्ये तीन ते चार महिने व्यवस्थित राहले त्यानंतर पुन्हा कोरोनाचा प्रादुर्भाव वाढला त्यामुळे २०१९-२०२०, २०२०-२०२१, २०२१-२०२२ या तीन आर्थिक वर्षामध्ये जेवढा थकित मालमत्ता कर आहे त्यावर व्याजाची माफी देण्यात यावी असा निर्णय या सभागृहाने घेतला पाहिजे कारण त्याचा जो इफेक्ट आहे तो सामान्य लोकांना बसला आहे. अनेक लोकांच्या नौक-या गेल्या आहेत, उत्पन्नामध्ये घट झाली आहे त्यामुळे ही जी व्याजाची रक्कम आहे त्यामुळे त्यांना भुर्दंड बसत आहे म्हणुन मा.महापौरजी, आपण ज्या धर्तीवर ऑरेंज सिटी मॉल्स प्रायव्हेट लिमिटेड दोन वर्षाच्या व्याजाला माफी देण्याच्या प्रस्तावाला मंजूरी दिली आहे तसेच तीन वर्षाच्या व्याजाची माफी निश्चितपणाने दयावी या तीन आर्थिक वर्षामध्ये जो आर्थिक भुर्दंड बसला आहे त्या संदर्भात आपण एकमताने निर्णय घेतला पाहिजे जेणेकरुन या शहरातील सामान्य नागरिकांवर जो बोझा महानगरपालिकेच्या माध्यमातून पडला आहे त्यामध्ये त्यांना सुट मिळेल त्यामुळे आपणांस विनंती आहे की २४ टक्के व्याजमाफी ही २०१९-२०२०, २०२०-२०२१ व २०२१-२०२२ या तीन आर्थीक वर्षामध्ये आपण व्याजमाफी दयावी, ही या सभागृहातर्फे

आपणांस विनंती करतो.

महापौर :- प्रशासनाने उत्तर दयावे.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, या विषयामध्ये प्रशासनाचा काही रोल नाही.

महापौर :- मला प्रशासनाकडुन याच्यासाठी उत्तर अपेक्षित आहे की मागच्या पॅनडॅमिक नंतर नागपूर महानगरपालिकेने या प्रकारचा प्रकल्प केला होता. शास्तीमध्ये माफी देण्याचा प्रयत्न केला होता. अभय योजना आपण राबविली होती आणि आपला प्रश्न आल्यानंतर ती अभय योजना राबविण्यात आली होती. सध्या कोरोनाच्या कार्यकाळात मा.आयुक्तांनी याचे निवेदन करुन एक महिन्याची मुदत देऊन ती अभय योजना राबवावी, एक महिन्यात किती लोक टॅक्स भरतील, त्यांना व्याजाची रक्कम माफ करण्याची निर्देश सभागृहाच्या माध्यमातून देण्यात येते. हा अधिकार मुळत: आयुक्तांचा असल्यामुळे आयुक्तांनी याबद्यल सकारात्मक भुमिका घेऊन महानगरपालिकेचा रेव्हेन्यु जर वाढु शकत असेल त्या दृष्टीने आयुक्तांनी सकारात्मक निर्णय घ्यावा.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, २४ टक्के व्याजाची रक्कम तीन वर्षाची माफ करण्यात यावी हा निर्णय सभागृहाने घेतला पाहिजे.

महापौर :- आपण सरसकट माफ करण्याऐवजी त्यांना संधी देत आहे की जर १ महिण्यात टॅक्स भरला तर त्यांना आपण सरसकट व्याज माफ करु तीन वर्षाच्या पुर्वीचा असला तरीसुध्दा व्याज माफ करण्यात येईल.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, तीन वर्षापुर्वीचे करता येईल परंतु या तीन वर्षाची व्याजाची रक्कम यामध्ये इनक्लुड केलेली आहे.

महापौर :- यामध्ये एक वेळेचा प्रतिबंध देण्यात येत आहे. त्या कालावधीमध्ये जर लोकांनी भरले तर त्यांना सुट मिळेल जर त्या वेळेच्या कालावधीमध्ये जर भरले नाही तर ती सुट त्यांना मिळणार नाही.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, यामध्ये ज्या लोकांची क्षमता आहे ते लोक पैसे भरतील.

महापौर :- मला यासाठी हे करायचे आहे की ऑरेंज सिटी मॉलवर सुध्दा आपण त्या प्रकारचे निर्बंध घातले आहे. आपण मानवी आधारावर न म्हणता ऑरेंज सिटीच्या आधारावर म्हटले आहे त्यामध्ये ऑरेंज सिटीवर सुध्दा आपण निर्बंध घातला आहे. म्हणुन मानवी दृष्टीने ते करता येते परंतु ऑरेंज सिटीच्या दृष्टीने ते करता येणार नाही.

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, जसा मानवीय दृष्टीकोण ऑरेंज सिटीच्या संदर्भात दाखविला त्याचप्रमाणे यामध्ये सुध्दा दाखविण्यात यावा.

महापौर :- ऑरेंज सिटीच्या दृष्टीने करायचा असेल तर त्यामध्ये कालावधी दयावाच लागेल

श्री.प्रफुल्ल गुडधे :- मा.महापौरजी, कालावधी निश्चितपणे देण्यात यावा मात्र जुन्या थकबाकीसाठी दयावी मात्र तीन वर्षासाठी सरसकट व्याजाची माफी दयावी अशी माझी विनंती आहे. आपण निर्णय घ्यावा.

श्री.अविनाश ठाकरे :- मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन मा.प्रफुल्लजी यांनी जो विषय मांडला आहे. आपल्या कायदयामध्ये तरतुद अशी आहे की, नागरिकांना डिमांड गेली त्यानंतर जर त्यांनी पैसे भरले नाही तर त्याला शास्ती लावण्याकरीता कायदयामध्ये तरतुद आहे. या पुर्वीच्या परिस्थितीमध्ये महानगरपालिकेच्या माध्यमातून डिमांडच गेल्या नाही त्यामुळे त्यांना शास्ती लागण्याची आवश्यकताच नाही. या नियमांचा आधार घेऊन आपण जी २४ टक्के व्याज लावले आहे ती शास्ती माफ करण्यात यावी.

वरील चर्चेनंतर शास्ती माफ करण्याच्या भावनेशी मी मा.सदस्य श्री.प्रफुल्ल गुडधे यांच्या मताशी सहमत आहे. शास्ती माफ करीत असतांना जर निर्धारीत वेळेमध्ये त्यांनी पैसे नाही भरले तर त्यांना शास्तीचा लाभ

मिळणार नाही हे करणे आवश्यक आहे. फायननशियल निर्णय घेत असतांना प्रशासनाने असे निर्णय घेणे नितांत आवश्यक आहे. जर आपण सरसकट निर्णय घेतला जर लोकांनी या वर्षी सुध्दा मागचे पैसे भरले नाही तर महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान जे आहे ते नियमीत राहील म्हणुन यामध्ये काही ना काही निर्बध आणण्यासाठी निर्णय घेणे नितांत आवश्यक आहे. कारण की प्रशासन चालवित असतांना शास्ती मध्ये सुट दिली तरी डिसीप्लीन मध्ये त्याला बसविणे नितांत आवश्यक आहे असे वैयक्तीक माझे मत आहे. माझे मत नागपूर शहराचा महापौर म्हणुन जनतेच्या हिताचे आहे आणि नागरिकांना दिलासा देणारा सुध्दा आहे म्हणुन आपली जर मागणी असेल तर एक महिन्याच्या ठिकाणी आपण २ महिन्याची संधी देऊ, जर २ महिन्यानंतर त्यांनी पैसे नाही भरले त्यांना ही जी रक्कम आहे ती रक्कम माफ करण्यात येणार नाही अशाप्रकारचे निर्देश देण्यात येत आहे. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**<u>ठराव क्र.११६/ नोटीस क्रमांक ९०</u> :-** कोरोना व्हायरस संचार बंदीमुळे नागपूर रेल्वे (घनकचरा व्यवस्थापन विभाग) स्टेशन जवळपास पुर्णत: महिन्याभरापासुन बंद (मा. श्री. किशोर दामोदर जिचकार) असून रेल्वे रुळावरिल घुशी व उंदरांचा प्रार्दुभाव मोठया प्रमाणात वसाहतीत झाल्याने नागरिक त्रस्त आहेत. करीता रेल्वे स्टेशन परिसरात उंदर व घुशीवर प्रतिबंध तसेच उपाय योजना करण्याच्या हेतू संदर्भाने चर्चा करण्याबाबत.

उपरोक्त नमूद केलेल्या विषयावर चर्चा करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या अंतिम मंजुरीकरिता पाठविण्याच्या विचारार्थ व निर्णयास्तव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "**१**" (जे) " प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेतला

श्री.किशोर दामोदर जिचकार :- मा.महापौरजी, हा प्रश्न टाकुन १ वर्ष झाला आहे यावर प्रशासनाने कोणती कारवाई केलेली आहे.

उपायुक्त (श्री.राजेश भगत) :- मा.महापौरजी सदर विषयाच्या अनुषंगाने हा प्रश्न रेल्वे प्रशासन हाताळत असल्यामुळे घुशीचा बंदोबस्त करण्यासंदर्भात रेल्वेला कळविले आहे. महानगरपालिकेच्या स्तरावर आपण अशाप्रकारची कुठलिही कारवाई केलेली नाही.

श्री.किशोर दामोदर जिचकार :- मा.महापौरजी, तत्कालीन आयुक्तांना मी या संदर्भात निवेदन दिले होते त्या अनुषंगाने या संदर्भात दिनांक २३.०३.२०२० ला डॉ.दासरवारांचे पत्र मला आले की आम्ही रेल्वे प्रशासनाला कळविले आहे. ज्या जागेवर उपद्रव सुरु आहे ती जागा महानगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये आहे त्यामुळे प्रशासनानी त्यावर कारवाई करायला पाहिजे असे अपेक्षित होते परंतु ती झालेली नाही. पुर्ण लोकांचे घरे पोखरुन झालेले आहे आणि अजुन पर्यत आपल्याकडुन काहीही कारवाई झालेली नाही. या संदर्भात मी डॉ.महल्ले यांना विचारले असता आपल्याकडे उंदीर आणि घुस यांचा बंदोबस्त करण्यासाठी प्रोव्हीजन नसल्यामुळे आपण कारवाई करु शकत नाही अशाप्रकारचे उत्तर त्यावेळी मला मिळाले होते. मा.महापौरजी, तिकडे परिस्थिती अत्यंत खराब आहे. तिकडे उंदीर आणि घुस असल्यामुळे सापांचे प्रमाण वाढले आहे. साप वाढल्यामुळे लोकांच्या जानमाल चे नुकसाण जास्त आहे. यावर काही उपाययोजना आपल्या विभागातर्फे होऊ शकते काय या संदर्भात प्रशासनाने माहिती दयावी.

वरील चर्चेनंतर मा.सदस्य श्री.किशोर जिचकार यांची जी सुचना आहे त्यावर प्रशासनाने लक्ष दयावे, महानगरपालिकेच्या माध्यमातून जे काही करणे योग्य असेल ते रेल्वेच्या सहकार्याने आपण करावे,

असे निर्देश देण्यात येत आहे. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**<u>ठराव क्र.११७/ नोटीस क्रमांक ९५</u>:-**
**(अतिक्रमण विभाग)**
**(मा. तानाजी वनवे)**

नागपूर शहरातील पावसाळा सुरु होण्यापुर्वी सिमा क्षेत्रातील किती अतिक्रमण विभागाकडुन हटविण्यात आलेले आहेत. तसेच संपूर्ण शहरातील विविध नद्यांच्या परिसरात असलेले अतिक्रमण बाबतची स्थिती काय आहे. यावर महानगरपालिकेकडुन कोण कोणत्या प्रकारची कारवाई केलेले आहे. तसेच व्यावससायिकांनी आपल्या व्यवसायाच्या जागेत केलेल्या अतिक्रमणवर महानगरपालिकेने काम कारवाई केली. या संदर्भात चर्चा करण्यासाठी निर्णय घेण्याबाबत.

उपरोक्त नमूद केलेल्या विषयावर चर्चा करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या अंतिम मंजुरीकरिता पाठविण्याच्या विचारार्थ व निर्णयास्तव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "१" (जे) " प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेतला

श्री.तानाजी वनवे :- मा.महापौरजी, आपण सामान्य मानसाचे अतिक्रमण केव्हाही काढतो आणि वाटेल त्या पध्दतीने आपण कारवाई करतो. मागच्या उन्हाळयामध्ये दर्शन कॉलनी येथे तत्कालीन आयुक्तांनी रात्री १२.०० वाजता अतिक्रमण काढण्याची कारवाई केली होती. परंतु सभागृहामध्ये मी आणि सन्माननिय सदस्य श्री.प्रविण दटके यांनी प्रश्न उपस्थित केला होता तेव्हा ३ दिवसाच्या आत आम्ही कारवाई करु अशाप्रकारचे आश्वासन दिल्यानंतर सुध्दा नाग नदीच्या पुलावर जुनी शुक्रवारी येथे अतिक्रमण केले आहे तसे काही त्यांची वडीलोपार्जीत ती जागा आहे किंवा त्यांनी विकत घेतली आहे अशाप्रकारचे दाखवून त्याचे काम तेथे चालु आहे. या संदर्भात मा.आयुक्तांनी उत्तर दयावे. हा प्रश्न सभागृहात किती वेळा आला परंतु त्यावर कारवाई का करण्यात आलेली नाही.

उपायुक्त (श्री.महेश मोरोणे) :- सन्माननिय महापौरजी, हा प्रश्न २०-०३-२०२० च्या सभेमध्ये आला होता तेव्हा नोटीस मा.विरोधी पक्ष नेत्यांनी दिली होती. त्यानंतर झोन अंतर्गत नाग नदीच्या काठावर ज्या अतिक्रमणाच्या संदर्भात मा.विरोधी पक्ष नेता बोलत आहे त्यातील नर्सरीचे अतिक्रमण हनुमाननगर झोनतर्फे व मुख्यालयाची टिम तेथे गेली होती तेथील अतिक्रमण दोनदा हटविण्यात आले होते परंतु त्यानंतर सुध्दा ते परत तेथे आलेले आहे. आणि गॅरेजच्या संदर्भात मा.विरोधी पक्ष नेता बोलत आहे ती जागा ही नासुप्रची असल्याने नासुप्र चे संबंधित अधिक्षक अभियंता यांच्याशी चर्चा झालेली होती. आणि त्या अतिक्रमणावर ते कारवाई करतील असे नासुप्र ने आपल्याला कळविले आहे. दोनदा नासुप्र तर्फे त्यांना नोटीस सुध्दा देण्यात आली होती परंतु मुख्य अभियंताशी चर्चा करुन त्यांना पुन्हा काही काळाकरीता मुदतवाढ देण्यात आली असे नासुप्र कडुन आपल्याला मौखिक सांगितले होते. ही जागा नासुप्रची असल्याने त्यांच्यातर्फे कारवाई होणे अपेक्षित आहे.

श्री.तानाजी वनवे :- मा.महापौरजी, जुनी शुक्रवारीच्या रोडवर फुटपाथवर अवैधरित्या अतिक्रमण झालेले आहे. परंतु जगनाडे चौकाकडे जातांना रस्त्यांच्या दोन्ही बाजुला कार उभ्या ठेवलेल्या आहेत त्यामुळे पब्लीकला अडथळे होत आहे.

उपायुक्त (श्री.महेश मोरोणे) :- सन्माननिय महापौरजी, फुटपाथ आणि रस्त्यांवरील अतिक्रमणाबाबत १० झोनमध्ये एकाच वेळेला कारवाई साधारणत: चार वेळा घेतलेली होती. त्या काळामध्ये बरेच अतिक्रमण काढण्यात आले होते. मी सगळेच अतिक्रमण म्हणणार नाही कारण की आज हटविलेले अतिक्रमण पुन्हा तेथे येतात परंतु सन्माननिय विरोधी पक्ष नेता वाहनांच्या संदर्भात बोलत आहे त्याबाबत आपण ट्राफीक

पोलीस आणि आर.टी.ओ. यांना गाडयांचे नंबर प्रत्येक सहा.आयुक्तांनी कळविले आहे. त्याबाबत उचित कारवाई करण्याबाबत आरटीओ आणि ट्राफीक पोलीसांना कळविले आहे. मोटर व्हेईकल अॅक्ट प्रमाणे कारवाई होण्याकरीता ट्राफीक पोलीस आणि आरटीओला हे कळविले आहे.

श्री.तानाजी वनवे :- मा.महापौरजी, कळविल्याने होत नाही. आपण त्यावर कारवाई काय केलेली आहे हे अपेक्षित आहे म्हणुन हा प्रश्न सभागृहामध्ये वारंवार येत आहे.

उपायुक्त (श्री.महेश मोरोणे) :- सन्माननिय महापौरजी, सन्माननिय विरोधी पक्ष नेता जे म्हणत आहे तेथे फुटपाथवरील जागा व्हेईकल फॉर सेल म्हणुन दुचाकी व कार फुटपाथवर उभे केले जातात त्याबाबत आपण दंडात्मक कारवाई केलेली आहे. परंतु तेथुन प्रत्यक्ष वाहणे हलविणे आणि त्याबाबत वाहनांवर कारवाई करणे याबाबत आरटीओ आणि ट्राफीक पोलीस कळविले आहे.

श्री.तानाजी वनवे :- मा.महापौरजी,याबाबत किती दिवसात कारवाई होणार आहे.

उपायुक्त (श्री.महेश मोरोणे) :- सन्माननिय महापौरजी, याबाबत प्रत्यक्ष मी आर.टी.ओ आणि डीसीपी ट्राफीकशी बोलून ही कारवाई १५ दिवसात होईल याबाबत दक्षता घेतो.

वरील चर्चेनंतर मा.विरोधी पक्ष नेते श्री.तानाजी वनवे यांनी जो विषय ठेवला आहे तो अत्यंत गंभीर विषय आहे. प्रशासनाला निर्देश देण्यात येते की, येत्या शुक्रवारी आपण ट्राफिक डिपार्टमेंटला सोबतच आर.टी.ओ. ला बोलावून रत्यावर जेवढेही कबाडी गाडी ठेवण्यात आलेली आहे डॅमेज कार उभ्या आहेत, रस्त्यावर वर्कशॉप चालविण्याचा विषय आहे. रस्त्यावर डेंटींग व पेंटींग करण्याचा विषय आहे. या सर्व विषयाच्या अनुषंगाने महानगरपालिकेकडे जी माहिती आहे ते संपुर्ण नगरसेवकांकडून गोळा करावी जसे आपण फुटपाथवरील अतिक्रमण काढण्याची कारवाई रेगुलर केली होती त्याचप्रमाणे ट्राफीक विभाग व महानगरपालिका या दोघांनी मिळुन लागोपाठ १५ ते २० दिवस कारवाई करणे अत्यंत आवश्यक आहे. कारण की नियमाप्रमाणे त्यांना कारवाई करण्याचा अधिकार आहे. तरी सुध्दा ते वारंवार महानगरपालिकेकडे बोट दाखवितात. म्हणुन शुक्रवारी आपण एक बैठक घ्यावी त्या बैठकीमध्ये आयुक्त महोदय सुध्दा राहतील, डी.सी.पी. ट्राफिक सुध्दा राहतील, त्याचे नियोजन करुन वेळेबाबत मला देखील सुचना करावी, मी सुध्दा त्या बैठकीला राहणार आहे. त्या सोबतच मी मागच्या सभागृहात एक विषय सांगितला होता नदी आणि नाल्याची साफसफाई करीत असतांना काठावर असलेले अतिक्रमण एक विशेष स्थान मी सांगितले होते की, मानकापूर चौकापासून ते वाडीकडे जाणारा जो रिंगरोड आहे त्याच्या काठाला लागून एक नाला आहे आणि नाल्याच्या बाजुला जो रोड पांडुरंग हॉलकडे जाते तेथे असलेले जेवढे झोपडे होते त्या झोपडयांना नागपूर महानगरपालिकेच्या माध्यमातून त्यांना हटवुन एस.आर.ए. मध्ये त्यांना जागा दिली. एस.आर.ए. मध्ये जागा दिल्यानंतर तेथे काही दिवस झोपडे नव्हते परंतु आता पुन्हा तेथे झोपडे आलेले आहे. आपण रितसर तेथे पाहणी करुन ताबडतोब तेथे कारवाई करावी, जेणेकरुन पावसाळयात त्यांच्याघरी पाणी घुसले तर महानगरपालिकाकडे तक्रार होतात, महानगरपालिकेवर ताशेरे ओढल्या जातात की महानगरपालिकेने वेळेवर लक्ष दिले असते तर हे झाले नसते. एस.आर.ए. मध्ये घर दिल्यानंतर देखील तेथे दुस-यांदा अतिक्रमण होत असेल आणि महानगरपालिका कारवाई करीत नसेल तर ही गंभीर बाब आहे यावर ताबडतोब कारवाई करावी असे सुध्दा निर्देश देण्यात येत आहे. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**<u>ठराव क्र.११८/ नोटीस क्रमांक ९६:-</u>** प्रभाग क्र. 26 'अ' येथील संघर्षनगर चौक ते **(प्रकल्प विभाग)** भांडेवाडी डंपींग यार्ड पर्यंतचा रोड किंमत सुमारे

**(मा. ॲड॰ धर्मपाल मेश्राम)** 7.20 कोटीची तरतूद करुन मंजुरी प्रदान करण्यात आली होती. मा. आयुक्त अभिजीतजी बांगर हयांच्या कार्यकाळात मनपा अंदाजपत्रकात आर्थिक वर्ष 2019–20 हया वर्षात 1 कोटी रक्कमेची व उर्वरित राशीची तरतूद 2020–21 हया वर्षाच्या अंदाजपत्रकात उपलब्ध करण्याबाबत मंजुरी प्रदान केलेली आहे. त्या अनुषंगाने मे. एच. के. गुरुबक्सानी यांची निविदा मंजूर करण्यात आली होती. परंतु प्रशासनातील घोळामुळे कार्यादेश निर्गमित करण्याचे टाळण्यात आले. हया संबंधी चर्चा करण्यासाठी निर्णय घेण्याबाबत.

उपरोक्त नमूद केलेल्या विषयावर चर्चा करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या अंतिम मंजुरीकरिता पाठविण्याच्या विचारार्थ व निर्णयास्तव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "१" (जे) " प्रमाणे नोटीस ची सभागृहाने नोंद घेतली.

**ठराव क्र.११९/ नोटीस क्रमांक ९७:-**
**(कर विभाग)**
**(मा. श्री. संदीप जाधव)**

१) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५२–१ अ अन्वये नागपूर महानगरपालिकेस असलेल्या अधिकाराचा वापर करुन कोविड–१९ च्या प्रादुर्भावामुळे उद्‌भवलेल्या परिस्थितीमुळे ज्या व्यक्ती वर्गाची आर्थिक परिस्थिती अत्यंत दयनीय झालेली आहे अश्या व्यक्ती वर्गाच्या मालमत्ता करीता थकीत असलेल्या मालमत्ता कर रक्कमेत ५० टक्के सुट देण्याचा निर्णय महानगरपालिका सभागृहात घेवून राज्य शासनाच्या मान्यतेकरिता पाठविणे व राज्य शासन जी सुट मान्य करिल अशी सुट त्या व्यक्ती वर्गाला देवून आर्थिक अडचणीत दिलासा देणे तसेच थकीत मालमत्ता कर रक्कमे वरील शास्ती रक्कम माफ करणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे परिशिष्ट ‘‘ड’’, प्रकरण‘‘८’’ चे कराधान नियम ५१ अन्वये तरतूद आहे. परंतू सदर्हू तरतूदीन्वये आयुक्तांना प्रदान असलेल्या स्वेच्छा निर्णयाच्या अधिकाराचा वापर करुनच शास्ती रक्कम अंशत: किंचा पुर्णत: माफ करणे अपेक्षीत आहे. नागरिकांची दयनीय अवस्था बघून स्वेच्छा निर्णयाचा वापर करुन थकीत मालमत्ता कर रक्कमेवरील शास्ती माफ करणेबाबत चर्चा करुन उचित निर्णय घेण्यास्तव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील “१” “जे” प्रमाणे नोटीसची सभागृहाने नोंद घेतली.

महापौर :- सन्माननिय दटके साहेबांची सूचना आहे की ते शहराच्या बाहेर असल्यामुळे तेथे नेटवर्कचा प्रॉब्लेम असल्यामुळे नेट काम करीत नाही त्यामुळे त्यांची सुचना आहे की त्यांच्या जेवढया नोटीस आहे. त्या विषयपत्रिकेवर कायम ठेवण्यात यावेत.

**ठराव क्र.१२०/नोटीस क्रमांक ०१:-** मेसर्स किशोर एजन्सी व मेसर्स सुपर सिक्युरिटी सर्व्हिसेस **(साप्रवि)** हयांनी मनपात सुरक्षा रक्षक पुरवण्याकामी घेतलेल्या
**(मा. ॲड॰ श्री. धर्मपाल मेश्राम)** कंत्राटाची पोलीस अनुज्ञप्तीची मुदत २८ जुलै २०२० संपलेली असतांना देखील सहाय्यक आयुक्त (साप्रवि) श्री. धामेचा हया एजंसीवर कारवाई करीत नसल्याबाबत यावर सभागृहात चर्चा करुन निर्णय घेणेबाबत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "१" (जे) " प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेतला

श्री.धर्मपाल मेश्राम :- सन्माननिय महापौरजी, मेसर्स किशोर एजन्सी व मेसर्स सुपर सिक्युरिटी सर्व्हिसेस हयांच्या स्वरुपात मी नोटीस दिला आहे. खाजगी स्वरुपाच्या लेखी स्वरुपाच्या तक्रारी दिलेल्या आहेत. या संदर्भात प्रशासनाला निवेदन देण्यासाठी जर वेळ हवा असेल तर ते देण्यास काही हरकत नाही.

महापौर :- प्रशासनाने या विषयावर निवेदन करावे.

उपायुक्त (श्री.जैन) :- मा.महापौरजी, महानगरपालिकेने निविदा प्रक्रीया राबवून खाजगी सुरुक्षा एजन्सी नियुक्त केलेली आहे. त्या संदर्भात मा.सदस्यांकडून ज्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत त्या अनुषंगाने मा.आयुक्तांनी चौकशी करण्याबाबत निर्देश दिले होते त्यामध्ये असे आढळुन आले होते की, सुरक्षा एजन्सीने पोलीस विभागाकडून परवाना दिला जातो तो एक्सपायर झाल्यानंतर रिनीव्हलसाठी त्यांनी अर्ज दिले होते. परंतु त्यांना रिनीव्हल करुन मिळाले नव्हते. मा.सदस्यांनी जी तक्रार केली होती त्यामध्ये निष्पन्न झाले की किशोर एजन्सी आणि सुपर सिक्युरिटी सर्व्हिसेस एजन्सी यांचे कंत्राट आम्ही ससपेंड केले होते २०२१ ला त्यानंतर पोलीस विभागाकडून दोन्ही एजन्सीचे जे लायसन्स आहे ते रिट्रॉस्पेक्टीव्ह इफेक्टने मंजूर करण्यात आले होते त्या आधाराने त्यांनी आमच्याकडे डॉक्युमेंट सादर केले त्यानंतर दिनांक ०१-०३-२०२१ पासून त्यांना दिलेला जो कंत्राट होता तो रिईस्टेट करण्यात आलेला आहे.

श्री.धर्मपाल मेश्राम :- सन्माननिय महापौरजी, दोन्ही एजन्सीनी जे कागदपत्र सादर केले आहे त्या एजन्सीची पोलीस परवान्याची मुदत संपली असतांना त्यांचे टेन्डर क्लीअर करण्यात आले व त्यांना कार्यादेश देण्यात आला. अशाच प्रकारे जेव्हा टेन्डर झालेल्या दुस-या संस्थेसोबत ही घटना घडली तेव्हा त्या संस्थेचे टेन्डर निर्गमित करण्यात आले नाही. तर खंडीत करण्यात आले आणि या दोन संस्थांच्या प्रकरणामध्ये त्यांच्या पोलीस परवान्याची मुदत संपलेली असतांना देखील जर त्यांचे काम सुरु आहे आणि मुदत संपली तर त्यांना रिट्रॉस्पेक्टीव्ह इफेक्ट येईल असे मी समजू शकतो परंतु त्यांची मुदत संपलेली असतांना त्यांचे टेन्डर क्लीअर करण्यात आले त्यामुळेच शंकेला मोठा वाव आहे आणि अशाप्रकारे मोठा घोळ यामध्ये करण्यात आलेला आहे. ही जी कार्यप्रणाली प्रशासनाने अवलंबलेली आहे ती चुकीची आहे त्यामुळे या प्रकरणाची नव्याने चौकशी करण्यात यावी, आणि जो पर्यत या प्रकरणाची चौकशी होत नाही तो पर्यत या प्रकरणामध्ये जो प्रशासनाकडुन घोळ घालण्यात आला आहे त्यावर कठोर कारवाई करण्यात यावी अशी आपणांस नम्र विनंती आहे.

वरील चर्चेनंतर सन्माननिय सदस्यांनी जे आरोप लावले आहे त्यामध्ये निगम आयुक्तांनी वैयक्तीक लक्ष देऊन त्यामध्ये काय आहे त्याचे निष्पन्न काढुन सन्माननिय सदस्यांना सुचना करतील. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**<u>ठराव क्र.१२१/ नोटीस क्रमांक ०२</u>:-** कोविड—१९ चे रुग्ण असलेल्या सौ. वैशाली तुषार ढोबळे हयांनी तक्रार केलेल्या भवानी मल्टिस्पेशालिटी हॉस्पीटल व रिसर्च इन्स्टिटयुट विरुद्ध त्याचप्रमाणे श्रीमती अश्विनी मुकुंद राजुरकर हयांनी केलेल्या सेव्हन स्टार हॉस्पीटल नंदनवन व अंकुर गेरा हयांनी वोक्हार्ट हॉस्पीटल विरुद्ध केलेल्या तक्रारींवर प्रशासनाने काय कारवाई केली? हया संबंधाने यावर सभागृहात चर्चा करुन निर्णय घेणेबाबत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "१" (जे) " प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेतला

**(आरोग्य विभाग)**

**(मा. ॲड श्री. धर्मपाल मेश्राम)**

श्री.धर्मपाल मेश्राम :- मा.महापौरजी, कोव्हीड -१९ च्या काळात अनेक परिवारातील रुग्णांना वाचविण्याचे काम करावे लागले हे आपल्याला माहिती आहे. कोविड -१९ चे रुग्ण असलेल्या सौ.वैशाली तुषार ढोबळे या भवानी मल्टिस्पेशालिटी हॉस्पीटल येथे ॲडमिट होत्या जेव्हा त्यांचे बिल तपासल्या गेले तेव्हा साठ हजार रुपये कमी करण्याचे आदेश महानगरपालिका प्रशासनाने दिले आहे. त्याचप्रमाणे सेव्हन स्टार हॉस्पीटल नंदनवन आणि व्होकार्ड हॉस्पीटल येथे अंकुर गेरा यांच्या कडुन दिलेल्या बिलाची कुठल्याही ऑडीटरने तपासणी केल्या गेलेली नाही. माझी आपणांस नम्र विनंती आहे ऑडीटरची तपासणी सोबतच जे काही तांत्रिक आणि कायदेशीर चौकशी करता येईल त्याची चौकशी करुन रुग्णांना न्याय

देण्यात यावा.

वरील चर्चेनंतर प्रशासनाच्या माध्यमातून या सर्व विषयावर निर्णय घेण्यासाठी एक समिती निर्धारित केलेली आहे. त्या समितीसमोर मा.सदस्य श्री.धर्मपाल मेश्राम तसेच ढोबळे परिवारांना बोलावुन त्यांना सुनावणी देवून समितीच्या माध्यमातुन पुढील निर्णय घेण्यात यावा. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**ठराव क्र.१२२/ नोटीस क्रमांक ०३:-**
**(सा.प्र.वि.)**
**(मा. ॲड श्री. धर्मपाल मेश्राम)**

नगरसेवक व लोकप्रतिनिधींना निवडणुकीला सामोर जातांना त्यांचेविरुद्ध दाखल गुन्हे व संपत्तीचं विवरण शपथपत्राव्दारे दयावे लागते त्याच धर्तीवर मनपा अधिकारी व कर्मचाऱ्यां विरुद्ध दाखल प्रत्येक स्वरुपाची प्रकरणे व त्यांची व त्यांच्या परिवारची संपत्तीची माहिती शपथपत्राव्दारे घेण्यासंबंधी यावर सभागृहात चर्चा करुन निर्णय घेणेबाबत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "१" (जे) " प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेतला

श्री.धर्मपाल मेश्राम :- मा.महापौरजी, लोकसभा निवडणुका असतील किवा विधानसभा निवडणुका असतील किंवा स्वायत्त संस्थांच्या निवडणुका असतील त्या निवडणुकीला समोर जातांना त्याची आणि त्याच्या कुटुंबाची सर्व संपत्तीचे प्रतिज्ञापत्र घेतले जातात त्या अनुषंगाने नागपूर महानगरपालिकेचे सर्व कर्मचारी व अधिकारी तसेच राज्य शासनाचे आलेले अधिकारी व कर्मचारी असतील त्यांची शहानिशा करुन त्यांच्या संपत्तीचे विवरण तसेच त्यांच्या परिवाराच्या संपत्तीचे विवरण घेऊन ते पब्लीश करण्यात यावे असे माझी आपणांस विनंती आहे त्यावर आपण निर्णय घ्यावा.

वरील चर्चेनंतर सन्माननीय सदस्य ने जो विषय रखा है इस विषय के संदर्भ मे सभी से जानकारी लेना इसमे किसी भी प्रकार की अडचण नही है। यह जानकारी आयुक्त महोदय के माध्यम से सभी अधिकारी कर्मचारीयों की लेकर उन्होने रखना चाहिये, रही बात उन्हे सार्वजनिक तौर पर प्रकाशित करने की तो नियमाअंतर्गत जो तरतुद होंगी उसके अंतर्गत आयुक्त ने निर्णय लेकर के कारवाई करेंगे या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**ठराव क्र.१२३/ नोटीस क्रमांक ०४:-**
**(वित्त विभाग)**
**(मा. श्री. तानाजी वनवे)**

नागपूर महानगरपालिकेकडुन शहरात विविध विकास कामासाठी अर्थसंकल्पामध्ये निधी मंजूर आरक्षित ठेवण्यात असतो. त्यानुसार प्रभागनिहाय किती निधी देण्यात आलेला आहे. या निधीचे समान वाटप होत नसून शहरातील विकास कामे खोळंबलेली असून काही कामे ही निधी अभावी अर्धवट स्थितीत आहे. त्यामुळे मनपाकडुन विकास कामाचा निधी वाटपात होत असलेल्या अनियमिततेच्या संदर्भाने यावर सभागृहात चर्चा करुन निर्णय घेणेबाबत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "१" (जे) " प्रमाणे नोटीस ची सभागृहाने नोंद घेतली.

**ठराव क्र.१२४/ नोटीस क्रमांक ०५:-**
**(आरोग्य विभाग)**
**(मा. श्री. तानाजी वनवे)**

नागपूर महानगरपालिकेच्या सिमे अंतर्गत शहरात ५ ते ६ महिन्यापासुन दुकानामध्ये नॉयलॉन मांजाची सर्रास विक्री करण्यात येत आहे. त्यामुळे रस्त्यावरुन वाहन चालविण्याऱ्या तरुणांना व नागरीकांना आपले जीव गमवावे लागत आहे. याकरिता मनपाच्या संबंधित विभागाकडुन नॉयलॉन मांजा विक्री करणाऱ्या दुकानदारांवर होत असलेल्या कारवाईत दिरंगाई होत असून अनियमिततेच्या संदर्भाने यावर

सभागृहात चर्चा करुन निर्णय घेणेबाबत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "१" (जे) " प्रमाणे नोटीस ची सभागृहाने नोंद घेतली.

**<u>ठराव क्र.१२५/ नोटीस क्रमांक ०६:-</u>** नागपूर मनपाच्या सेवेत कार्यरत असतांना मृत पावलेले **(आस्थापना विभाग)** कर्मचारी स्व. श्री. संदेश मनोहर समुद्रे यांचे जागेवर त्यांचे **(मा. श्री. प्रफुल्ल गुडधे)** भाऊ श्री. संजय मनोहर समुद्रे यांचे अनुकंपातत्वावर नौकरी संबंधाने यावर सभागृहात चर्चा करुन निर्णय घेणेबाबत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "१" (जे) " प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेतला

श्री.प्रफुल्लजी गुडधे :- मा.महापौरजी, एका बाबीकडे मी आपले लक्ष वेधु इच्छितो महानगरपालिकेत सफाई कर्मचारी म्हणुन समुद्रे नावाच्या महिला काम करतात त्यांच्या प्रकृतीच्या कारणामुळे दिनांक १६-०५-१९९५ ला त्यांनी स्वेच्छा निवृत्ती स्वीकारली. लाड समितीच्या शिफारसीप्रमाणे त्यांच्या एका वारसदारांना नौकरी देणे अपेक्षित होते त्याप्रमाणे त्यांचा लहान मुलगा जो होता श्री.संदेश समुद्रे यांना महानगरपालिकेत ३१ मार्च १९९८ ला नौकरी दिली. तो अविवाहीत होता त्याला एक भाऊ होता त्याचे नाव संजय समुद्रे होते. संजयनी त्यांला कंन्सर्न दिले होते की याला नौकरी देण्यात यावी हा आमच्या कुटुंबाचे पालन पोषण करेल, तो १९९८ ला नौकरीमध्ये लागला आणि तो १५-०६-२००८ ला अविवाहीत असतांना त्यांचे नौकरीवर असतांना त्याचे निधन झाले. तो ज्यावेळी लागला त्यावेळी तो कर संग्राहक म्हणुन क्लास थ्री मध्ये लागला. त्याचा जो भाऊ होता संजय मनोज समुद्रे हा कमी शिकलेला होता. त्याची आई लाड पागे समितीमध्ये सफाई कर्मचारी होती. म्हणुन त्याच्या डोक्यामध्ये लाड पागे समितीच होते. कर्मचा-यांच्या मृत्युनंतर वर्षभराच्या आत जो अर्ज करायला पाहिजे त्याने लगेच दोन महिन्यानंतर ०६-०८-२००८ ला अनुकंपा तत्वावर नौकरी दयावी अशा प्रकारचा वेळेत त्यांनी अर्ज केला. मात्र महानगरपालिकेने अर्ज फेटाळला तो यासाठी कारण तुमचा भाऊ हा वर्ग तीन मध्ये असल्यामुळे लाड पागे समितीच्या शिफारसी अंतर्गत तुम्हाला नौकरी मिळत नाही. आणि तो फिरत राहिला. मा.महापौरजी, मी त्यावेळी तत्कालीन आयुक्तांनी भेट घेतली ३०-१२-२०१६ तो जर लाड पागे समितीमध्ये बसत नसेल तर त्याला अनुकंपा तत्वाचा लाभ दयायला पाहिजे. त्यावेळी तत्कालीन आयुक्तांनी ती गोष्ट मान्य केली. हा जो अर्ज आहे तो लाड पागे समितीच्या शिफारसी अंतर्गत कंन्सीडर न करता त्याला अनुकंपा तत्वावर कंन्सीडर करण्यात यावे. त्या पध्दतीचा त्यांनी निर्णय घेतला व त्या अनुषंगाने त्याने अर्ज केलेला आहे. मात्र त्या प्रकरणामध्ये काहीच झालेले नाही. त्यामुळे लाड पागे ऐवजी त्याला अनुकंपा तत्वावर नौकरी दयावी या प्रकारचा हा प्रस्ताव आहे. सभागृहाने त्याला मान्यता दयावी. मा.सदस्य श्री.धर्मपाल मेश्राम सुध्दा या प्रकरणी आपले मत व्यक्त करतील. ही नियमात बसणारी केस आहे. अर्जदाराचे अज्ञान होते त्याला माहिती नव्हते अर्ज लाड पागे समिती अंतर्गत करायचा की अनुकंपा तत्वावर करायचा. तो भाऊ अविवाहीत होता त्यामुळे त्याचा सख्खा जो भाऊ आहे तो वारस होतो त्यामुळे त्याला नौकरी देण्याचा प्रस्ताव सभागृहाने मान्य करावा.

श्री.धर्मपाल मेश्राम :- मा.महापौरजी, या विषयावर जर प्रशासनाचे निवेदन घेतले तर सोयीचे होईल त्यामुळे प्रशासनाने निवेदन दयावे असे निर्देश देण्यात यावे.

उपायुक्त (श्री.जैन) :- मा.महापौरजी, सदर प्रकरण सद्यस्थितीत मा.उच्च न्यायालयामध्ये प्रलंबित आहे.

श्री.धर्मपाल मेश्राम :- मा.महापौरजी, जरी ते मा.उच्च न्यायालयामध्ये प्रलंबित असले तरी या संदर्भात प्रशासनाचे काय मत आहे ते स्पष्ट करण्यात यावे.

उपायुक्त (श्री.जैन) :- मा.महापौरजी, सदर विषयामध्ये २०१३ मध्ये यांचा अर्ज नामंजूर करण्यात आला होता. तो या कारणासाठी नामंजूर करण्यात आला होता की तो २३-०८-१९९६ चा शासन निर्णय आहे. त्यामध्ये अविवाहीत भाऊ जर मृत्युमुखी पडला असेल त्यांच्या वारसांना जी नौकरी दयायची आहे त्याच्यामध्ये अविवाहीत भाऊ असा उल्लेख आहे आणि जे अर्जदार होते ते विवाहीत होते त्यामुळे त्यांचा अर्ज अपात्र ठरविण्यात आला होता. त्यानंतर त्यांनी पुन्हा अर्ज केला पुन्हा अर्ज केल्यानंतर दिनांक ०६-१२-२०१० चा एक शासन निर्णय आहे. त्यामध्ये नियुक्तीची जी वयोमर्यादा आहे ती ४५ वर्ष नमुद केली आहे. त्यावेळी ४५ वर्षाची वयोमर्यादा ते ओलांडत असल्यामुळे त्यांचा अर्ज हा नामंजूर करण्यात आला होता.

श्री.धर्मपाल मेश्राम :- मा.महापौरजी, वयोमर्यादेच्या संदर्भात जी चुक होती ती अर्जदाराची होती की प्रशासनाची होती.

उपायुक्त (श्री.जैन) :- मा.महापौरजी, शासन निर्णयामध्ये जे लिहले आहे की नियुक्तीच्या वेळी ४५ वर्ष वयोमर्यादा अशी नमुद केली आहे. मा.सदस्य जे सांगत आहे की २०१३ मध्ये त्यांचा अर्ज नामंजूर करण्यात आला होता ती वयोमर्यादा नमुद करुन तो अर्ज नामंजूर करण्यात आला होता हे प्रकरण जुणे आहे ते मान्य आहे.

श्री.प्रफुल्लजी गुडधे :- मा.महापौरजी, अर्जदाराने २००८ ला अर्ज केला होता त्यावेळी त्याची वयोमर्यादा ४५ च्या आतमध्ये होती. मात्र त्यावेळी आपण त्यावर निर्णय घेतला नाही म्हणुन त्याला प्रशासनाकडून विलंब झाला.

उपायुक्त (श्री.जैन) :- मा.महापौरजी, २०१३ ला जो अर्ज नांमजूर करण्यात आला होता तो यासाठी केला होता की त्यामध्ये जे पात्र वारस आहे त्या पात्र वारसांच्या सुचीमध्ये अविवाहीत भाऊ असा उल्लेख आहे अर्जदार त्यावेळी विवाहीत होते त्यामुळे नामंजूर करण्यात आला आहे.

वरील चर्चेनंतर सन्माननिय सदस्य श्री.प्रफुल्लजी गुडधे आणि सन्माननिय सदस्य श्री.धर्मपाल मेश्राम जे वक्तव्य केले आहे ते मानविय दृष्टीने हा जो प्रस्ताव आहे याच्यावर नागपूर महानगरपालिका जर निर्णय घेऊ शकत नसेल तर हा प्रस्ताव महानगरपालिकेच्या माध्यमातून महाराष्ट्र शासनाकडे निर्देश घेण्यासाठी पाठविण्यात यावा. त्या मानसांनी शिक्षण कमी असल्यामुळे जी पहिली अप्लीकेशन केली होती ती जेवढे त्याला माहिती होती त्याप्रमाणे केली होती जर त्याचे समुपदेशन त्यावेळी झाले असते तर त्याने अनुकंपाचा आधार घेतला असता परंतु प्रशासनाच्या माध्यमातून त्याचे समुपदेशन झाले नाही आणि त्याला त्याची जाणीव नव्हती म्हणुन त्याला उशीर लागला त्यामुळे मानविय दृष्टीकोणातून त्याला नौकरी देण्यात यावी अशा प्रकारचा एक प्रस्ताव बनवुन राज्य शासनाकडे पाठविण्यात यावा, राज्य शासनाकडून निर्देश घेऊन याला नौकरीवर घेण्यात यावे असे निर्देश देण्यात येत आहे. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**ठराव क्र.१२६/ नोटीस क्रमांक ०७:-** उपायुक्त, महसूल मालमत्ता आणि सहा. अधिक्षक / राजस्व **(कर व कर आकारणी विभाग)** निरीक्षक हनुमाननगर झोन यांनी नियमबाहय गैरकायदेशीर **(मा. श्री. प्रवीण दटके)**

केलेल्या कामाकाजावर सभागृहात चर्चा करुन निर्णय घेणेबाबत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "१" (जे) " प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेवून या विषयावर मागच्या सभागृहात चर्चा झालेली आहे या मा.महापौरजी यांनी केलेल्या सुचनेची सभागृहाने एकमताने नोंद घेतली.

श्री.अविनाश ठाकरे :- मा.महापौरजी, श्री.संदीप जोशी यांचे पत्र प्राप्त झाले आहे की ते २१ तारखेपर्यत नागपूर शहरामध्ये नाही. त्यामुळे त्यांचा विषय पुढच्या सभेमध्ये कायम ठेवण्यात यावा.

**<u>ठराव क्र. १२७/नोटीस क्रमांक १०</u>:-**कोरोना काळात लॉकडाऊन मध्ये निवारागृहांमध्ये जी भोजनाची **(समाजकल्याण विभाग)** व्यवस्था करण्यात आली होती. हया संदर्भात, या व्यवस्थे संदर्भात **(मा. सौ. आभा पांडे)** सभागृहात चर्चा करुन निर्णय घेणेबाबत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "१" (जे) " प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेतला

सौ.आभा पांडे :- मा.महापौरजी, कोरोना काळात लॉकडाऊन मध्ये निवारागृहांमध्ये जी भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. हया संदर्भात, या व्यवस्थे संदर्भात सभागृहात चर्चा करुन निर्णय घेणेबाबत मी नोटीस लावला होता. मा.महापौरजी, मला असे वाटते की आपण या विषयासंदर्भात एक विशेष सभा लावतच आहोत त्यामुळे हा विषय सुध्दा त्यामध्ये समाविष्ट करण्यात यावा आणि या विषयासंदर्भात पुर्ण अभ्यास करुन या विषयावर चर्चा करण्यात येईल. मा.महापौरजी, सभागृहामध्ये आपण जे आदेश देता त्या आदेशाचे पालन हे प्रशासन काटेकोरपणे करीत नाही आणि आयुक्त हे या विषयावर गंभीर नाही असा माझा आरोप आहे. आपणास मी निवेदन करु इच्छिते आणि तेव्हा सुध्दा निवेदन केले होते जेवढया नस्त्या आहे ते आपल्याजवळ सिल करण्यात याव्यात, जेवढया वर्कऑर्डरच्या नोंदवहया आहेत त्या आपल्या जवळ सिल करण्यात याव्यात, प्रोव्हीजन रजिस्टर आपल्याकडे सिल करण्यात याव्यात, मा.आयुक्तांनी जर ते केले असते तर त्यांना खोडतोड करण्याची गरज भासली नसती. स्टोअर विभागामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात यावे, तेथे कर्मचारी रात्रभर बसुन प्रोव्हीजन रजिस्टर आणि वर्कऑर्डर रजिस्टरवर काय खोडतोड केलेली आहे त्यामुळे सर्व रजिस्टर आपण आजच्या आज आपलया जवळ बोलवावे, मा.महापौरजी आपण सुध्दा या विषयावर गंभीर आहे आपल्या प्रयत्नामुळेच मला त्या सर्व फाईलचे वाचन करु शकले त्या बद्यल मी आपले अभिनंदन करते, धन्यवाद.

महापौर :- आयुक्तांना निर्देश देण्यात येते की या संबंधी जेवढी फाईल आहे त्या सर्व फाईल आयुक्तांनी आपल्या कस्टडीमध्ये बोलवावी.

निगम आयुक्त :- मा.महापौरजी, सन्माननिय सदस्या सौ.आभा पांडे ज्या सांगत आहे प्रशासन दुर्लक्ष करीत आहे हे बरोबर नाही. ज्यावेळी मा.सदस्यांचे अशाप्रकारे गंभीर स्वरुपाचे पत्र मिळाले होते त्यानंतर तातडीने त्या स्वरुपाचे अतिरिक्त आयुक्त दर्जाचे अधिकारी श्री.राम जोशी यांना मा.सदस्यांचे प्रत्येक मुद्येनिहाय लेखी उत्तर उपलब्ध करुन देण्याचे निर्देश देण्यात आले होते आणि या व्यतिरिक्त सुध्दा त्यांनी जे प्रश्न उपस्थित केले होते की ९ कोटी रुपये आले होते,५कोटी रुपये आले होते त्याचे काय झाले त्या संदर्भातील फाईल सुध्दा दाखविण्यात आले आहे. त्यांनी काही माहिती आरोग्य विभागाकडे मागितली होती. आपण पाहिले असाल की आरोग्य विभाग पण काही प्रमाणात खर्च करते, समाजकल्याण विभाग खर्च करतात, स्वच्छता विभाग खर्च करतात, पीडब्लुडी विभाग असेल असे बरेच विभाग आहे. जी काही माहिती मा.सदस्या सौ.आभा पांडे मॅडम असतील किंवा कोणतेही मा.सदस्य असतील ती सर्व माहिती रेकॉर्डवर उपलब्ध आहे. मी सभागृहास सांगु इच्छितो की मी कलम ३१९ खाली कोणतेही आदेश पारीत केलेले नाही. सभागृह नेतांनी पत्र दिले हाते त्यामध्ये मा.महापौरांनी त्यामध्ये शेरा दिला आहे संपुर्ण वस्तुस्थिती सभागृहासमोर ठेवावी, आम्हाला ती माहिती ठेवण्यास अजिबात अडचण नाही. आम्ही सभागृहाला सांगु शकलो असतो कि कलम ३१९ खाली कोणतेही आदेश पारीत केले नाही त्यामुळे आम्ही

कुठल्याही प्रकारची माहिती देत नाही. त्यामुळे कोणतेही माहिती लपवण्याचे आमच्याकडे कारण नाही आहे. सर्व रेकॉर्डवरची माहिती आम्ही दयायला तयार आहोत परंतू रेकॉर्ड बंद करुन ठेवणे यामुळे कोरोनाच्या कामामध्ये अडचणी निर्माण होऊ शकतो त्यामुळे आम्हाला सभागृहाची परवानगी देण्यात यावी.

श्री.अविनाश ठाकरे :- मा.महापौरजी, पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन मा.आयुक्तांनी जे निवेदन केले त्यावर मला माहिती अशी दयायची आहे कलम ३१९ (२) हे सांगते की, प्रशासनाने जे काही निर्णय घेतले आहे त्या सर्व निर्णयाची माहिती सभागृहासमोर ठेवण्यात यावी हे करेक्शन मला सुचवायचे आहे.

सौ.आभा पांडे :- मा.महापौरजी, मा.आयुक्तांनी आता जे निवेदन केले की, आयुक्त या विषयावर गंभीर नाही असा मी आरोप केला होता मी त्याच आरोपावर कायम आहे. त्याचे कारण असे आहे की, भ्रष्टाचाराचा गैरव्यवहार किंवा गैरवापर जो कोव्हीडमध्ये केलेला आहे शासनाच्या अनुदानाचा, जेव्हा मी प्रोव्हीजन रजिस्ट्रर व वर्कऑर्डरची नोंदवही मागितली असता प्रशासनानी मला ते सहा दिवसानंतर दिले आणि ती जी माहिती दिली ती नस्ती तयार करुन दिलेली आहे. माझे जर आरोप खरचं ऐवढे गंभीर होते तर आयुक्तांनी आपली गंभीरता दाखवायला पाहिजे होती सगळया ज्या नस्त्या होत्या त्या आपल्या जवळ ठेवायला पाहिजे होत्या, तेथे सिसिटीव्ही कॅमेरे लागले आहे ते बघा रात्रभर तेथे अधिकारी व कर्मचारी काय करीत होते. प्रोव्हीजन रजिस्टरवर काय करीत होते. त्यामुळे या सर्व गोष्टीवर आरोप करण्यास मला मा.आयुक्तांनी बाध्य केले. आणखी मला एक म्हणायचे आहे की आता जे मा.आयुक्तांनी निवेदन केले त्या नस्त्यामुळे कोव्हीडमध्ये अडचणी येऊ नये म्हणुन वेगळया ठेवल्या आहे. मा.महापौरजी यामध्ये काही कारणे आहे ती मी पकडले आहे. मा.आयुक्तांनी जर या विषयामध्ये गंभीरता दाखविली असती तर मी निश्चितच मा.आयुक्तांच्या बाजुने उभी राहिली असती परंतु जी गंभीरता आहे ती दिसली नाही त्यामुळे ज्या मे महिन्यापर्यतच्या ज्या नस्त्या आहे ते सर्व डॉक्युमेंट देण्याकरीता काही हरकत नाही. बिल सर्व निघाले आहे त्यामुळे या ज्या नस्त्या आहे त्या मा.महापौरजी तुमच्या कस्टडीमध्ये ठेऊन सिल करण्यात यावे असे मी निवेदन करते, धन्यवाद.

वरील चर्चेनंतर मा. आयुक्तांना निर्देश देण्यात येते की या संबंधी जेवढया फाईली आहे त्या सर्व फाईली आयुक्तांनी आपल्या कस्टडीमध्ये बोलवावी. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**<u>ठराव क्र. १२८/नोटीस क्रमांक ११:-</u>** नागपूर महानगरपालिकेतील सफाई ऐवजदार कर्मचारी **(घनकचरा व्यवस्थापन विभाग)** कोरोना काळात काम करीत असतांना कोरोनाने मृत्यू पावले **(मा. सौ. आभा पांडे)** अशा ऐवजदार कर्मचाऱ्यांच्या वारसदारांना नोकरीत समावून घेण्याबाबतच्या संदर्भात सभागृहात चर्चा करुन निर्णय घेणेबाबत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "१" (जे) " प्रमाणे नोटीस.

सौ.आभा पांडे :- मा.महापौरजी, नागपूर महानगरपालिकेतील सफाई ऐवजदार कर्मचारी कोरोना काळात काम करीत असतांना कोरोनामुळे मृत्यु पावलेले अशा अशा कर्मचा-यांच्या वारसदारांना नौकरीत सामावुन घेण्याबाबत नोटीस मी लावलेला आहे. मा.महापौरजी, प्रशासनाने हे सांगितले पाहिजे की हा निर्णय आपण घेऊ शकतो काय ?

महापौर :- प्रशासनाने उत्तर दयावे की ऐवजदार सफाई कर्मचा-यांना नौकरीवर घेण्यासाठी सभागृह सक्षम प्राधिकरण आहे काय ?

उपायुक्त (श्री.राजेश भगत) :- मा.महापौरजी, जे सफाई ऐवजदार आपल्याकडे काम करीत आहेत यांना नौकरीत सामावुण घेण्याच्या अनुषंगाने शासनाने जे आदेश दिले होते त्यामध्ये स्पष्टपणे एक अट टाकली होती अधिसंख्य पद मंजूर केले असल्यामुळे त्या पदावर काम करणारी जी व्यक्ती आहे ते जर सेवा निवृत्त झाले तर ते पद व्यपगत होईल, त्यामुळे त्यांच्या वारसांना या पदावर घेता येत नाही.

सौ.आभा पांडे :- मा.महापौरजी, कोरोना महामारी असल्यामुळे आपल्या सभागृहाने हा निर्णय घेतला पाहिजे जरी अधिसंख्य पदाचा विषय असला तरी सुध्दा, आपण त्यांना सातवा वेतन आयोग लागु केलेला आहे. जर आपल्या सभागृहाने निर्णय घेतला तर आपल्या सफाई ऐजवदार कर्मचा-यांना लाभ देण्याकरीता जर आपण एकत्रित झालो तर सभागृहाने या विषयासंदर्भात एकमताने ठराव पास करुन रितसर जर आपल्याला निर्णय घेता येत नसेल तर हे महाराष्ट्र शासनाला पाठविण्यात यावे की कोरोना या महामारीमध्ये सफाई ऐवजदार कर्मचारी मरण पावले आहे त्यांच्या वारसदारांना नौकरीवर घेण्याकरीता निर्णय घेऊन आपण तो ठराव महाराष्ट्र शासनाला पाठविण्यात यावे असे मा.महापौरजी या सभागृहाच्या माध्यमातून व या नोटीसच्या माध्यमातून मी निवेदन करु इच्छिते. कोरोना काळात आपले सफाई ऐजवदार कर्मचारी मरण पावले आहे त्यांच्या घरी कोणतेही मानसे नाही त्यांना लहान मुले आहे. त्या कर्मचा-यांनी २०-२०, २५-२५ वर्ष महानगरपालिकेमध्ये सेवा दिलेली आहे. म्हणुन माझे निवेदन आहे की, या संदर्भात आपण निर्णय घेऊन एक ठराव आपण महाराष्ट्र शासनाला पाठविण्यात यावे असे मी निवेदन करते.

वरील चर्चेनंतर सन्मानिय सदस्यांच्या सुचनेप्रमाणे सभागृहाने रितसर याबद्दल एक प्रस्ताव सभागृहासमोर ठेवावा. सभागृहातील सर्व मा. नगरसेवक या प्रश्नाला समर्थन करतील असा विश्वास आहे. म्हणून प्रशासनाने एक प्रस्ताव नियमीत अजेंडावर आणुन शासनाकडे पाठविण्याच्या दृष्टीने प्रस्ताव तयार करावा आणि पुढच्या सभागृहात ठेवण्याचे निर्देश देण्यात येत आहे. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**ठराव क्र.१२९/नोटीस क्रमांक १२:-** प्रभागातील विविध ठिकाणच्या गडर लाईन, चेंबर दुरुस्ती **(सार्व.आ.अभि.विभाग)** संदर्भात सभागृहात चर्चा करुन निर्णय घेणेबाबत. महाराष्ट्र **(मा. श्री. राजेंद्र विठ्ठलराव सोनकुसरे)** महानगरपालिका अधिनियमातील "१" (जे) " प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेवून प्रभागात गडर लाईन, चेंबर दुरुस्तीची कामे सुरु झालेली आहेत असे मा.महापौरजी यांची सुचित केले आणि सभागृहाने त्याची एकमताने नोंद घेतली.

**ठराव क्र.१३०/नोटीस क्रमांक १३:-** नागपूर महानगरपालिकेकडुन नागपूर शहरात कोरोना **(आरोग्य विभाग)** लसीकरण केंद्र सुरु करण्यात येत असून **(मा. श्री. तानाजी वनवे)**

महानगरपालिकेकडुन लसीकरण केंद्र सुरु करण्याबाबतच्या नियमावली संदर्भात सभागृहात चर्चा करुन निर्णय घेणेबाबत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "१" (जे) " प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेवून महानगरपालिकेकडुन लसीकरण केंद्र सुरु असल्याबाबत मा.महापौरजी यांनी सुचित केले आणि सभागृहाने त्याची एकमताने नोंद घेतली.

**ठराव क्र.१३१/नोटीस क्रमांक १४:-** नागपूर महानगरपालिके व्दारे शहरातील कचरा संकलनाचे **(आरोग्य विभाग)** कंत्राट मे. ए.जी. ऍन्वरो कंपनी व मे. बी.व्ही.जी. कंपनीला **(मा. श्री. तानाजी वनवे)** देण्यात आलेले

आहे. या कंपनी व्दारे होत असलेले शहरातील कचरा संकलनाचे काम असमाधानकारक होत असल्याच्या संदर्भात सभागृहात चर्चा करुन निर्णय घेणेबाबत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "१" (जे) " प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेवून या विषयासंदर्भात समिती नेमली असल्याचे मा.महापौरजी यांनी सुचित केले आणि सभागृहाने त्याची एकमताने नोंद घेतली.

**ठराव क्र.१३२/नोटीस क्रमांक १५:-** नाईक तलाव रोड बांधकामात बाधीत असलेले घरे पुनर्वसन **(लोककर्म विभाग)** करणे तसेच नाईक तलाव पुनर्जिवन प्रकल्पा संदर्भात **(मा. श्री. दिपराज पार्डीकर)** सभागृहात चर्चा करुन निर्णय घेणेबाबत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "**१**" (जे) " प्रमाणे नोटीस ची सभागृहाने एकमताने नोंद घेतली.

**ठराव क्र.१३३/नोटीस क्रमांक १६:-** उत्तर नागपूर येथील प्रभाग क्र. **७** मधिल इंदोरा मैदानाच्या **(स्थावर विभाग)** विकासा विषयी व मैदानाच्या दुरावस्थे विषयी सविस्तर **(मा. सौ. मंगला लांजेवार)** सभागृहात चर्चा करुन निर्णय घेणेबाबत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "**१**" (जे) " प्रमाणे नोटीस सभागृहाने विचारात घेतला

सौ.मंगला लांजेवार :- मा.महापौरजी, मेरे प्रभाग क्र ७ मे इंदोरा मैदान है वहापर बच्चो को खेलने के लिये बहोत जगह है इस मैदान के अलावा और कोई मैदान वहा मौजुद नही है इस मैदान को देश की बडी हस्तीयो ने ऐतिहासिक मैदान कहा है। यह मैदान आंबेडकरी चळवळीका केंद्र बिंदु रहा है। इस मैदान का रखरखाव और देखरेख के लिये उचित कदम उठाने चाहिये, यहा क्रीकेट की पिच बनानी चाहिये, यहापर असामाजिक तत्वोंका डेरा लगा रहता है लोग मैदान मे पिशाब करते है, जुव्वा खेलते है दारु पिते है, काच की बॉटल वहीपर फोड देते है बच्चे खेलते है तो उनके पैर मे वह काच लगते है। आज इस मैदान के आजुबाजु मे ओपन बिअर बार शुरु हो गये है इस और भी ध्यान देना बहोत जरुरी है।

महापौर :- या ग्राउंडमध्ये काम करतांना काय अडचणी येत आहे या संदर्भात प्रशासनाने उत्तर दयावे.

उपायुक्त (श्री.मिलींद मेश्राम) :- मा.महापौर महोदय, सन्माननिय सदस्य, सन्माननिय नगरसेविका ज्या विषयाबद्यल बोलत आहे मौजा इंदोरा येथील नगर भुमापन क्रमांक ५३२ व मौजा जरीपटका येथील नगर भुमापन क्रमांक १४१४ या संदर्भात मा.नगरसेविका बोलत असतील तर त्या संदर्भात माहिती अशी देऊ इच्छितो की, सदर मैदान हे नझुलच्या मालकीचे आहे. मा.महापौरजी, मी जे नगरभुमापन क्रमांक सांगितले आहे मौजा इंदोरा आणि मौजा जरीपटका या विषयाबाबत जे बेझनबाग सोसायटी सहकारी संस्थाचा अभिन्यास रुगुलरायजेशन करण्यासंदर्भातील जो विषय आहे त्या ठिकाणी असा निर्णय घेतला आहे की तो अभिन्यास मंजूर करतांना मौजा इंदिरा नगर भुमापन क्रमांक ५३२ व मौजा जरीपटका येथील नगर भुमापन क्रमांक १४१४ ही जागा ते अभिन्यास मंजूर करण्याकरीता ओपन स्पेस आणि पी.यु लॅन्ड सोडावी लागते त्याची कमतरता या मैदानातून भागविण्याकरीता शासनाने निर्णय घेतलेला आहे. त्यामुळे नझुलची जागा आहे. शासनाची जागा असल्यामुळे नागपूर महानगरपालिकेला अशा परिस्थितीत कुठलेही विकास कामे करणे शक्य होणार नाही अशी विभागाची धारणा आहे.

वरील चर्चेनंतर मा.सदस्यांनी जो विषय मांडला आहे तो अत्यंत गंभीर असल्यामुळे नागपूर

महानगरपालिकेच्या माध्यमातून जर ओपन जागा अभिन्यासामध्ये सोडण्याचा शासन निर्णय घेतला आहे तर त्या जागेवर शासनाच्या निधीतून क्रीडांगण उभारण्यासाठी मदत करण्यासाठी एक प्रस्ताव तयार करुन रितसर जिल्हाधिकारी साहेब यांच्याकडे पाठवावा, जेणेकरुन शासनाच्या निधीमधून तेथे काम करता येईल आणि हा नेहमीचा त्रास संपेल या दृष्टीने निर्देश देण्यात येत आहे. या मा.महापौरजी यांनी केलेल्या घोषणेस सभागृहाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**ठराव क्र.१३४/नोटीस क्रमांक १७:-** डिप्टी सिग्नल येथील संतगुरु घासीदास सभागृहात (समाजविकास विभाग) रात्रकालिन निवारा केंद्रा संदर्भात सभागृहात चर्चा करुन **(मा. श्री. अनिल गेंडरे)** निर्णय घेणेबाबत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील "**१**" (जे) " प्रमाणे नोटीसची सभागृहाने एकमताने नोंद घेतली.

यानंतर राष्ट्रगित होवून सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित करण्यांत आली.

**निगम सचिव**
**महानगरपालिका,नागपूर.**

**महापौर**
**महानगरपालिका,नागपूर.**